



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार ६ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# मोदी भारताचे नेते आहेत, हे भारताचे भाग्य-डोनाल्ड ट्रम्प

## पश्चिम बंगालमधील भाजपाच्या ऐतिहासिक विजयानंतर ट्रम्प यांनी केले मोदींचे अभिनंदन

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** भारतातील पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरीमधील विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल ४ मे रोजी जाहीर झाले. या निवडणुकीदरम्यान सर्वाधिक चर्चा ही पश्चिम बंगालची होती. याच पश्चिम बंगालमध्ये आता भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक विजय मिळवत ममता बॅनर्जी यांच्या टीएमसीला मोठा धक्का दिला आहे. भाजपाने बंगालमध्ये बहुमत मिळवलं असून भाजपा तेथे लवकरच सरकार स्थापन करणार आहे.बिहारच्या पाठोपाठ पश्चिम बंगाल आणि आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपाने ऐतिहासिक कामगिरी करत विजयाचा सिलसिला कायम ठेवला. एकेकाळी तृणमूल काँग्रेसचा गड मानला जाणा-या बंगालमध्ये भाजपाने २९४ पैकी तब्बल २०० जागांवर विजय मिळवला. भाजपाच्या या लाटेत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह त्यांच्या सरकारमधील अनेक दिग्गज मंत्र्यांचा पराभव झाला आहे.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत मिळवलेल्या ऐतिहासिक विजयानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यावर प्रतिक्रिया देत पंतप्रधान नरेंद्र मोदींचं अभिनंदन केलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी या निकालाला ऐतिहासिक आणि निर्णायक असं म्हटलं असून ते भारताचे नेते आहेत, हे भारताचं भाग्य आहे, असं म्हटलं आहे. आयएएनएस या वृत्तसंस्थेच्या हवाल्याने इंडिया टुडेनी



दिलेल्या वृत्तानुसार, व्हाइट हाउसचे प्रवक्ते कुश देसाई यांनी म्हटलं की, गेल्या महिन्यात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फोनवरून पंतप्रधान मोदींची प्रशंसा केली होती. ते (ट्रम्प) म्हणाले होते की, ते (मोदी) भारताचे नेते आहेत हे भारताचं भाग्य आहे. आता राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींचं नुकत्याच झालेल्या ऐतिहासिक आणि निर्णायक निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन केलं आहे, असं कुश देसाई यांनी सांगितलं आहे.

गेल्या १५ वर्षांपासून पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता होती. त्यामुळे सत्ताविरोधी लाटेची शक्यता लक्षात घेता ममता बॅनर्जी यांनी आपल्या उमेदवारांच्या यादीत मोठ्या प्रमाणावर फेरबदल केले होते. त्यांनी ७४ विद्यमान आमदारांना पुन्हा तिकीट नाकारून त्यांच्या जागी नवीन चेह-यांना संधी दिली होती. त्याशिवाय मंत्रिमंडळात चांगली कामगिरी करणा-या ३५ विद्यमान मंत्र्यांना ममता यांनी पुन्हा विधानसभेचे तिकीट दिले होते. मात्र, निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या ३५ पैकी तब्बल २२ मंत्र्यांना मतदारांनी घरचा रस्ता दाखवला आहे. अर्थ आणि उद्योग खात्याची जबाबदारी सांभाळणा-या मंत्री शशी पंजा यांना निवडणुकीत पराभूत झाल्या, तर शिक्षणमंत्री ब्रात्य बसू यांनाही मतदारांनी नाकारले. वित्त व प्रशासनाशी संबंधित जबाबदारी सांभाळणा-या चंद्रिमा भट्टाचार्य यांना दारुण पराभवाचा सामना करावा लागला. त्याशिवाय पायाभूत सुविधा आणि उर्जा विभागाचे मंत्री अरूप बिस्वास, मंत्री प्रदीप मजुमदार, अल्पसंख्याक व सामाजिक संपर्क विभागाचे मंत्री सिद्दीकुल्ला चौधरी आणि उत्तर बंगाल विकास मंत्री उदयन गुहा यांच्यासह अनेक मंत्र्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

## एन.रंगास्वामी पाचव्यांदा होणार पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. पुद्दुचेरीत एनडीएतील घटक पक्ष असलेल्या ऑल इंडिया एनआर काँग्रेस (AINRC) , एआयएडीएमके, भाजपा आणि



लाचिया जननायगा काची (एलजेके) या पक्षांची सत्ता कायम राहणार आहे. पुद्दुचेरीत विधानसभा निवडणुकीसाठी विक्रमी ८९.८७ टक्के मतदान झाले होते. एनडीए विरूद्ध काँग्रेस-डीएमके अशी मुख्य लढत झाली. तसेच थलपती विजय यांच्या टीव्हीके पक्षाने सर्वच ३० जागांवर उमेदवार दिले होते. टीव्हीके पक्षामुळे पुद्दुचेरीतील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता होती, परंतु तसे झाले नाही. पुद्दुचेरीत एआयएनआरसी (AINRC) पक्षाला १२, भाजपाला चार, एआयएडीएमके आणि एलजेके पक्षाला प्रत्येकी एक जागा मिळाली. पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांनी त्यांच्या थट्टांचावादी मतदारसंघातून पुन्हा विजय मिळवला आहे. एन. रंगास्वामी हे पाचव्यांदा पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री होणार आहेत. ७५ वर्षीय एन. रंगास्वामी यांनी कामर्स व लॉ संबंधित पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. के कामराज यांच्या प्रभावाने एन. रंगास्वामी यांनी वकिली सोडून राजकारणात प्रवेश केला. ते त्यांच्या साध्या रहाणीमानासाठी तसेच लोकांमध्ये मिसळणारे नेते म्हणून ओळखले जातात. यमाहा आरएक्स १०० या त्यांच्या दुचाकीवर ते फिरतात. २०१६ आणि २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्यासाठी ते दुचाकी चालवत मतदान केंद्रावर पोहोचले होते. रंगास्वामी यांच्या व्यक्तिमत्वातील हेच पैलू पुद्दुचेरीच्या मतदारांना भावतात. मागील तीन दशकांपासून पुद्दुचेरीच्या राजकारणात त्यांचे वर्चस्व आहे.

## प.बंगालमध्ये 9 मे रोजी नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमध्ये एकूण २९३ जागांपैकी २९२ जागांचे निकाल राष्ट्रीय निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर लागले. त्यापैकी २०६ जागांवर भाजपने विजय मिळवला. १५ वर्ष बंगालवर राज्य करणा-या तृणमूल काँग्रेसला शंभरीही गाठता आली नाही. टीएमसीला ८० जागांवरच विजय मिळवता आला. इतकेच नव्हे माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. भाजपचे सुवेंदु अधिकारी यांनी ७३,९१७ मते मिळवली तर ममता बॅनर्जी यांना ५८,८१२ मते मिळाली. त्यामुळे ममता यांचा १५,१०५ मतांनी पराभव झाला. आता नव्या भाजप मुख्यमंर्त्यांचा शपथविधी ९ मे रोजी होणार आहे. ममता बॅनर्जीनंतर पश्चिम बंगालमध्ये महिला नेतृत्व कायम राहावे असा विचार झाल्यास मुख्यमंत्रीपदासाठी दीर्घकाळ राजकारणाचा अनुभव असलेल्या रूपा गांगुली यांचे नाव चर्चेत आहे. रूपा गांगुली या महाभारत मालिकेतील द्रौपदी भूमिकेतून घराघरात पोहोचवल्या. २०१५ पासून त्या पश्चिम बंगालच्या राजकारणात भाजपची भूमिका प्रभावीपणे मांडत आहेत. याशिवाय, ममता बॅनर्जीना सलग दुस-यांदा विधानसभा निवडणुकीत पराभवाचे पाणी पाजणारे सुवेंदु अधिकारी देखील या शर्यतीत आहेत. त्यांना बंगालच्या राजकारणाचा दीर्घ अनुभव आहे आणि ते अतिशय प्रभावी नेते आहेत. या दोघांव्यतिरिक्त प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य या नावाचीदेखील चर्चा आहे. एक हुशार राजकारणी म्हणून ते नावाजलेले आहेत. जुलै २०२५ पासून ते भाजपचे पश्चिम बंगाल प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. ते २०२४ पासून पश्चिम बंगालचे प्रतिनिधित्व करणारे राज्यसभेचे सदस्य म्हणूनही कार्यरत आहेत.

## BSF मुख्यालयाबाहेर स्फोट

### स्कूटीमध्ये स्फोटके ठेवल्याची शक्यत

**जालंधर-** जालंधरमध्ये BSF मुख्यालयाजवळ स्फोट झाला. त्याचा आवाज सुमारे १ किलोमीटर दूरपर्यंत ऐकू आला, ज्यामुळे आसपासच्या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. ज्या ॲक्टिव्हा स्कुटीमध्ये स्फोट झाला, ती कथितरित्या एका फिलपकार्ट डिलिव्हरी कर्मचा-याची असल्याचे सांगितले जात आहे. तो संध्याकाळी सुमारे ८:१५ वाजता स्कुटी उभी करून एक्क मुख्यालयाच्या आत पार्सल देण्यासाठी गेला होता, त्याचवेळी मागे स्कुटीमध्ये स्फोट झाला. सूत्रांचे म्हणणे आहे की, स्कुटीमध्ये ठेवलेल्या एखाद्या स्फोटकाचा स्फोट होण्याची शक्यता आहे. याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. BSF मुख्यालयाच्या बाजूला गुरु नानकपुराकडे जाणा-या रस्त्यावर असलेल्या भाजी मंडईत त्यावेळी लोक खरेदी करत होते. अचानक मोठा आवाज ऐकून लोक घाबरले आणि काही काळ त्यांना परिस्थिती समजली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि तपास सुरू करण्यात आला आहे. सुरक्षा यंत्रणा आणि बीएसएफचे जवानही घटनास्थळी उपस्थित आहेत. अधिका-यांचे म्हणणे आहे की, तपास पूर्ण झाल्यानंतरच परिस्थिती स्पष्ट केली जाउ शकेल. जालंधर पोलिस आयुक्त धनप्रीत कौर म्हणाल्या- स्कूटीला आग लागल्यानंतरच स्फोट झाला आहे. सध्या हीच माहिती मिळाली आहे. स्कूटीवर दोन मुले आली होती, दोन्ही मुलांना पोलिस आणि सुरक्षा दलांनी ताब्यात घेतले आहे.

## SRPF क्रमांक 5 अंतर्गत घेण्यात आलेली भरती स्थगित

**मुंबई/ पुणे :** महाराष्ट्र पोलीस भरती अंतर्गत SRPF गट ५, दौंड लेखी परीक्षेत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका खासगी प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकातील १०० पैकी तब्बल ८५ प्रश्न जसेच्या तसे उचलण्यात आले होते.पोलीस उपमहानरीक्षक पुणे यांनी संबंधित प्रकरणी सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५, दौंड यांचे अधिपत्याखालील सन २०२४-२५ सशस्त्र पोलीस शिपाई भरतीसाठी लेखी परीक्षा दिनांक ०२.०५.२०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५, दौंड यांनी घेतलेल्या लेखी परीक्षेमधील प्रश्नपत्रिकेत १०० पैकी ८५ प्रश्न हे महाराष्ट्र पब्लीकेशन पोलीस भरती प्रश्नपत्रिका सराव प्रश्नसंच १० यामधील असल्याबाबतच्या तक्रारी माध्यमांद्वारे प्राप्त झालेल्या आहेत. त्याअनुषंगाने पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., पुणे यांच्यामार्फत दिनांक ०४/०५/२०२६ पासून याप्रकरणी सखोल चौकशी सुरु करण्यात आली आहे. समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५, दौंड यांची भरती प्रक्रिया पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आली आहे. सदर चौकशी अहवाल प्राप्त होताच. पुढील योग्य कार्यवाही करण्यांत येईल. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी या प्रकरणावर आपल्या राज्यात स्पर्धा परीक्षा देणा-या तरुणांच्या आयुष्याशी शासन कसा खेळ करतंय पाहा म्हटलं होतं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली होती. महाराष्ट्र पोलीस भरती अंतर्गत एसआरपीएफ गट ५ दौंड येथे रविवारी लेखी परीक्षेचा पेपर पाडला. मात्र या पेपरच्या स्वरूपाबाबत राज्यातील हजारो विद्यार्थ्यांमधे संतापाचे वातावरण तयार झाले आहे. कारण या परीक्षेत महाराष्ट्र पब्लिकेशन अकॅडमीने तयार केलेल्या प्रश्नसंचामधील तब्बल ८५ प्रश्न जसेच्या तसे घेण्यात आल्याची बाब समोर आलेली आहे. पोलीस दलासारख्या महत्वाच्या भरतीचे प्रश्नसंच स्वतः तज्ञ अधिका-यांनी काढणे अपेक्षित असताना एकाच पुस्तकातील ८५ प्रश्न प्रशासनाने घेतलेच कसे म्हटलंय.

## हरताच ममतादीदींना इंडिया आघाडी आठवली

**कोलकाता/वृत्तसंस्था :** मी राजीनामा देण्यासाठी लोकभवनात जाणार नाही. आम्ही पक्षाच्या सदस्यांसोबत आमच्या पुढील रणनीतीवर चर्चा करू. मी भाजपाचे अत्याचार यापुढे सहन करणार नाही. मी पुन्हा रस्त्यावर उतरेन. इंडिया आघाडी माझ्यासोबत आहे. सोनिया गांधी यांनी मला फोन केला. राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, उद्धव ठाकरे, हेमंत सोरेन आणि तेजस्वी यादव या सर्वांनी माझ्याशी संपर्क केला. इंडिया आघाडी माझ्यासोबत असल्याचे त्यांनी मला सांगितले. अखिलेश यादव उद्या येत आहेत, असे तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केले.




### राजीनामा देणार नाही, सगळे पाठिशी

प.बंगाल विधानसभा निवडणुकीत यंदा मतदारांनी १५ वर्षांपासूनचे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचे सरकार पायउतार करीत गेल्या सुमारे ५० वर्षांपासून राज्यात ठराविक काळानंतर सत्तापालट घडवून आणारी एकतर्फी निवडणुकीची परंपरा कायम राखली. पश्चिम बंगालमध्ये भाजपाला तब्बल २०६ जागा मिळाल्या. तर तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. भवानीपूर मतदारसंघात सुवेंदू अधिकारी यांनी तब्बल १५ हजार १०५ मतांनी ममता बॅनर्जी यांचा मोठा पराभव केला. सुवेंदू अधिकारी यांना एकूण ७३ हजार ९१७ मते मिळाली, तर ममता बॅनर्जी यांना ५८ हजार ८१२ मतांवर समाधान मानावे लागले. यानंतर आता मंगळवारी पत्रकार परिषदेत बोलताना ममता बॅनर्जी यांनी भाजपावर जोरदार टीका करत अनेक गंभीर आरोपही केले.

आम्ही निवडणूक हरलेलो नाही, आमचा पराभव करण्यात आला आहे. भाजपाने जिंकण्यासाठी निवडणूक आयोगाचा वापर केला. आमची लढाई भाजपाशी नव्हती, तर निवडणूक आयोगाशी होती. मी माझ्या आयुष्यात अशी निवडणूक पाहिली नाही. २००४ पासून मी असे अत्याचार पाहिले नाहीत. निवडणूक आयोग हाच मुख्य खलनायक आहे. SIR मधून ९० लाख मते काढून टाकण्यात आली. भाजपाने १०० जागा चोरल्या आहेत. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी आम्हाला (पान २ वर)

### भाजपाने आमच्या लोकांचा छळ करायला सुरुवात केली आहे

आता मी मुक्त आहे. मला काही काम करायचे आहे. पण आम्ही लढा थांबवणार नाही. भाजपाने आमच्या लोकांचा छळ करायला सुरु वात केली आहे. त्यांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या कुटुंबांवरही हल्ला केला आहे. भाजपाने अत्याचार करण्याची धमकी दिली. भाजपने आपल्या गुंडांमार्फत हल्ले चढवले आहेत. पोलीस नुसतेच बसून आहेत. आम्ही 'आम्हाला बदल हवा, सूड नको' अशी घोषणा दिली. ही सैनिकांची फौज आहे की गुंडांची? अशी विचारणा ममता बॅनर्जी यांनी केली.

## होरमुझच्या समुद्रात तणाव वाढला

**दुबई/तेहरान/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियामध्ये युद्धाचे ढग अधिक गडद झाले असून होरमुझच्या सामुद्रधुनीत मोठी लष्करी चकमक उडाल्याचे वृत्त आहे. इराणच्या माध्यमांनी दिलेल्या खाळबाळजानाक दाव्यानुसार, अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात ५ जणांचा मृत्यू झाला आहे. दुसरीकडे, संयुक्त अरब अमिरातीवर इराणकडून क्षेपणास्त्र डागण्यात आल्याने या प्रदेशातील परिस्थिती अत्यंत स्फोटक बनली आहे. इराणच्या फार्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, होरमुझच्या सामुद्रधुनीजवळ अमेरिकन नौदलाने केलेल्या कारवाईत ५ जणांचा बळी गेला आहे. इराणचा दावा आहे की, अमेरिकन युद्धनौकांनी आंतरराष्ट्रीय सागरी नियमांचे उल्लंघन केले आणि इशारे देउनही माघार न घेतल्याने ही



■ अमेरिकन हल्ल्यात ५ जणांचा मृत्यू
■ UAE वर क्षेपणास्त्र हल्ला

संघर्षाची स्थिती निर्माण झाली. मात्र, अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने त्यांच्या कोणत्याही जहाजाला इजा झाली नसल्याचे स्पष्ट करत इराणचे दावे फेटाळून लावले आहेत.

**UAE वर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ला-** होरमुझमधील तणावाच्या दरम्यानच, इराणने संयुक्त अरब अमिरातीला लक्ष्य केले आहे. मिळालेल्या (पान २ वर)

### राज्यातील शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा

## 31 मे पर्यंत रिक्तजागा भरण्याचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षक भरतीची वाट पाहणा-या लाखो उमेदवारांसाठी दिलासादायक बातमी समोर आली असून अनेक महिन्यांपासून रखडलेली भरती प्रक्रिया आता वेगाने पुढे सरकणार असून राज्यभरात मेगा शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षण विभागाने सर्व शाळांना ३१ मे २०२६ पर्यंत रिक्त जागांवर शिक्षक भरती करण्याचे आदेश दिले आहेत.



या भरती प्रक्रियेत एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. केवळ सध्या रिक्त असलेल्या जागाच नव्हे, तर मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणा-या शिक्षकांमुळे निर्माण होणा-या संभाव्य रिक्त पदांचाही समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे उपलब्ध पदांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे. परिणामी अधिकाधिक पात्र उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार असल्याने या निर्णयाचे स्वागत होत आहे. भरती प्रक्रियेची वेळापत्रक देखील निश्चित करण्यात आले आहे. १ मे ते ३१ मे या कालावधीत सर्व शाळा व्यवस्थापनांनी त्यांच्या रिक्त पदांची माहिती पवित्र पोर्टलवर नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंतर जून महिन्यात उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार आणि गुणांच्या आधारे शाळांचे पसंतीक्रम निवडण्याची संधी मिळणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असल्याने पारदर्शकता वाढणार आहे.

**टैट परीक्षेला मोठा प्रतिसाद**

गेल्या वर्षी झालेल्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टीएआयटी) परीक्षेला मोठा प्रतिसाद मिळाला होता. सुमारे २ लाख २८ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती, त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. या उमेदवारांपैकी १ लाख ७० हजार १०८ जणांनी स्व-प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण केली आहे. या पात्र उमेदवारांना भरती (पान २ वर)

## नसरापूर प्रकरणातील मुलीचा मृत्यू मोजा कोंबल्यामुळे

### ● अंगावर जखमांचे व्रण ● पोस्टमार्टम रिपोर्टमधील शॉकिंग माहिती

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका साडेतीन वर्षांच्या मुलीवर एका नराधमाने अत्याचार करुन तिला निर्घृणपणे संपवल्याची घटना १ मे रोजी घडली होती. या घटनेनंतर राज्यभरात संताप व्यक्त होत आहे. लहान मुलीवर अत्याचार करणा-या नराधमाला तात्काळ फाशी द्यावी, या मागणीसाठी नसरापूरचे ग्रामस्थ आक्रमक आहेत.अशातच या चिमुरड्या मुलीचा शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. या अहवालातील माहिती अंगावर अक्षरश: काटा आणणारी आहे. तर या घटनेतील चिमुरड्या मुलीचा मृत्यू कशामुळे झाला त्याची माहिती देखील समोर आली आहे. नसरापूर घटनेतील पीडित मुलीचा मृत्यू ॲस्फिक्सिया मुळे झाल्याचे समोर आले आहे. ही माहिती पोस्टमार्टम रिपोर्ट मधून माहिती समोर आली आहे.

**तोंडात मोजा कोंबल्यामुळे चिमुरडीचा श्वास कोंडला**




ॲस्फिक्सिया म्हणजे श्वास कोंडणे, याच कारणामुळे चिमुरडीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. नराधमाने चिमुरडीच्या तोंडात मोजा कोंबल्यामुळे चिमुरडीचा श्वास कोंडला गेला आणि त्यात तिचा जीव गेला. तसेच पीडित चिमुरडीच्या अंगावर जखमा आल्या आढळून आल्याची माहिती पोस्टमार्टम रिपोर्ट मधून माहिती समोर आली आहे. जेव्हा आपल्याला श्वास घेता येत नाही किंवा शरीरात ऑक्सिजन कमी पडतो, तेव्हा त्या अवस्थेला ॲस्फिक्सिया म्हणतात.

**गोठ्यात गाय दाखविण्याचा बहाणा घातक ठरला-** पोस्टमार्टम रिपोर्टमधून समोर आलेल्या माहितीवरुन नराधमाने या मुलीवर अत्याचार केल्यानंतर तिला किती निर्घृणपणे मारले होते, हे दिसून येत आहे. ही मुलगी आपल्या पालकांसह पुण्यात राहत होती. ती उन्हाळ्याच्या सुटीसाठी आपल्या आजोळी नसरापूर येथे गेली होती. ती खेळत असताना आरोपीने तिला गोठ्यात वासरु दाखवायला नेतो सांगून आपल्यासोबत नेले होते आणि तिच्यावर अत्याचार केले होते. या प्रकरणातील आरोपी असलेल्या नराधमावर यापूर्वीही महिला लैंगिक अत्याचाराचे दोन गुन्हे दाखल आहेत. नसरापूरमधील पीडीतेच्या शवविच्छेदन अहवालात अनेक हादरवणा-या गोष्टी नमूद करण्यात आल्या आहेत. या अहवालात नमूद केल्याप्रमाणे मुलीच्या तोंडात मोजा कोंबण्यात आला होता.

## कतारच्या हवाई हद्दीतून अमेरिकन विमान बेपत्ता

### इमर्जन्सी सिग्नल दिल्यानंतर रडारवरून गायब

**तेल अवीव/तेहरान-** मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कतारवर आपत्कालीन संकेत दिल्यानंतर अमेरिकी हवाई दलाचे एक केसी-१३५ स्ट्रॅटोटँकर विमान बेपत्ता झाले आहे. केसी-१३५ स्ट्रॅटोटँकरला 'उडणारे गॅस स्टेशन' म्हणून



ओळखले जाते, कारण ते हवेतच इतर लष्करी विमानांमध्ये इंधन भरण्यास सक्षम आहे.इराणच्या फार्स वृत्तसंस्थेनुसार, विमानाने उड्डाणादरम्यान '७७००' हा आपत्कालीन संकेत दिला होता. जेव्हा विमानात गंभीर समस्या निर्माण होते, तेव्हा हा संकेत दिला जातो.हे विमान संयुक्त अरब अमिरातीमधील (UAE) अल धाफ्रा हवाई तळावरून उड्डाण करून पर्शियन आखातावरून जात असताना कतारजवळ त्याचा संकेत काही काळासाठी नाहीसा झाला. उड्डाण माहितीनुसार, विमानाने काही वेळ घिरट्या घातल्या आणि नंतर खाली उतरू लागले. या बिघाडाचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही तांत्रिक समस्या होती की आणखी काही, याबद्दल अमेरिकेने कोणतीही माहिती दिलेली नाही. अमेरिकेने आपले मोठे युद्धजहाज, युएसएस जार्ज एच. डब्ल्यू. बुश, होर्मुझ येथे तैनात केले आहे. हे पाउल डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'प्रोजेक्ट फ्रीडम' या नवीन योजनेचा भाग आहे, ज्याचा उद्देश होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अडकलेल्या जहाजांना सुरक्षितपणे बाहेर काढणे आहे.

## इंडिगोच्या विमानात पॉवर बँकचा स्फोट

### ५ प्रवासी जखमी, बॅगमध्ये ठेवले होते

**चंदीगड-** हैदराबादहून चंदीगडला येणा-या इंडिगो फ्लाइट ६क१०८ मध्ये मंगळवारी पावर बँकचा स्फोट झाला. यात ५ प्रवासी



जखमी झाले. पावर बँक एका प्रवाशाच्या बॅगेत ठेवलेली होती.ही घटना त्यावेळी घडली, जेव्हा विमानतळावर विमान उभे होते. या घटनेनंतर विमानात धूर भरला, ज्यामुळे प्रवासी घाबरले. प्रवाशांना आपत्कालीन दरवाजातून बाहेर काढण्यात आले.काही फोटोही लोकांनी शेअर केले आहेत. ज्यात एका महिलेला रुग्णवाहिकेत ठेवण्यात आले होते. क्रू मेंबर्सनी तात्काळ अग्निशमन उपकरणांचा वापर करून आगीवर नियंत्रण मिळवले. पॉवर बँकचा स्फोट कसा झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिस आणि विमानतळ प्राधिकरणाचे पथक तपास करत आहे.प्रवाशांना उतरवण्यासाठी २ स्लाइडर उघडण्यात आले होते. विमानतळावरील ग्राउंड स्टाफ प्रवाशांना सुरक्षितपणे उतरवण्यात गुंतला होता.प्रवाशांना उतरवण्यासाठी २ स्लाइडर उघडण्यात आले होते. विमानतळावरील ग्राउंड स्टाफ प्रवाशांना सुरक्षितपणे उतरवण्यात गुंतला होता.विमान लँड झाल्यावर हा अपघात झाला. विमानतळ कर्मचा-यांनी प्रवाशांना बाहेर काढले.विमान लँड झाल्यावर हा अपघात झाला. विमानतळ कर्मचा-यांनी प्रवाशांना बाहेर काढले.

**विमान रिकामे केले, प्रवाशांना टर्मिनलपर्यंत पोहोचवले-** इंडिगोने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ विमान रिकामे करण्यात आले आणि संबंधित अधिका-यांना त्वरित माहिती देण्यात (पान २ वर)



# मेळघाटात बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात 'निसर्ग अनुभव'







**अमरावती/प्रतिनिधीः-** निसर्ग प्रेमी ज्या गोष्टीची आतुरतेने वाट पाहत होते, असा 'निसर्ग अनुभव' उपक्रम १ मे २०२६ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या पर्वावर मेळघाट व्याघ्र प्रकल्पात उत्साहात पार पडला. पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात सलग १२ तास घनदाट वनातील २६४ मचाणांवर रात्रभर बसून पाणवठ्यावर येणाऱ्या वन्य प्राण्यांच्या निरीक्षणाचा थरारक अनुभव निसर्गप्रेमींनी मनमुरादपणे लुटला. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अकोट, गुगामल, सिपना, मेळघाट वन्यजीव, अकोला आणि पांढरकवडा या सहा वन्यजीव विभागांमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला होता. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, यवतमाळ, औरंगाबाद, अकोला, अमरावती या जिल्ह्यांसह मध्य प्रदेश आणि तेलंगणा राज्यातूनही पर्यटकांनी मोठ्या संख्येने गुगल फॉर्मद्वारे नोंदणी केली होती.

या रोमांचक मोहिमेत मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या मुख्य क्षेत्रात ३० वाघ, १६ बिबट, ११० अस्वल, ४१३ रानगवा, ८५६ सांबर आणि १२१ नीलगाय या वन्यजीवांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. तसेच पांढरकवडा वन्यजीव विभागात ३ वाघ, २ बिबट, १६४ रानडुक्कर, २५ अस्वल, ६७ नीलगाय व १५३ चितळ दिसून आले. अकोला वन्यजीव विभागातही १६ बिबट, २५ अस्वल, २ तडस, २३ कोल्हा, ६० रानडुक्कर, २०२ चितळ आणि ३६५ नीलगाय असे वैविध्यपूर्ण वन्यजीव पर्यटकांच्या दृष्टीस पडले. मचाणावर बसण्यापूर्वी संबंधित वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी पर्यटकांना आवश्यक सूचना दिल्या होत्या आणि प्रत्येक निसर्गप्रेमीसोबत सुरक्षेसाठी वन कर्मचारी व निरीक्षणासाठी पत्रक देण्यात आले होते.

## -३३ वाघ आणि शेकडो वन्यजीवांचे पर्यटकांना दर्शन

रात्रीच्या वेळी जंगलात शांतता, रातकिड्यांची किरकिर आणि हवेची झुळूक अशा नैसर्गिक वातावरणात वन्यजीवांना जवळून पाहणे, हा पर्यटकांसाठी एक विलोभनीय अनुभव ठरला. पौर्णिमेच्या प्रकाशात उजळलेले मेळघाटचे घनदाट जंगल आणि प्राण्यांचे आवाज यामुळे सहभागी पर्यटक भारावून गेले होते. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने केलेल्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल आणि वनविभागाच्या सहकार्याबद्दल पर्यटकांनी समाधान व्यक्त करत, वाघांना व इतर वन्यजीवांना नैसर्गिक अधिवासात अनुभवल्याचा विशेष आनंद व्यक्त केला आहे.

# जिवघेण्या हल्ल्यातील मुख्य आरोपी अखेर जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** हत्या करण्याच्या प्रयत्नाच्या गंभीर गुन्ह्यात दीर्घकाळापासून फरार असलेल्या मुख्य आरोपीला अखेर गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने अटक केली आहे. मनोज उर्फ मन्या राजरतन डोंगरे (वय ३०, रा. लक्ष्मी नगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुद्ध विहार परिसरात सुरू असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान मनोज डोंगरे व त्याच्या साथीदारांकडून मारहाण सुरू होती. ही मारहाण थांबवण्याचा प्रयत्न सचिन निरगुळे यांनी केला. त्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार देण्यासाठी प्रयत्न केल्याचा राग मनात धरून आरोपीने सूड उगवण्याचे ठरवले. यानंतर मनोज डोंगरे याने आपल्या सात साथीदार व नातेवाईकांसह बेकायदेशीर जमाव तयार केला. या जमावाने फिर्यादीचे वडील नरेंद्र निरगुळे यांच्यावर चाकू आणि लोखंडी रॉडने जिवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात नरेंद्र निरगुळे गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. घटनेनंतर मुख्य आरोपी फरार झाला होता. पोलिसांकडून त्याचा सातत्याने शोध सुरू असताना, नुकतीच गुप्त माहिती मिळाली की आरोपी नवसारी रिंग रोडवरील लोखंडे पेट्रोल पंप परिसरात येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून अत्यंत शिताफीने त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आशीष दौंड करत आहेत. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथक प्रमुख योगेश श्रीवास तसेच विजया पंधरे, समाधान वाठोरे, भरत वानखडे आणि सहकाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# इयत्ता १२ वी पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे तर्फे घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षेसाठी आवेदनपत्रे ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल दि. २ मे २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झाल्यानंतर ही पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे. पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत विद्यार्थी तसेच ITI विषय घेणारे विद्यार्थी यांना या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची अधिकृत वेबसाइट www.mahahsscboard.in वर भरावीत, असे पुणे राज्य मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत ५ ते १५ मे २०२६ असून, विलंब शुल्कासह १६ ते २० मे २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहे. महाविद्यालयांनी RTGS/NEFT द्वारे परीक्षा शुल्क २१ मे पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांची यादी व प्रिलिस्ट २५ मे पर्यंत विभागीय मंडळाकडे सादर करावी लागणार आहे. अर्ज सबमिट केल्यानंतर महाविद्यालयांना 'कॉलेज लॉगिन'मधून प्रिलिस्ट उपलब्ध होणार असून, त्याची पडताळणी करून विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक राहणार आहे. तसेच प्राचार्यांनी प्रत्येक पानावर शिक्का व स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. ऑनलाईन अर्ज भरताना फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती स्वयंचलितपणे उपलब्ध होणार आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### हरताच ममतादीदींना इंडिया

हरवण्यासाठी हातमिळवणी केली. भाजपाने आम्हाला हरवण्यासाठी शक्य असलेले प्रत्येक डावपेच वापरले. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांवर हल्ला केला, या शब्दांत ममता बॅनर्जी यांनी निशाणा साधला.

महाराष्ट्र, बिहारप्रमाणे पश्चिम बंगालमध्ये लोकशाहीची हत्या

महाराष्ट्र आणि बिहारप्रमाणे आता पश्चिम बंगालमध्येही लोकशाहीची हत्या झाली आहे. इंडिया आघाडी एकजूट आहे आणि माझ्यासोबत आहे. मतमोजणीच्या पहिल्या फेरीनंतर, भाजपा अनेक जागांवर आघाडीवर असल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांनी द्यायला सुरु वात केली. भाजपाच्या गुंडांनी धक्काबुक्की केली, मारहाण केली. जेव्हा मी बूथवर पोहोचले, तेव्हा सीएपीएफने मला आत जाउ नका असे सांगितले. मी आरओकडे लेखी तक्रार दाखल केली. पण आम्ही परत येउ. आम्ही लढू, असा दावा ममता बॅनर्जी यांनी केला. दरम्यान, गैरप्रकारांमुळे आमचा पराभव झाला आहे. आम्ही यावर कारवाई करत आहोत. आम्ही १० सदस्यीय सत्यशोधक समिती स्थापन केली आहे. ज्या ठिकाणी आमच्या पक्षाची कार्यालये ताब्यात घेण्यात आली, त्या सर्व ठिकाणी हे पथक भेट देईल. अभिषेक बॅनर्जी यांच्या कार्यालयाचीही तोडफोड करण्यात आली. आम्ही हरलेलो नाही. भाजपाने हा विजय चोरला आहे. केंद्रीय सुरक्षा दलांना असे वागताना मी कधीही पाहिले नाही, असे ममता दीदी यांनी म्हटले आहे.

### होरमुझच्या समुद्रात

माहितीनुसार इराणकडून UAE च्या दिशेने १५ हून अधिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागण्यात आले. यातील बहुतांश हल्ले UAE च्या हवाई संरक्षण प्रणालीने निकामी केले. फुजैराह या उर्जा केंद्राजवळ झालेल्या ड्रोन हल्ल्यात ३ भारतीय जखमी झाले असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. हल्ल्यानंतर सुरक्षिततेचा उपाय म्हणून UAE मधील शाळांना ऑनलाइन शिक्षण सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**ट्रम्प यांचा कडक इशारा-** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट शब्दांत बजावले आहे. ट्रम्प म्हणाले की, जर इराणने होरमुझमधून जाणा-या अमेरिकन जहाजांना किंवा व्यापारी जहाजांना लक्ष्य केले, तर त्यांना जगाच्या नकाशावरून पुसून टाकू. अमेरिकेने अडकलेली व्यापारी जहाजे बाहेर काढण्यासाठी प्रोजेक्ट फ्रीडम ही मोहीम सुरू केली आहे, ज्याला इराणने कडाडून विरोध दर्शवला आहे.

**जागतिक बाजारपेठेवर परिणाम-** या ताज्या संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. होरमुझची सामुद्रधुनी ही जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. इराणने या मार्गाची नाकेबंदी केल्यास जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसू शकतो

### राज्यातील शिक्षक भरतीचा

प्रक्रियेत प्राधान्य दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**पवित्र पोर्टलमधून प्रक्रिया पार पडणार-**या भरतीत वशिलेबाजीला आळा घालण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया पार पडणार असल्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होणार आहे. तसेच सर्व शाळांना त्यांच्या आरक्षणानुसार बिंदुनामावली (रोस्टर) तपासूनच जाहिरात देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि न्याय्य होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास मदत**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक पदे पूर्णपणे गुणवत्तेनुसार, मुलाखतीशिवाय भरली जाणार आहेत. तर खासगी संस्थांना प्रत्येक एका जागेसाठी दहा उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्याची मुभा देण्यात आली आहे. उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार विविध शाळांची निवड करता येणार आहे. या सर्व प्रक्रियेच्या अंमलबजावणीमुळे राज्यातील शिक्षकांची कमतरता दूर होउन शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास मदत होईल असा विश्वास शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

### इंडिगोच्या विमानात पॉवर बँकचा

आली. सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे टर्मिनलपर्यंत पोहोचवण्यात आले, जिथे एअरलाइनची टीम त्यांच्या मदतीसाठी कार्यरत होती.

एअरलाइननुसार, विमान पुन्हा सेवेत आणण्यापूर्वी आवश्यक तांत्रिक तपासणी केली जाईल. इंडिगोने सांगितले की, प्रवासी आणि क्रूची सुरक्षा ही त्यांची सर्वोच्च प्राथमिकता आहे.प्रवाशांना स्लाइडरने बाहेर काढले जात असताना, सीट २५क़वर बसलेल्या प्रवासीच्या घोट्याला किरकोळ दुखापत झाली. तिला रुग्णालयात नेण्यात आले. प्रवाशांना स्लाइडरने बाहेर काढले जात असताना, सीट २५क़वर बसलेल्या प्रवासी ऱ्याच्या घोट्याला किरकोळ दुखापत झाली. तिला रुग्णालयात नेण्यात आले.

विमानात १९८ प्रवासी होते

सूत्रांनुसार, इंडिगोचे विमान ६क१०८ (त्तझ्क़-क्ष्ज्र्क) दुपारी ३:२९ वाजता सुरक्षितपणे उतरले. विमानात १९८ प्रवासी, दोन मुले आणि सहा क्रू मेंबर्स होते. लँडिंगनंतर विमान वे नंबर-१ कडे जात असताना, सीट ३९क वर बसलेल्या एका प्रवाशाने क्रूला त्याच्या प?वर बँकेला आग लागल्याची माहिती दिली. प?वर बँक फुटल्याची शक्यता वर्तवण्यात आली.केबिन क्रू ने तात्काळ अग्निशमन यंत्राच्या मदतीने आग विझवली, परंतु विमानात धूर पसरला. खबरदारी म्हणून आपत्कालीन प्रोटोक?ल लागू करण्यात आले.सुमारे ३:३५ वाजता क्रू मेंबर्सनी आपत्कालीन दरवाजा उघडला आणि प्रवाशांना एअर स्लाइड्सच्या मदतीने बाहेर काढण्यात आले.वायुसेनेची अग्निशमन दलाची टीम ३:३८ वाजता घटनास्थळी पोहोचली, परंतु तोपर्यंत परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आली होती.

### ६० वर्षीय नराधमाचा १० वर्षीय

भरापासून अमिष देत होता. नेहमीप्रमाणे सोमवारी ५ मे रोजी सुद्धा मुलीचे आई-वडील शेतात गेले असता, मुलगी घरात एकटी असल्याचे पाहून नराधमाने मुलीच्या घरात घुसून तिच्यावर अत्याचार केला, घटनेची माहिती कोणाला सांगितल्यास तुझा गळा कापून जीवे मारून टाकण्याची धमकी दिली, यापूर्वी सुद्धा मुलीवर वारंवार अत्याचार करून मुलीला जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे मुलीने घटनेची माहिती कोणालाही सांगितली नव्हती, अखेर सोमवारी ५ मे रोजी मुलीने सदर घटनेची माहिती आई-वडिलांना सांगितली. माहिती ऐकताच आई-वडिलांच्या पायाखालची जमीनस सरकली, आई-वडिल आणि नातेवाईकांनी मुलीला घेऊन थेट चान्नी ठाण्यात धाव घेतली, आणि ठाण्यात मुलीचा जबाब नोंदविण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

### रतन इंडीया पॉवर प्लांट

दाखल झाले आणि परिस्थितीचा आढावा घेत नियोजनबद्ध पद्धतीने पिंजरा लावण्यात आला. त्यात बिबट कैद झाला. या मोहिमेत वन परिक्षेत्र अधिकारी धंदर आणि वनपाल गावनेर यांच्यासह त्यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. संपूर्ण कारवाईत दक्षता आणि शिताफी यांचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले. पकडलेल्या बिबट्याला पुढील तपासणीसाठी मोर्शी येथील वन विभागाच्या कार्यालयात नेण्यात आले. पशुवैद्यकीय तपासणीत तो पूर्णपणे निरोगी असल्याचे स्पष्ट झाले. आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर वन विभागाने त्याला सुरक्षित अधिवासात सोडून दिले. या घटनेमुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले असले, तरी वन विभागाच्या वेगवान आणि सुयोग्य कारवाईमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त होत आहे.

### बनावट डिटर्जंट कारखान्याचा

मोठ्या प्रमाणावर रसायने, कच्चा माल, तयार पावडर, साबण तसेच बनावट लेबल्स आणि पॅकिंग साहित्य आढळून आले. निकृष्ट दर्जाचा माल आकर्षक पॅकिंगमध्ये भरून बाजारात विक्रीसाठी पाठवला जात असल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे. यामुळे ग्राहकांची केवळ आर्थिक फसवणूकच नव्हे, तर त्यांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होत असल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी जुनैद खान यासीन खान (वय २८), प्रफुल डोंगफोडे (वय ४८), शेख भुरू शेख मुनीर (वय ५०) आणि शेख कलीम शेख माजिद (वय ४०) या चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे, संबंधितांकडे कोणतेही वैध परवाने नसल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. दरम्यान, पोलिसांनी जप्त केलेल्या साहित्यात डिटर्जंट पावडरचे शेकडो पोते, साबणाचे बॉक्स, कच्चा माल तसेच लाखो रुपयांची पॅकिंग मशिनरी यांचा समावेश आहे. या रॅकेटमागे आणखी कोणाचा हात आहे का, कच्चा माल कुठून आणला जात होता आणि तयार माल कोणत्या बाजारपेठेत पाठवला जात होता, याचा सखोल तपास सुरू आहे. पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला असून, शहरात बनावट माल तयार करून विक्री करणाऱ्यांवर अशाच प्रकारे कठोर कारवाई सुरूच राहणार आहे.

### पत्नीची हत्या, पती गजाआड

तो प्रियांशीला वारंवार मारहाण करत असे. इतकेच नव्हे, तर कामावर जाताना तिला घरात कोंडून बाहेरून कुलूप लावून जात असल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे. महिनाभरापूर्वी त्याने तिला घराबाहेर हाकलून दिल्याची माहितीही पोलिस तपासात उघड झाली आहे. सोमवारी दुपारी सुमारास आरोपीने प्रियांशीवर लोखंडी कड्याने (हातातील कडा) डोक्यावर, चेहऱ्यावर आणि छातीवर सपासप वार केले. त्यानंतरही लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. गंभीर जखमी झालेल्या प्रियांशीचा जागीच मृत्यू झाला. हत्येनंतर आरोपी घराबाहेर शांतपणे बसून राहिल्याचेही आढळून आले. संध्याकाळी गावातील नागरिकांनी घटनेची माहिती पोलीस पाटील प्रवीण पाथरे यांना दिली. त्यांनी तत्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली. माहिती मिळताच चांदूर बाजार पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. सहाय्यक पोलीस अधीक्षक सागर भामरे यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.

### धन्वंतरी सहकारी संस्थेची

अनुभव असणाऱ्या सहा उमेदवारांना संस्थेच्या आजीवन सदस्यांनी पाठिंबा दिला आहे आणि वैद्यकीय क्षेत्रातील ते उमेदवार विनविरोध निवडून आले आहे. यामध्ये डॉ. अनिल रोहनकर,डॉ. आशिष साबू, डॉ. ओ.जी. मुंदडा, डॉ. मनोज गुप्ता ,डॉ. अविनाश लव्हाळे, डॉ. स्वप्नील शिरभाते यांचा समावेश आहे. शहरातील परवडणारी व दर्जेदार आरोग्य सेवा देणाऱ्या धन्वंतरी सहकारी रुग्णालयाच्या संचालक मंडळ निवडणुकीला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.२०२६ ते २०३१ या कार्यक्रमासाठी ही निवडणूक होत आहे. विकास ,पारदर्शकता आणि रुग्णसेवेचे मुद्दे केंद्रस्थानी आहे. संस्थेच्या सहा गटातील बारा उमेदवारांना सदस्यांचा ठोस पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे. आजवर संचालक मंडळची निवड झाली नाही. सर्व संचालक बिनविरोध एकमताने निवडून आले आहे. ही परंपरा आजही कायम राहावी अशी आमची इच्छा आहे. आमच्या उमेदवारांच्या विरोधात ज्यांनी नामांकन अर्ज दाखल केला आहे त्यांनी संस्थेच्या हितासाठी आपले नामांकन मागे घ्यावी अशी विनंती करण्यात आली आहे. या निवडणूक मैदानात सर्वसाधारण मतदार संघातून प्रमोद झाडे, ओंकारराव बंड, अशोक ठाकरे, अजय दातेराव, गजानन रडके, राजेश गोयंका, प्रतापराव भुयार, अनुसूचित जाती-जमाती संघातून संजय खडसे, विमुक्त भटक्या व विशेष मागासवर्ग संघातून अरुण बांबल, इतर मागासवर्गीय संघातून अमित गावंडे, महिला राखीव संघातून वंदना वानखडे व मीनल देशमुख रिंगणात आहे. संस्थेच्या हितासाठी या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. सुमारे २८०० सदस्य या निवडणुकीत मतदान करणार असल्याची माहिती आहे. पत्रकार परिषदेमध्ये प्रा.अशोक ठाकरे, डॉ. ओ.जी मुंदडा उपस्थित होते.

### फ्रेजरपुरा हद्दीत हातभट्टीवर

मोहाचा सडवा जप्त केला. याशिवाय दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे इतर साहित्य जागीच नष्ट करण्यात आले. एकूण ७५ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (क)(फ)(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### अपार्टमेंटमध्ये मानवी सांगाडा

महाविद्यालयातील विद्यार्थी राहत होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी हा फ्लॅट रिकामा केला होता. सोमवारी नवीन विद्यार्थी राहण्यासाठी आल्यावर साफसफाई करताना त्यांना हा सांगाडा दिसून आला. सुरुवातीला तो खरा असल्याचे समजून त्यांनी तात्काळ पोलिसांना कळवले. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी सखोल तपास केल्यानंतर हा सांगाडा खरा नसून वैद्यकीय शिक्षणासाठी वापरला जाणारा नमुना असल्याचे स्पष्ट झाले. सदर फ्लॅटमध्ये यापूर्वीही मेडिकलचे विद्यार्थी राहत असल्याने त्यांनी अभ्यासासाठी वापरलेला सांगाडा तिथेच राहिला असावा, अशी माहिती पुढे आली. हा सांगाडा पीडीएमसीच्या विद्यार्थ्यांचा असल्याचेही समजते. सांगाडा बनावट असल्याचे स्पष्ट होताच विद्यार्थ्यांसह नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

### जमील कॉलनी येथील स्वच्छतेच्या

पसरलेल्या कचरा व घाणीमुळे संतप्त झालेल्या नगरसेवकांनी थेट प्रशासनाला जबाबदार धरले आणि लालखडी चौकात आरोग्य अधिकारी डॉ. अजय जाधव आणि एस आय राठोड यांना बोलवून त्यांच्या गळ्यात फुलांची माळ घालून आक्रोश व्यक्त केला. चार दिवसात जर या समस्येचे निराकरण नाही झाले तर ठिया आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. नगरसेवकांच्या आक्रमक पवित्र्यामुळे येथे तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. माहितीनुसार मुस्लिम बहुल क्षेत्रामध्ये घाणीचे साम्राज्य पसरले आहे. अनेक ठिकाणी नाल्या चोकअप झालेल्या आहे. मंगळवारी सकाळी बिस्मिल्ला नगर परिसरात नाली चोकअप झाल्याने पाणी रस्त्यावर आणि लोकांच्या घरात घुसत होते. प्रशासनच्या निष्काळजीपणामुळे संतापलेल्या प्रभागातील नगरसेवक अब्दुल हमीद, बीबी बतुल हाफिज ताहेर, अहमद, नगरसेविका कुबरा बानो यांचे पुत्र इकबाल साहिल यांनी मंगळवारी सकाळी आरोग्य अधिकारी डॉ.अजय जाधव आणि एसआय राठोड यांना परिसरात बोलावले आणि नियमित स्वच्छतेची मागणी त्यांच्यासमोर केले. सामाजिक कार्यकर्ता इक्बाल साहिल यांनी स्वच्छता मोहिमेच्या अंमलबजावणी बाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.घनकचरा व्यवस्थापन करणाऱ्या संबंधित 'कोणार्क कंपनी'ला कामात सुधारणा करण्यासाठी ४ दिवसांचा कालावधी देण्यात आला असून, त्यानंतर कडक कारवाईचा इशारा दिला आहे. लवकरात लवकर या समस्याचे निराकरण नाही झाले, तर चार दिवसानंतर ठिया आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

### 'ते पन्नास दिवस' कादंबरी

पायदळ जाणाऱ्या व हातांवर पोट असणाऱ्या मजुरांची व्यथा यामध्ये लेखक पवन भगत यांनी मांडली होती. परंतु काही लोकांनी कादंबरीला विरोध केला आणि कादंबरी अभ्यासक्रमातून विद्यापीठाने परीक्षेच्या तोंडावर ४ एप्रिल रोजी रद्द करून त्या जागी धग ही कादंबरी जोडली. या निर्णयाला स्टुडंट फेडरेशन ने विरोध केला आणि उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर निर्णय देताना न्यायालयाने 'ते ५० दिवस ' या कादंबरीला शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमात ठेवण्याचा निर्णय दिला आहे, अशी माहिती आज मंगळवार ५ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये फेडरेशनच्या वतीने देण्यात आली. सदर कादंबरी शिकविण्यासाठी व अध्ययनासाठी किमान ६० तासिका एवढा कालावधी विद्यापीठाने निर्धारित केला होता. परंतु आधीची कादंबरी रद्द करून वेळेवर नवीन कादंबरी लावण्यात आली. त्यामुळे या कादंबरीचे अध्यापन पुरेशा वेळेअभावी होऊ नाही शकले तसेच धग ही कादंबरी विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता उपलब्ध झाली नाही. त्यामुळे विद्यापीठाच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन ने नागपूर कोर्टात धाव घेतली. ॲड.एस एस. सन्याल, ॲड. नीरज खांदेवाले व सहकारी वकिलांनी विद्यार्थ्यांची बाजू कोर्टात मांडली. सोमवार ४ मे रोजी न्यायालयाच्या निर्देशानुसार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असणारे स्वतः न्यायालयात हजर झाले. त्यांनी सदर कादंबरी संदर्भात मिनट्स ऑफ ऑर्डर न्यायालयात सादर केले. विद्यापीठाने नवीन कादंबरीच्या अध्ययनासाठी व अध्यापनासाठी निर्धारित साठ तासिका पूर्ण होत नसल्याचे मान्य केले. तसेच आधीच्या कादंबरीवर परीक्षा घेण्याचे मान्य केले,असून विद्यार्थ्यांकडून पर्याय घेण्यात येईल असे लिहून दिले. विद्यार्थ्यांना जुन्या कादंबरीचा 'ते ५० दिवसचा' पर्याय असून ती माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करण्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना पर्यायानुसार प्रश्नपत्रिकेचे मूल्यांकन करण्यात येईल असेही म्हटले. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षे करिता' ते पन्नास दिवस व धग ' या दोन्ही कादंबरी पैकी एकावर परीक्षा देण्याची संधी मिळाली आहे. ऑल इंडिया फेडरेशनच्या न्यायालयीना संघर्षाला यामुळे यश आले आहे. फेडरेशनचे पदाधिकारी प्रतीक्षा ढोके ,ऋतिक मोरे, महाविद्यालयीन विद्यार्थी प्रितेश शेंडे ,आदेश मेश्राम, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, सागर दुर्योधन यांनी यासाठी सहकार्य केल्याची माहिती पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली.

### सोलर शॉपमधील लाखोंच्या

उमेश शिवलिंगदास भोसले (वय २२, रा. पारधी बेडा, राजुरा) याला अटक केली, तर एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. आरोपींकडून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यात ७५ हजार रुपये किमतीचे ६ मोबाईल फोन तसेच १ लाख १६ हजार ९२५ रुपये किमतीचे ३ डीसी वायर बंडल असा एकूण १ लाख ९१ हजार ९२५ रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक योगेश श्रीवास यांनी केला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम ब्रांचच्या विजया पंधरे, समाधान वाठोरे, योगेश श्रीवास, भरत वानखडे, राजेश गुरेले, मतीन शेख, सुशांत प्रधान, धनराज कुमरे आणि महेश शर्मा यांच्या पथकाने केली.

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मूर्तिजापूर, जि.अकोला यांचे न्यायालय**
**(श्री.पकडे साहेब)**

आर.एम.जे.सी.नं.१२५/२०२६ चौ.ता.११.०६.२०२६

**अर्जदार -** १. अनिता शालिकराम सोनोने
वय ५८० वर्षे, धंदा -
रा.जांब, ता.कारंजा, जि.वाशिम

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी वि.न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत **सिता नरसाजी इंगळे** मयत दिनांक २०.१०.१९९८, रा.जामठी खु., पो.हातगांव, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला यांचे वारस आहेत. उपरोक्त नमुद अर्जदार हे त्यांचे मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहे. या व्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याकरीता चौकशी तारीख ११.०६.२०२६ ही ठेवण्यात आलेली आहे.

त्यापुर्वी या जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकरणात कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप घ्यावयाचा असेल तर त्यांनी ११.०६.२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी विद्यमान न्यायालयात हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप नाही असे समजून सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल, करीता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक १८.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मुर्तिजापूर

अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ बुधवार, ६ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# विशेष अभय योजनेत घोटाळा उघड

## खोट्या कागदपत्रांद्वारे शासनाची फसवणूक

### कठोर कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

*येथे 'विशेष अभय योजना–२०२५' अंतर्गत जमीन नियमन प्रक्रियेत गंभीर अनियमितता आणि शासनाची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने महसूल .विभागात खळबळ उडाली आहे. सिंधी कॅम्प परिसरातील मौजे कारंजा, नझुल शीट क्रमांक १०, प्लॉट क्रमांक ६१ (क्षेत्रफळ १३९.३५ चौ.मी.) या भूखंडासंदर्भातील हे प्रकरण चर्चेचा विषय ठरले आहे.*

८ जुलै २०२५ रोजी भूमापक श्रीमती आर. एस. लोखंडे आणि तलाठी श्रीमती ए. आर. चिकटे यांनी स्थळनिरीक्षण करून अहवाल सादर केला होता. त्यानंतर २५ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करत पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली.

दरम्यान, वारस अर्जदार संदीप लीलाराम पंजवाणी यांनी २६ ऑगस्ट २०२५ रोजी भोगवटदार वर्ग–०२ वरून वर्ग–०१ (फ्री होल्ड) करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला. मात्र, या प्रस्तावात वडील लीलाराम ब्रिजलाल पंजवाणी यांना मयत दाखवून खोटी माहिती सादर केल्याचा गंभीर आरोप आहे. प्रत्यक्षात ते जिवंत असल्याचे पुढे स्पष्ट झाले.

या प्रकरणात सहाय्यक महसूल अधिकारी प्रवीण चव्हाण यांनी कागदपत्रांची शहानिशा न करता अर्जदारासोबत संगनमत करून प्रस्ताव पुढे पाठवल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, आवश्यक पडताळणी न करताच उपविभागीय अधिकाऱ्यांनी २० फेब्रुवारी २०२६ रोजी नियमनाचा आदेश पारित केल्याचेही समोर आले आहे.

माहितीतील विसंगती उघड झाल्यानंतर ३० मार्च २०२६ रोजी हा आदेश रद्द करण्यात आला. मात्र, यापूर्वी आवश्यक वरिष्ठ परवानगी न घेता प्रक्रिया पार पाडल्याने प्रशासकीय त्रुटींवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

अर्जदाराने पाचशे रुपयांच्या मुद्रांकावर खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप असून, संबंधितांवर भारतीय दंड संहितेअंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, नगरपरिषद परवानगीशिवाय उभारलेले बांधकाम पाडून भूखंड शासन जमा करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे कारंजा तालुका अध्यक्ष तथा वाशिम जिल्हा संपर्कप्रमुख विलास राऊत यांनी ४ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी वाशिम यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. त्यांनी संपूर्ण प्रकरणाची खातेनिहाय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

जिल्हाधिकाऱ्यांनीही या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत सखोल चौकशी करून दोषींवर लवकरात लवकर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले आहे. या घटनेमुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कारंजा भाजपच्या वतीन आनंदोत्सव साजरा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरात सोमवारी (दि. ४ मे) रात्री ८ वाजाता वातावरण अक्षरशः जल्लोषमय झाले, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर पश्चिम बंगाल , आसाम व पदुच्चेरी येथे भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या अभूतपूर्व विजयाचा भव्य आनंदोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

पश्चिम बंगाल , आसाम आणि पदुच्चेरी विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षाला मिळालेल्या उल्लेखनीय यशानिमित्त हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. रात्री ८ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात फटाक्यांची आतिषबाजी, झालमुरी व मिठाई वाटप करत कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी विजयाचा आनंद साजरा केला. कार्यक्रमाला आमदार मा. सईताई डहाके आणि जिल्हा सरचिटणीस मा. डॉ. राजीवजी काळे नगर परीषदेचे सर्व नगरसेवक व नगरसेविका यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आणि संपूर्ण परिसर घोषणांनी दुमदुमून गेला.

'भारतीय जनता पार्टीचा हा विजय म्हणजे जनतेचा अढळ विश्वास, कार्यकर्त्यांचे निष्ठावान परिश्रम आणि सक्षम नेतृत्वाचा सन्मान आहे,' असे मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत उत्सवाला रंगत आणली. कारंजा शहराने या विजयाचा जल्लोष एकात्मतेने आणि अभिमानाने साजरा करत राजकीय वातावरणात नवी ऊर्जा निर्माण केली.

# चिमुकली वर अमानुष कृत्य करून तिची हत्या करणाऱ्या नाराधमास फाशीची शिक्षा द्या

## मनिष डांगे यांची गृहमंत्र्यांकडे मागणी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भोर तालुक्यातील नरसापुर येथील चार वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या करणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा देण्याची मागणी मनसे मा. जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

त्यांनी निवेदनात पुढे म्हटले की, मानवी मनाला चटका लावणारी समाजाला काळीमा फासणारी नरसापुर येथील चिमुकल्या बालीकेवर अत्याचार करुण हत्या करण्यात आली या घटनेचा जाहीर निषेध करीत त्या नराधमाला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. सदर प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषी नराधमास राष्ट्रीय महिला आयोगाने फाशी देण्यासाठी कारवाई करावी जेणेकरुन अशा घटनांची भविष्यात पुनरावृत्ती होणार नाही. तसेच अशा प्रकरणात अधिक कडक कायदे करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# रक्तदान शिबिरामध्ये प्रत्येकांनी सहभागी व्हावे - पुरुषोत्तम चरखा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम जिल्ह्यामध्ये सध्या रक्ताचा तुटवडा आहे. उन्हाच्या पारा वाढत असून सिकलसेल व अन्य रुग्णांना वेळोवेळी रक्तदानाची गरज असून सामाजिक बांधिलकीतून वाशीम अर्बन बँकेच्या वतीने १८ मे रोजी भव्य रक्तदान शिबिराचे बँकेमध्ये आयोजन करण्यात आली आहे यामध्ये प्रत्येकानी सक्रिय सहभाग घेऊन रक्तदान करून राष्ट्राच्या विकासात योगदान द्यावे असे आव्हान वाशीम अर्बन बँकेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम चरखा यांनी केले स्थानिक वाशिम अर्बन बँकेच्या सभागृहात चार मे रोजी वाशीम अर्बन बँक वाशिम शाखेचा ४७ वा वर्धापन दिन व रक्तदान शिबिर आयोजन बाबत आयोजित चर्चासत्रामध्ये त्यांनी अध्यक्षस्थानावरून वरील प्रतिपादन केले सदर चर्चा सत्रात बँकेचे अध्यक्ष श्रीमती शीलाताई राठी ऑनलाइन दारे उपस्थित होत्या.यावेळी मंचावर बँकेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम चरखा समवेत



शाखा सभापती नितीन करवा, व्यवस्थापन मंडळ समिती अध्यक्ष संचालक राम देशपांडे, संचालक राजेश सिसोदिया, उद्योजक सुभाष गट्टानी, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख उपस्थित होते सर्वप्रथम बँकेचे संस्थापक स्वर्गीय रामकृष्ण राठी व बँकेचे मार्गदर्शक प्रेरणास्थान स्वर्गीय सुभाषभाऊ राठी यांच्या प्रतिमेचे पूजन करूनहार अर्पण करण्यात आले तदनंतर दीप प्रज्वलन करण्यात आले. दीप प्रजलवन कार्यक्रमाला मान्यवरा समवेत बँकेच्या पॅनल वरील अकोला येथील ॲड. सुभाषसिंह ठाकूर, ॲड. सज्जनसिंह चंदेल, कर्मचारी प्रतिनिधी तेजराव वानखेडे, वाशिम शाखा संचालक तरणसिंग सेठी, जितेंद्र गोधा, निलेश सोमानी, शाखा प्रबंधक राजेंद्र अग्रवाल उपस्थित होते. यावेळी बँकेचे अध्यक्ष श्रीमती शीलाताई राठी यांनी ऑनलाइन द्वारे मार्गदर्शन करीत बँकेच्या सर्वांगीण विकासात सर्वांची साथ मिळत असल्याचे सांगितले बँकेचे संचालक मंडळ ,भागधारक ,ग्राहक हितचिंतक ,कर्मचारी वृंद व सर्वांच्या सहकार्य,परिश्रमामुळेच आज बँक वटवृक्षात रूपांतरित झाली आहे रक्तदानाची गरज लक्षात घेतात प्रत्येकांनी यामध्ये आपले योगदान द्यावे असे आव्हान केले. सदर कार्यक्रमात रक्त संकलन अधिकारी डॉ. हरिदास मुंडे, राजस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य ओमप्रकाश झंवर, कर्मचारी प्रतिनिधी तेजराव वानखेडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जिल्हा सामान्य रुग्णालयाचे रक्त संकलन अधिकारी डॉ.हरिदास मुंडे यांनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे आज मोठ्या प्रमाणात सिकलसेल रुग्ण गर्भवती महिला व अन्य कारणाने रक्ताची गरज भासत आहे केवळ वाशीम अर्बन बँक या तापत्या उन्हामध्ये आमच्याकरिता आशेची किरण असून यामध्ये युवाशक्तींनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून या राष्ट्रीय कार्याला हातभार लावावा असे आव्हान केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखा सभापती नितीन करवा संचालन निलेश सोमानी तर आभार मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख यांनी मानले सदर चर्चासत्र व बँकेच्या वर्धापन कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हितचिंतक ग्राहक भागधारक, कर्मचारी वृंद , पत्रकार बांधव उपस्थित होते.

# मानसीची उत्तुंग भरारी : GATE परीक्षेत ऑल इंडिया रँक १० वा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नुकत्याच जाहीर झालेल्या GATE परीक्षेच्या निकालात मानसी चंद्रकांत लोकाक्षी हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मानसीने १००० पैकी तब्बल ९५० गुण मिळवत ऑल इंडिया रँक १० प्राप्त केला आहे.

या उत्कृष्ट यशामुळे तिला देशातील नामांकित संस्थांकडून प्रवेशासाठी निमंत्रणे मिळाली आहेत. Indian Institute of Technology Madras, Indian Institute of Science Bangalore lemesÛe Indian Institute of Technology Bombay या प्रतिष्ठित संस्थांकडून तिला प्रवेशाची संधी मिळाली होती. मात्र, मानसीने Indian Institute of Technology Bombay येथे खुल्या



प्रवर्गातून एम.टेक (Computer Science and Engineering) या शाखेची निवड केली आहे. मानसीने आपले बी.टेक चे शिक्षण नागपूर येथील G H Raisoni College of Engineering मधून पूर्ण केले आहे. ती वाशीम येथील एस.एम.सी. इंग्लिश स्कूलमधील राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांची भाची आहे.मानसीच्या या दैदिप्यमान यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे.

# कारंजा येथे आयपीएल सट्टूयावर धाड



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम पथकाने कारंजा शहरात आयपीएल क्रिकेट सट्ट्यावर धडक कारवाई करत सुमारे १ लाख ३३ हजार ४१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दि. ४ मे २०२६ रोजी कारंजा शहरातील द्वारका कॉलनी, सिंधीकॅम्प परिसरात छापा टाकण्यात आला. यावेळी एका बंद खोलीत सोपाण अशोक लोणागरे (वय ३२, रा. पिंजर ता. बार्शीटाकळी, जि. अकोला) हा इसम आयपीएल मधील लखनौ विरुद्ध मुंबई इंडियन्स सामन्यावर सट्टा चालवत असल्याचे निष्पन्न झाले. कारवाईदरम्यान पोलिसांनी ६ मोबाईल, १ टॅब, १ मोटारसायकल व रोख रक्कम असा एकूण १,३३,४१० रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला. याप्रकरणी कारंजा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक लता फड, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, पोलीस उपनिरीक्षक शेखर मास्कर व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. जिल्ह्यातील अवैध कृत्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी अशा बेकायदेशीर प्रकारांची माहिती त्वरित पोलिसांना द्यावी, असे आवाहन स्थानिक गुन्हे शाखेने केले आहे.

# लग्न वाढदिवसानिमित्त पक्ष्यांसाठी शहरात ठीक ठिकाणी घरट्यांची व्यवस्था



■ प्रतिनिधी | रिसोड ■

सध्या वाढत्या उष्णतेमुळे पक्षी आणि मुक्या जीवांना पाण्यासह सुरक्षित निवाऱ्याची मोठी गरज भासत आहे. हीच सामाजिक जाणीव जपत युवा पत्रकार रुपेश पाटील बाजड आणि त्यांच्या पत्नी वैष्णवी बाजड यांनी आपल्या तिसऱ्या लग्न वाढदिवसानिमित्त एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला आहे.

४ मे २०२३ रोजी विवाहबंधनात अडकलेल्या रुपेश पाटील बाजड आणि वैष्णवीताई बाजड दाम्पत्याने आपल्या तिसऱ्या लग्न वाढदिवसानिमित्त रिसोड शहरातील विविध भागात जवळपास ३० ठिकाणी पक्ष्यांसाठी घरटी तसेच पाण्याची व्यवस्था केली आहे.

उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे अनेक पक्ष्यांना झाडांची कमतरता आणि पाण्याअभावी त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर बाजड दाम्पत्याने विविध ठिकाणी झाडांवर सुरक्षित घरटी बसवून पक्ष्यांसाठी पाणवठे तयार केले आहेत. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनास हातभार लागणार असून सामाजिक बांधिलकीचा संदेशही समाजात पोहोचत आहे.

# आय.एम.विनर. स्पर्धा परीक्षेत कोळगाव खुर्दचे विद्यार्थी चमकले

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोळगाव खुर्द,ता. मालेगाव येथील ६ विद्यार्थी या वर्षीच्या आय.एम.विनर च्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.त्याबद्दल सर्व पात्र विदयार्थांना पारितोषीक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

सन- २०२५ -२६ च्या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती च्या धर्तीवर घेण्यात आलेली ही परीक्षा ४ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाली होती.तर त्याचा निकाल २९ मार्च २०२६ रोजी लागला होता. यामध्ये इयत्ता ३री चा कृष्णराज सुशील मालवी याने जिल्हा स्तर प्रथम क्रमांक,तर माही रवी इंगळे हीने तालुका स्तर प्रथम क्रमांक पटकावला. तसेच इयत्ता ४ थी च्या सिध्देश गौतम ताजने याने तालुका



स्तर प्रथम क्रमांक व ऋषीकेश अरुण ताजने याने व्दितीय क्रमांक मिळवला.तसेच इयत्ता २ री च्या रिद्धी ज्ञानेश्वर करे हीने तालुका स्तर प्रथम व सिद्धी भिकाजी गायकवाड हीने व्दितीय क्रमांक प्राप्त केला.सोबतच केंद्र स्तरावर इयत्ता ३ री च्या प्रज्ञा विशाल सुरुशे हीने देखील प्रथम क्रमांक मिळवला.

जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळा कळमगव्हाण,ता.रिसोड येथे हा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. व्यासपिठावर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक विष्णू जुनघरे तसेच कळमगव्हाण चे सरपंच सौ. सुनिता खंदारे, शा.व्य.स.अध्यक्षा पल्लवी मोरे,मोरे क्लासेसचे संचालक परशुराम मोरे,मुख्याध्यापक विनोद शेजूळ आदी कार्यक्रमा साठी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते सर्व पात्र विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# महाडीबीटीवर बियाणे अनुदानासाठी अर्ज मागविले

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सन २०२६-२७ अंतर्गत राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया–सोयाबीन) आणि कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत खरीप हंगामासाठी प्रमाणित बियाणे वितरण व पिक प्रात्यक्षिके या घटकांसाठी जिल्ह्याला लक्षांक प्राप्त झाले असून, शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी केले आहे.

सोयाबीन पिकासाठी मागील पाच वर्षांत प्रसारित वाणांचे बियाणे तसेच कडधान्य, अन्नधान्य, तृणधान्य व भरडधान्य पिकांचे बियाणे अनुदानावर उपलब्ध करून दिले जाणार आहे. पिक प्रात्यक्षिकांत सहभागी होण्यासाठी ३१ मार्च २०२४ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी किंवा कृषि क्षेत्रातील सहकारी संस्था महाडीबीटी प्रणालीद्वारे अर्ज करू शकतात. प्रत्येक गटात २५ शेतकरी व एकूण १० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक असून, प्रत्येक लाभार्थ्यास ०.४० हेक्टरपर्यंत लाभ मिळेल. गटात २५ पेक्षा जास्त सदस्य असल्यास त्यांपैकी २५ जणांची निवड करावी; कमी असल्यास बाहेरील पात्र शेतकऱ्यांचा समावेश करता येईल.

# आम्ही स्वगणना केली, तुम्ही पण करा व जनगणना यशस्वी करा - मयुर राऊत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी जनगणना ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते. यंदाची जनगणना २०२६ अनेक वैशिष्ट्यांनी युक्त असून, डिजिटल माध्यमातून माहिती संकलित करणारी ही देशातील पहिली जनगणना ठरणार आहे. भारत सरकारच्या जनगणना मोहिमेअंतर्गत स्व-गणना (Self Enumeration) सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन वाशिम येथील सामाजिक कार्यकर्ते मयुर गणेशराव राऊत यांनी केले आहे.

'आम्ही स्वगणना केली, तुम्ही पण करा व जनगणना यशस्वी करा,' असा संदेश देत त्यांनी नागरिकांना डिजिटल पद्धतीने स्वतःची व कुटुंबाची माहिती अचूकपणे नोंदविण्याचे



आवाहन केले आहे. देशाचे सुजाण नागरिक म्हणून प्रत्येकाने स्व-गणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मयुर राऊत यांनी माहिती देताना सांगितले की, १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना स्व-गणना प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. यासाठी शासनाने https://se.census.gov.in हे अधिकृत संकेतस्थळ उपलब्ध करून दिले असून, नागरिकांना घरबसल्या मोबाईल किंवा संगणकाच्या माध्यमातून स्वतःची तसेच कुटुंबाची माहिती ऑनलाइन भरता येणार आहे.

स्व-गणना प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला एक युनिक आयडी क्रमांक (एनसीडी) प्राप्त होणार असून, हा क्रमांक पुढील जनगणना प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. त्यामुळे हा क्रमांक जतन करून ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले. या डिजिटल प्रक्रियेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून, माहिती संकलन अधिक अचूक, पारदर्शक आणि जलद होण्यास मदत मिळणार आहे. कुटुंबातील सदस्यांची माहिती तसेच इतर आवश्यक तपशील सहजपणे ऑनलाइन सादर करता येणार असल्याने ही प्रक्रिया नागरिकांसाठी अधिक सोयीस्कर ठरत आहे. जनगणना ही केवळ लोकसंख्येची आकडेवारी नसून, देशाच्या विकासाचे नियोजन करण्यासाठी महत्त्वाचा आधार मानला जातो. अचूक माहितीमुळे विविध शासकीय योजना, सुविधा व विकासात्मक धोरणे प्रभावीपणे राबविण्यास मदत होते, असेही राऊत यांनी नमूद केले. जनगणना २०२६ ही देशाच्या भविष्यासाठी दिशा ठरवणारी महत्त्वपूर्ण प्रक्रिया असून, प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सहभागी होऊन ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते मयुर गणेशराव राऊत यांनी केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संघर्षातून विधानसभेपर्यंत!

## लोकांच्या घरी झाडू-पोछा करणा-या कल्पिता माझी आता बनल्या 'आमदार'

**कोलकाता/वृत्तसंस्था :** जिद्द आणि चिकाटी असेल तर परिस्थितीवर मात करून यशाचे शिखर गाठता येते, हे पश्चिम बंगालमधील कल्पिता माझी यांनी सिद्ध करून दाखवले आहे. दुस-यांच्या घरी झाडू-पोछा करून महिना



२,५०० रुपये कमावणा-या कल्पिता माझी आता थेट विधानसभेत पोहोचल्या असून त्यांची ही यशोगाथा सध्या संपूर्ण देशात चर्चेचा विषय ठरत आहे.

कल्पिता माझी यांचे आयुष्य अत्यंत संघर्षाचे राहिले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्या गेली अनेक वर्षे लोकांच्या घरी घरकाम करत होत्या. महिना जेमतेम अडीच हजार रुपयांत त्या आपल्या संसाराचा गाडा ओढत होत्या. मात्र, समाजाप्रती असलेली त्यांची तळमळ आणि कामाची जिद्द पाहून त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले.पूर्व बर्धमान जिल्ह्यातील औसग्राम विधानसभा मतदारसंघातून भाजपने त्यांना उमेदवारी दिली होती. एका सामान्य घरकाम करणा-या महिलेला तिकीट मिळाल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या. मात्र, कल्पिता यांनी घरोघरी जाउन प्रचार केला आणि जनतेनेही त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना भरघोस मतांनी विजयी केले. आमदार म्हणून निवडून आल्यानंतरही कल्पिता माझी यांचा साधेपणा कायम आहे. मी आजही एक सामान्य महिलाच आहे. गरिबांचे दुःख मला माहित आहे, कारण मी स्वतः त्यातून गेले आहे. आता आमदार म्हणून माझ्या मतदारसंघातील लोकांचे प्रश्न सोडवणे आणि विशेषतः महिलांच्या उत्थानासाठी काम करणे हेच माझे मुख्य उद्दिष्ट असेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

## फटाक्याच्या फॅक्ट्रीत मोठा स्फोट; 25 ठार; 61 जखमी

**बीजिंग/वृत्तसंस्था :** चीनमधील एका फटाक्याच्या फॅक्ट्रीत झालेल्या भीषण स्फोटात २१ जणांचा मृत्यू झाला असून ६१ जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. या घटनेनंतर चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी या




प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.चीनच्या हुनान प्रांतात ही धक्कादायक घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. स्फोटानंतर तातडीने घटनास्थळी अग्निशमन दल, बचाव पथक आणि वैद्यकीय कर्मचा-यांना पाचारण करण्यात आले. हा स्फोट सोमवारी संध्याकाळी झाला. या घटनेनंतर चिनी सोशल मीडिया प्लॅटफ?र्मवर काही व्हीडीओ व्हायरल होत आहेत, ज्यामध्ये एका मोठ्या परिसरातून धुराचे लोट उठताना दिसत आहेत. तिथे इमारती कोसळल्या असून ढिगारा विखुरलेला दिसत आहे. मात्र या व्हीडीओच्या सत्यतेची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही. रिपोर्टनुसार, हा स्फोट हुआशेंग फायरवर्क्स मॅन्युफॅक्चरिंग अँड डिस्प्ले कंपनी मध्ये झाला आहे. राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी स्फोटाच्या कारणांचा शोध घेण्याचे आदेश दिले असून या घटनेसाठी जबाबदार असलेल्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच त्यांनी अधिका-यांना प्रमुख उद्योगांमधील धोक्यांची तपासणी करणे, आपत्ती निवारण यंत्रणा मजबूत करणे, सार्वजनिक सुरक्षितता वाढवणे आणि लोकांचे जीवन व मालमत्तेचे संरक्षण अधिक चांगल्या प्रकारे करण्याचे आदेश दिले आहेत.

## उपचार मिळण्यात साडेपाच तासांचा विलंब ठरला मृत्यूचे कारण?

### कलिंगड खाउन चौघांच्या मृत्यू प्रकरणातून नवी माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :**पायधुनी येथील डोकाडिया कुटुंबातील चार सदस्यांच्या मृत्यूने संपूर्ण मुंबई हादरली आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच आता एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. रुग्णांना योग्य वैद्यकीय उपचार मिळण्यात सुमारे साडेपाच तासांचा विलंब झाला, अशी बाब



फोरेन्सिक आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या प्राथमिक चर्चेतून निष्पन्न झाली आहे.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जेवणानंतर कलिंगड खाल्ल्यावर कुटुंबातील चारही जणांना पोटदुखी, उलट्या आणि अतिसाराचा (जुलाब) त्रास सुरू झाला. त्यांनी सुरुवातीला स्थानिक डॉक्टरांकडून प्राथमिक उपचार घेतले, ज्यामुळे त्यांना काही काळ आराम मिळाला. मात्र, थोड्या वेळाने प्रकृती पुन्हा खालावली. प्रकृती गंभीर असतानाही रुग्णांना तातडीने रुग्णालयात नेण्याऐवजी ते घरीच थांबले. अखेर प्रकृती हाताबाहेर गेल्यावर त्यांना सकाळी ११ ते पावणे १२ च्या सुमारास जे.जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण तोपर्यंत बराच उशीर झाला होता.

**गोल्डन अवर गमावला-** वैद्यकीय क्षेत्रात गोल्डन अवर (तात्काळ उपचाराचा पहिला तास) अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या काळात उपचार न मिळाल्यास शरीरातील विषबाधेची लक्षणे अधिक तीव्र होतात.

# लैंगिक शोषण करणा-याचा पॅरोल बंद

### ■ मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांचे आदेश ■ नसरापूर घटनेनंतर महाराष्ट्र कॅबिनेटचा मोठा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यातील नसरापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणावरून संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणानंतर सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणानंतर आता महाराष्ट्राच्या आजच्या कॅबिनेट बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. लैंगिक शोषण करणा-या नराधमांना पॅरोल देउ नका असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

आज मंत्रालयात कॅबिनेट बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल देउ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट बैठकीत दिले आहेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यात अटक होउन पॅरोलवर सुटलेले असतात आणि त्या काळात ते परत तेच गुन्हे करतात. २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अशा गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल देउ नका, असा कायदा केला होता. तो २-३ वर्ष अस्तित्वात होता. पण कालांतराने तो न्यायालयाने रद्द केला. आता पुन्हा तसाच कायदा करा, असे निर्देश देवेंद्र फडणवीसांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत.

मी स्वतः पीडितेच्या वडिलांशी दोनवेळा बोललो. मी त्यांना हे



समजावून सांगितले, आपल्याला नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा करुन घ्यायची आहे. त्यासाठी वेळेत चार्जशीट दाखल होणे आणि केस चालणे, माननीय हायकोर्टाच्या माध्यमातून सगळ्या गोष्टीला फास्ट ट्रॅकवर नेत आहोत. लोकशाहीत आपल्या सगळ्यांना वाटते, अशा नराधमाला भरचौकात फाशी दिली पाहिजे. पण ते लोकशाहीत करता येत नाही. लोकशाही कायद्याने चालते. पण कोणालाही कायद्याचा दुरुपयोग करता येउ नये, यादृष्टीने कोणताही कोणतीही पळवाट न ठेवता या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा कशी होईल याचा प्रयत्न राज्य सरकार करेल. न्यायालयातून हे प्रकरण वेगाने मार्गी लावले जाईल. तसे पत्र आम्ही पीडीतेच्या कुटुंबाला दिले आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते.

**नसरापूरमधील नेमके प्रकरण काय?**

सुटीसाठी आजीच्या घरी आलेली ४ वर्षांची चिमुकली अंगणात खेळत होती. त्यावेळी १ मे रोजी ६५ वर्षांच्या आरोपीने तिला गोठ्यात नेले. तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. एवढंच नाहीतर तिला दगडाने ठेचून तिची हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगा-याखाली झाकून ठेवून पळ काढला. इतके गंभीर कृत्य करूनही या नराधमाला त्याचा जराही पश्चाताप झालेला नाही. ग्रामस्थांनी त्याला चोप देउन पोलिसांच्या ताब्यात दिले.

## आदिवासींच्या 5 प्राथमिक आश्रमशाळांची माध्यमिकमध्ये, 19 माध्यमिक शाळांची उच्च माध्यमिकमध्ये श्रेणीवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणा-या पाच प्राथमिक आश्रमशाळांची माध्यमिक स्तरापर्यंत आणि १९ माध्यमिक शाळांची उच्च माध्यमिक - कनिष्ठ महाविद्यालय स्तरापर्यंत श्रेणीवाढ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस मोठा हातभार लागणार आहे. या आश्रमशाळांची श्रेणीवाढ केल्याने आवश्यक अशा पदनिर्मितीस व त्याकरिता खर्चाच्या तरतूदीस देखील मंजुरी देण्यात आली. यामुळे राज्यातील डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचे शिक्षण गतीमान होणार आहे.राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी १९७२-७३ पासून 'आश्रमशाळा समूह' योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत सध्या स्वयंसेवी संस्थाकडून ५५६ अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जातात. त्यापैकी ३७ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा (इयत्ता १ ली ते ७ वी) व ३१९ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा (इयत्ता १ ली ते १० वी) आहेत. तसेच माध्यमिक आश्रमशाळा संलग्न २०० कनिष्ठ महाविद्यालये (इयत्ता १ ली ते १२ वी) सुरु आहेत. या शाळांमध्ये सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ (१ लाख ४० हजार २५४ मुले आणि १ लाख २१ हजार ५८२ मुली) विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या आश्रमशाळा दुर्गम,अतिदुर्गम, डोंगराळ किंवा नक्षलग्रस्त अशा भागात आहेत. घरच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे आदिवासी विद्यार्थी तालुका किंवा जिल्हयाच्या ठिकाणी जाउन पुढील शिक्षण घेण्यास उत्सुक नसतात. त्यामुळे गळतीच्या प्रमाणात वाढ होउन विद्यार्थी माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामध्ये विशेषतः मुलींची संख्या मोठी असते. यासाठी या विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच निवासी शिक्षण उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. याशिवाय राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगानेही आदिवासी विकास विभागाला अनुदानित आश्रमशाळांना प्रोत्साहन देण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार राज्यातील ५ प्राथमिक आश्रमशाळांची श्रेणीवाढ करुन तिथे आठवी वी ते दहावीचे वर्ग सुरु करण्यास तसेच माध्यमिक अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये १८ ठिकाणी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय (इयत्ता ११ वी व १२ वी कला व विज्ञान शाखा) व एका ठिकाणी केवळ ११ वी व १२ वी कला अशा १९ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

**श्रेणीवाढ करण्यात आलेल्या पाच प्राथमिक आश्रमशाळा :** श्री महात्मा मुंगसाजी शिक्षण संस्थेची आश्रमशाळा, बाळापूर आखाडा, ता. कळमनुरी, जि. हिंगोली. अश्वमेघ जीवन विकास प्रेरणा संस्था, चतुरजी उइके, आदिवासी अनुदानित आश्रमशाळा, रेवसा, ता.जि. अमरावती. आदिवासी उन्नती सेवा मंडळ, अनु. प्राथ आश्रमशाळा, राजूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर. सुभाष शिक्षण प्रसारक मंडळ अनु. आश्रमशाळा, मांडवा, ता. किनवट, जि. नांदेड. सद्?गुरू दत्त धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्ट, इंदोर संचलित सुर्योदय पारधी समाज आदिवासी अनुदानित आश्रमशाळा, सजनपुरी, ता. खामगाव जि. बुलढाणा

**श्रेणीवाढ करण्यात आलेल्या १९ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा :** मार्की, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ. खापरी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर. वीर बिरसामुंडा अनुदानित आश्रमशाळा, सालेकसा, ता. सालेकसा, जि. गोंदिया. गोंडपिंपरी, ता. गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर. गोजोली, ता. गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर. श्रीमती विठाबाई मुन अनुदानित आश्रमशाळा, डोंगरगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर. वायंगाव निपाणी, ता. जि. वर्धा. आश्रमशाळा गडद, ता. नवापुर, जि. नंदुरबार. अनुदानित आश्रम शाळा, गुही, ता. सुरगाणा, जि. नाशिक. अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा, बिलाडी, ता.जि.धुळे. अनुदानित आश्रमशाळा, नारा, ता. कारंजा, जि. वर्धा. अनुदानित शाळा. आश्रम शाळा, अंतुर्ली, ता. अमळनेर, जि. जळगाव. श्री. गजानन महाराज अनुदानित आदिवासी आश्रम शाळा, शेगाव ता. शेगाव, जि. बुलढाणा. अनुदानित आश्रम शाळा, उत्खोल, ता. माणगाव, जि. रायगड. स्व. गंगाधरराव कोरडे अनुदानित आदिवासी प्राथ. / माध्य. आश्रमशाळा पिठोरी, ता. नरखेड, जि. नागपूर. राजीव प्राथमिक व माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा, पाटण, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ. पुनरुत्थान समरसता गुरूकुल अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा, चिंचवडगाव, पुणे. मातोश्री मिराबाई अनुदानित प्राथ. व माध्य. आश्रमशाळा, नवेगांव धापे, ता. जि. गोंदिया. अनुदानित आश्रमशाळा देवठाण, ता. अकोले जि. अहिल्यानगर. या पाच प्राथमिक आश्रमशाळांची माध्यमिक आश्रमशाळांमध्ये श्रेणीवाढ केल्याने आवश्यक शिक्षकांची ३० नियमित पदे व २५ बहुउद्देशीय कर्मचा-यांची २५ पदे यांच्या पदनिर्मितीस तसेच १९ कनिष्ठ महाविद्यालयांसाठी आवश्यक १४८ शिक्षकांच्या नियमित पदनिर्मितीस व या सर्व पदांच्या आवश्यक खर्चाच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.




## पदवीस्तरावरचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु होणार

### ● शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून प्रवेश घेता येणार

**मुंबई/प्रतिनिधी :** सोलापूरला नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास व त्यासाठी सोलापुरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६-२७) पदवीस्तरावरचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनचे नाव यापुढे शासकीय अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था (गव्हर्मेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँण्ड टेक्नालाजी), सोलापूर असे करण्यास देखील मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे सोलापूर आणि आजूबाजूच्या परिसरातील अभियांत्रिकी शिक्षण घेउ इच्छिणा-या होतकरूंच्या दृष्टीने महत्वाचे अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. या अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी साठ अशी असेल. एआय अँण्ड मशिन लर्निंग, काम्प्युटर सायन्स अण्ड इंजिनियरिंग, इलेक्ट्रानिक्स अण्ड टेलिकम्युनिकेशन असे हे तीन नवे अभियांत्रिकी अभ्यासक्रम या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६ - २७) पासून उपलब्ध असणार आहेत. यामुळे या परिसरात सुमारे १८० विद्यार्थ्यांना या नव्या शैक्षणिक वर्षापासून सोलापूरमध्येच अभियांत्रिकीला प्रवेश घेता येणार आहे.

या नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापनेकरिता टप्पाटप्प्याने नव्याने नियमित शिक्षकांची ३९ पदे, शिक्षकेतर ३८ (यापैकी २२ नियमित व १६ बाह्ययंत्रणेद्वारे) पदे अशी पदनिर्मिती करण्यात येणार आहे. संस्थेच्या नवीन शिक्षक व शिक्षक पदावरील तसेच बांधकाम, यंत्रसामुग्री उपकरणांकरिता अशा आगामी चार वर्षांतील सुमारे १५७ कोटी ६६ लाख दोन हजार रुपयांच्या खर्चाच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच या शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकीचे हे तीन पदवी अभ्यासक्रम सुरु होणार असल्याने इमारत दुरूस्ती, डागडुजी तसेच अन्य आवश्यक खर्चाकरिता म्हणून ११ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

## श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित

**मुंबई/प्रतिनिधी :** धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथे तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख?मंत्री देवेंद्र फडणवीस होते. तुळजापूर येथील तुळजापूर मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी संस्थांनामार्फत चालविले जाणारे श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत प्रस्ताव दिला होता. त्यावर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पाच सदस्यीय समितीने या महाविद्यालयाच्या हस्तांतरणाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सादर केला. त्यानुसार महाविद्यालयाची जागा, इमारत आणि साहित्यासह शासनाकडे हस्तांतरित करण्यास आज मान्यता देण्यात आली. आता हे महाविद्यालय श्री. तुळजाभवानी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर, या नावाने ओळखले जाईल. सध्या या महाविद्यालयात सिव्हिल (स्थापत्य) मेकॅनिकल (यंत्र अभियांत्रिकी), इलेक्टानिक्स अण्ड टेलिकम्युनिकेशन (अणुविद्युत व दूरसंचार) आणि काम्प्युटर सायन्स (संगणक विज्ञान) असे अभ्यासक्रम सुरू आहेत.या निर्णयामुळे महाविद्यालयाचे सक्षमीकरण होउन या परिसरात अद्ययावत शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध होण्याने या परिसरातील होतकरूंना दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षण मिळणे सुलभ होणार आहे. भविष्यात या महाविद्यालयात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डाटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, ग्रीन टेक्न?ल?जी, रिन्युएबल एनर्जी, ईव्ही टेक्नालाजी असे आधुनिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरु करता येणार आहेत. यादृष्टीने महाविद्यालयासाठी नियमित शिक्षकांची ६० पदे आणि शिक्षकेतर पदे ५८ अशा एकूण ११८ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली. मात्र सध्या महाविद्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी संस्थांनाचेच कर्मचारी म्हणून राहतील. संस्थांनाची पदे जशी रिक्त होत जातील तशी ती पदे शासनाच्या विहीत पध्दतीने भरती करण्यास आणि त्यापोटी येणा-या खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

## टेक वारी 2.0 प्रशिक्षणांतर्गत डीपीडीपी कायद्याबाबत मंत्रालयात सखोल मार्गदर्शन

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सोशल मीडिया आणि डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे वैयक्तिक डेटाचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. चुकीच्या हातात गेलेला डेटा व्यक्ती, समाज आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकतो. सायबर गुन्हे, डिजिटल अटक, फसवणूक, तसेच डेटा लीकच्या घटनांमुळे याची गंभीरता अधिक असल्याने डिजिटल युगात डेटा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयातील वकील खुशबू जैन यांनी सांगितले. मंत्रालयातील परिषद सभागृहात आयोजित टेक वारी २.० प्रशिक्षण उपक्रमांतर्गत डिजिटल युगातील डेटा सुरक्षेच्या महत्त्वावर विशेष मार्गदर्शन करतांना खुशबू जैन बोलत होत्या. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही राधा यांच्यासह विविध विभागाचे सचिव उपस्थित होते. खुशबू जैन यांनी डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण (डीपीडीपी) कायदा, २०२३ याविषयी मार्गदर्शनात सांगितले की, २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून मान्य केला. त्यानंतरच डेटा संरक्षणासाठी ठोस कायद्याची गरज निर्माण झाली आणि त्यातून डीपीडीपी कायदा, २०२३ अस्तित्वात आला.

या कायद्यात नागरिकांना महत्त्वाचे अधिकार देण्यात आले असून त्यात संमतीचा अधिकार, संमती मागे घेण्याचा अधिकार, डेटा पाहण्याचा अधिकार, दुरुस्तीचा अधिकार, डेटा हटविण्याचा अधिकार, तक्रार निवारण आणि नामिनी नेमण्याचा अधिकार यांचा समावेश असल्याचे सांगितले. डेटा हा व्यक्तीची मालमत्ता आहे आणि त्यावर पूर्ण नियंत्रण व्यक्तीचाच असायला हवा, कोणतीही संस्था किंवा कंपनी नागरिकांची स्पष्ट आणि समजण्यास सोपी संमती घेतल्याशिवाय डेटा वापरू शकत नाही, असेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शासकीय अधिकारी आणि कर्मचा-यांनी डेटा प्रिन्सिपल आणि डेटा फिड्युशरी या दुहेरी भूमिकेत काम करताना पारदर्शकता, जबाबदारी आणि सुरक्षिततेची तत्त्वे पाळण्याचे आवाहन केले. डेटा गळती किंवा नियमांचे उल्लंघन झाल्यास मोठ्या प्रमाणावर दंडाची तरतूद असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला विविध विभागांतील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्रादरम्यान उपस्थितांनी डेटा संरक्षणाशी संबंधित प्रश्न विचारून शंका निरसन करून घेतले.

# केरळमध्ये 'हात' मजबूत!

**मुंबई/प्रतिनिधी :** केरळ विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी देशाच्या राजकारणाला मोठी कलाटणी मिळाली आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजपने तृणमूल काँग्रेसचा धुव्वा उडवत ऐतिहासिक विजय मिळवला, तर केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटने (यूडीएफ) १४० जागांपैकी १०० हून अधिक जागांवर दणदणीत विजय मिळवत स्पष्ट बहुमत मिळवले. या धक्कादायक निकालामुळे गत १० वर्षांपासून सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील डाव्या लोकशाही आघाडीला (एलडीएफ) सत्ता सोडावी लागली. सततच्या राजकीय पराभवांचा सामना करणा-या काँग्रेस पक्षासाठी केरळमधील हे यश संजीवनी देणारे ठरले आहे. महत्त्वाचे म्हणजे आजवर केरळ विधानसभेत एकही प्रतिनिधी नसलेल्या भाजपने यंदाच्या निवडणुकीत ३ (तीन) जागांवर विजय मिळवत आपले खाते उघडले.



केरळमधील या पराभवामुळे डाव्या पक्षांना देशातील आपला अखेरचा बालेकिल्ला गमवावा लागला. यापूर्वी पश्चिम बंगाल आणि त्रिपुरा राज्यातून डाव्यांची सत्ता गेली आणि आता केरळही त्यांच्या हातातून निसटले आहे. गत ४९ वर्षांच्या भारतीय राजकीय इतिहासात प्रथमच देशातील एकाही राज्यात डाव्यांचे सरकार उरलेले नाही. निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर बहुतांश मतदानोत्तर चाचण्यांत केरळमध्ये काँग्रेस आघाडीच्या विजयाचे भाकित वर्तवण्यात आले होते. मात्र यूडीएफने चक्क शंभरी पार करून राजकीय विश्लेषकांनाही चकित केले. या निवडणुकीत सत्ताधारी एलडीएफला प्रस्थापित विरोधी तीव्र लाटेचा (अँन्टी इन्कम्बन्सी) मोठा फटका बसला. तसेच, डाव्यांच्या पारंपरिक व्होट बँकेतील अल्पसंख्याक मतांचे ध्रुवीकरण आपल्या बाजूने वळवण्यात काँग्रेसला मोठे यश मिळाले. या निवडणुकीत डाव्या आघाडीच्या अनेक मातब्बर नेत्यांना मतदारांनी पराभवाची धूळ चारली. मुख्यमंत्री पी. विजयन यांना त्यांच्या धर्मादाय मतदारसंघात विजय मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागले. मतमोजणीच्या अनेक फे-यांमध्ये ते काँग्रेस उमेदवारापेक्षा पिछाडीवर होते. मात्र शेवटच्या काही फे-यांमध्ये निसटती आघाडी घेत त्यांनी आपली जागा कशीबशी वाचवली.

विजयन मंत्रिमंडळातील महत्त्वाचे मंत्री ओ. आर. केलू यांचा दारुण पराभव झाला. एलडीएफचे वजनदार नेते जोस के. मनी यांनाही पराभवाचा झटका बसला. खासदार शशी थरूर यांनी मतदारांच्या परिपक्वतेचे कौतुक केले आहे. अनेक वर्षांनंतर मिळालेल्या या दणदणीत विजयामुळे काँग्रेस नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. काँग्रेसप्रणीत आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने राज्यातील राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. आता राज्यात काँग्रेस पक्षांतर्गत मुख्यमंत्रिपदासाठी स्पर्धा तीव्र झाली असून, पक्षश्रेष्ठींसमोर नवा पेच निर्माण झाला आहे. मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेसमधील अनेक ज्येष्ठ आणि तरुण नेत्यांची नावे चर्चेत आहेत. काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस (संघटन) आणि राहुल गांधींचे अत्यंत विश्वासू के.सी. वेणुगोपाल यांचे नाव आघाडीवर आहे. वेणुगोपाल यांच्या राष्ट्रीय राजकारणातील प्रदीर्घ अनुभवाचा फायदा राज्याला करून देण्यासाठी पक्ष त्यांना केरळचे नेतृत्व सोपवू शकतो.

केरळ विधानसभेतील विद्यमान विरोधी पक्षनेते म्हणून व्ही. डी. सतीसन यांनी गत पाच वर्षांत डाव्या आघाडीच्या सरकारविरोधात अत्यंत आक्रमक भूमिका मांडली होती. त्यांच्या या संघर्षाचे फळ म्हणून पक्षाला यश मिळाले असल्याने, त्यांच्या नावाचाही गांभीर्याने विचार सुरू आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि केरळचे माजी गृहमंत्री रमेश चेन्निथला यांचा राज्यात मोठा जनाधार आहे. त्यांचा प्रशासकीय अनुभव पाहता पक्ष त्यांना मुख्यमंत्रिपदाची संधी देउ शकतो. केरळचे दिवंगत माजी मुख्यमंत्री ओमेन चंडी यांचे सुपुत्र चंडी ओमेन यांनी या निवडणुकीत विजय मिळवला आहे. पक्षात तरुणांना संधी देण्याच्या धोरणानुसार त्यांचे नावही चर्चेत आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि तिरूवनंतपूरमचे खासदार शशी थरूर यांनी या ऐतिहासिक विजयानंतर केरळच्या सुजाण मतदारांचे आभार मानले आहेत. विद्यमान डाव्या आघाडीच्या सरकारमधील काही मंत्री किंवा आमदार वैयक्तिक स्तरावर नक्कीच लोकप्रिय होते. परंतु राज्यातील जनतेने केवळ वैयक्तिक लोकप्रियतेचा विचार न करता गत पाच वर्षांतील एकूण कारभाराचे मूल्यमापन करून आपले मत नोंदवले आहे.

केरळच्या जनतेला राज्यातील सध्याच्या राजकीय आणि आर्थिक परिस्थितीत बदल हवा होता, आणि त्यांनी त्यासाठी अत्यंत निर्णायक मतदान केले. या निकालाने डाव्यांच्या अहंकाराला मोठी चपराक लगावली असून केरळमध्ये काँग्रेसच्या विजयाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे. सध्या काँग्रेस कर्नाटक आणि तेलंगणामध्ये सत्तेवर आहे. केरळमधील दमदार विजयामुळे पक्षाची दक्षिणेकडील पकड अधिकच घट्ट झाली असून संपूर्ण देशाच्या राजकारणावर याचा मोठा प्रभाव पडेल. एलडीएफ सरकारच्या एकतर्फी निर्णयांविरुद्ध जनतेच्या मनात राग धगधगत होता, हे यावरून दिसून येते. मावळत्या मंत्रिमंडळातील डझनभर मंत्र्यांना पराभव चाखावा लागला आहे. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील अनेक नेत्यांनी ज्या उघडपणे घराणेशाही आणि पक्षपातीपणाचे प्रदर्शन केले होते, त्याचे उत्तर मतदारांनी दिले आहे. या निकालांनी हे स्पष्ट केले आहे की, सत्तेचा गैरवापर करणा-या कोणत्याही पक्षाला केरळचे सुजाण मतदार कधीही माफ करणार नाहीत. विद्यमान सरकारच्या वतीने काही मोजक्या लोकांना सरकारी तिजोरीतून वाटण्यात आलेल्या निधीच्या उधळपट्टीविरुद्धचा हा निकाल आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे निकाल हे केवळ पाच राज्यांचे राजकीय भविष्य ठरवणारे नाहीत, तर २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी देशाच्या राजकारणातील वारे कोणत्या दिशेने वाहतील हे दर्शविणारे आहेत.

या निवडणुकांमध्ये सुमारे ८२४ विधानसभा जागांसाठी सुमारे १६ कोटींपेक्षा अधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे हा निवडणूक निकाल राजकीय पातळीवरील राजकीय मनोवृत्तीचा मोठा निदर्शक मानला जात आहे. या निवडणुकीत सर्वाधिक चर्चा झाली ती पश्चिम बंगालमधील सत्तांतराच्या शक्यतेची, आसाममधील भाजपच्या तिस-या कार्यकाळाची आणि तामिळनाडूतील नव्या राजकीय समीकरणांची. केरळमधील डावे विरुद्ध काँग्रेस संघर्षाची आणि पुद्दुचेरीतील एनडीएच्या प्रभावाचीही चर्चा झाली. पाच राज्यांतील निकालांनी स्पष्ट संदेश दिला आहे की, भारतीय मतदार आता अत्यंत प्रगल्भ झाला आहे. तो प्रत्येक राज्यात वेगळा निर्णय घेतो. त्यामुळे यापुढे मतदारांना कुठल्याही पक्षाने गृहित धरू नये. स्पष्ट जनादेश असा की, सत्ता हवी असेल तर जनतेचा विश्वास जिंकावा लागेल आणि तो टिकवायचा असेल तर अहंकार नव्हे, उत्तरदायित्व आवश्यक आहे. सत्तेचा माज आला की जनता त्याला योग्यवेळी वठणीवर आणते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## निकालाचा सांगावा

केंद्रात सलग तिसऱ्यांदा मोठ्या संख्येने निवडून येऊनही ज्यांना भाजपच्या राजकीय प्रभावाबद्दल शंका होती, त्यांना जाहीर झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालाने उत्तर मिळाले असेल. भारतीय जनता पक्षाला 'भारतीय जनते'ने स्वीकारलेलेच नाही; तो केवळ हिंदी पट्टयातला पक्ष आहे, असे म्हणणाऱ्यांचे डोळे या निकालानंतरही उघडले नसतील, तर ते कधीच उघडण्याची शक्यता नाही. त्यांचे डोळे कायमचेच मिटलेले राहतील. भाजपला आसाम आणि पुद्दुचेरीत पुन्हा सत्ता मिळाली. आसाममध्ये त्यांनी हॅटट्रिक केली असली, तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून अगदी गाव पातळीवरील कार्यकर्त्यापर्यंत सगळ्यांना खरा आनंद झाला आहे, तो पश्चिम बंगालमधील विजयाचा. भारतीय जनता पक्षाचे आद्य नेते श्यामाप्रसाद मुखर्जी या राज्यातले, बंकीमचंद्र चटर्जी यांचे संपूर्ण 'वंदे मातरम्' राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी राष्ट्रीय गीत, स्वामी विवेकानंद आदर्श आणि रवींद्रनाथ टागोर यांची भारत मातेची कल्पना पक्षाच्या हृदयस्थळी; तरीही स्वातंत्र्यापासून अद्यापपावेतो जनसंघ किंवा भारतीय जनता पक्षाला पश्चिम बंगालमध्ये यश मिळत नव्हते. सुरुवातीची ३० वर्षे काँग्रेसची, त्यानंतर २६ वर्षे कम्युनिस्ट पक्षाची आणि त्यानंतरची १५ वर्षे तृणमूल काँग्रेसची सत्ता राहिल्याने संघ आणि भाजपला तिथे कालच्या दिवसाची प्रतीक्षा करावी लागली. एका गतिमंद मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराची दाद मागण्यासाठी १९९३ मध्ये ममता बॅनर्जी त्या मुलीला घेऊन थेट तत्कालीन मुख्यमंत्री ज्योती बसू यांच्या कार्यालयात धडकल्या होत्या. त्या आंदोलनाने ममता यांना प. बंगालच्या राजकीय पटलावर आणून ठेवले होते. आता ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालयातील बलात्काराच्या दुर्घटनेने त्यांच्या सत्तेला ग्रहण लावले, असे मानले जाते. १५ वर्षांच्या सलग सत्ताकाळाने ममतांविरोधात रोष वाढत गेला. त्यांच्या एकारलेपणाला बंगाली जनता कंटाळली होती. दीदींचे मुस्लीम तुष्टीकरण मर्यादेबाहेर गेले होते, बेरोजगारी प्रचंड वाढली होती, औद्योगिक विकास आणि परकीय गुंतवणुकीत राज्य रसातळाला गेले होते, ही कारणे होतीच. पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचा ठरला बंगाली घुसखोरांचा मुद्दा. बंगाली अस्मितेपलीकडे जाऊन तिथे हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरण झाले आणि त्याचा फटका ममता यांना बसला. सत्तेतून पायउतार व्हावे लागणे त्यांच्यादृष्टीने दुर्दैवी आहेच; पण त्यांनी सत्ता काळात ज्या तऱ्हेने प्रशासन राबवले, त्यामुळे त्यांचे दुर्दैवाचे दशावतार आता बघायला मिळतील, अशी चिन्हे आहेत. तामिळनाडूत विजय थलपती सत्ताधारी द्रमुकचे विजयाचे गणित बिघडवणार, असा अंदाज होताच. 'विजय फॅक्टर'मुळे अद्रमुक-भाजप युतीला सत्तेची संधी मिळेल, अशी समीकरणं मांडली जात होती. पण, विजय यांनी त्यापेक्षाही अधिक मोठी अनपेक्षित मुसंडी मारली. द्रमुक आणि अद्रमुक या दोन पर्यायांपैकी एकाची निवड करून कंटाळलेल्या तमिळ जनतेने विजय थलपती यांच्या पारड्यात अशी भरभरून मते टाकली, की त्याने निर्माण झालेल्या लाटेत विद्यमान मुख्यमंत्री एम. के. स्टालीन यांचा पराभव झाला; तर विजय यांच्या गाडीचा चालक चांगल्या मतांनी निवडून आला! हिंदी भाषेच्या शिक्षणाला केलेला कडाडून विरोध, मतदारसंघाच्या परिसिमनात कमी वाटा मिळण्याच्या भीतीने महिला आरक्षणाविरोधात संसदेत केलेलं मतदान स्टालीन यांच्या मदतीला आले नाही. सुपरस्टार रजनीकांत, कमल हसन, विजयकांत या सिनेकलाकारांनी यापूर्वी तामिळनाडूच्या राजकारणात पाय टाकण्याचा प्रयत्न केला. पण, विजय यांनी जसे स्वतःला झोकून दिले, ग्रामीण भागातून संघटना बांधणी केली, तसे यातल्या कोणीच काही केले नाही. ते फक्त स्वतःच्या 'स्टारडम'वरच विसंबून राहिले. त्यामुळे, थोडा काळ चाचपणी करून यातला प्रत्येकजण माघारी फिरला. त्या तिघांपेक्षा कमी वलय असूनही विजय थलपती केवळ 'किंगमेकर'च नाही; थेट 'किंग' बनला. दक्षिणेतल्या मतदाराने आतापर्यंत वेळोवेळी आपल्या मानसिकतेचे जे दर्शन घडवले, तेच यावेळीही दाखवून दिले. नेते बदलले, पक्ष बदलले, जनता तीच आणि तशीच आहे, याचे दर्शन या निकालातून झाले! सगळ्या देशातून काँग्रेसची मोठी घसरण सुरू असताना केरळने मात्र काँग्रेसला 'हात' दिला. तिथे यावेळी काँग्रेसचे पुनरागमन होणार, हा अंदाज बहुतेक सगळ्यांनी व्यक्त केला होता. तो खरा ठरला. पश्चिम बंगाल, आसाम पुद्दुचेरीमध्ये मतदारांचे जे धार्मिक ध्रुवीकरण झाले, तेच केरळमध्येही घडले. त्याचा लाभ काँग्रेसला झाला. तिथल्या मुस्लीम आणि ख्रिश्चन मतदारांनी काँग्रेसला आपला पर्याय म्हणून निवडले डावे आणि काँग्रेस, यात मतदारांनी डाव्यांना; म्हणजे साम्यवाद्यांना नाकारून काँग्रेसला का निवडले? हा स्वतंत्र विश्लेषणाचा विषय आहे. त्याचे उत्तर केरळमधील कम्युनिस्ट पक्षाच्या बांधणीत आणि तिथल्या नेतृत्वात आहे. काहीही असो. देशाच्या राजकीय पटलावरून डावे हमखास नामशेष होत आहे, हे यामुळे सिद्ध झाले. आसाम आणि पुद्दुचेरी या दोन्ही ठिकाणी भाजपची सत्ता पुन्हा आली, एवढेच नव्हे; दोन्ही ठिकाणी सत्ताधाऱ्यांच्या जागांमध्ये चांगली वाढ झाली. भारताच्या उत्तर टोकाला असलेल्या हिमाचल प्रदेशपासून ते पूर्व टोकाला पश्चिम बंगालपर्यंत, संपूर्ण ईशान्य भारतात आता भाजपचे राज्य आहे. हिंदी पट्टयापलीकडे भाजप पसरतो आहे. देशात ७८ टक्के भागावर भाजपचे राज्य प्रस्थापित झाले असेल, तर देशातल्या सर्व कायदेमंडळातलं झपाट्याने बदललेले चित्र डोळ्यांसमोर आणा, भारताचा बदललेला राजकीय नकाशा आपल्याला कळून येईल. आवश्यक घटनादुरुस्ती, घटनात्मक बदलाला भाजपला यापुढे कोणावर अवलंबून राहावे लागणार नाही. संपूर्ण देशाची सहमती मिळवण्यात भाजप यशस्वी झाला आहे, हाच कालच्या निकालाचा खरा अर्थ आहे.

# नव्या राजकारणाची सुरुवात

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल पाहता भारतीय मतदार दिवसेंदिवस चोखंदळ, चिकित्सक आणि निर्णयक्षम होत आहे, या सत्याची प्रचिती येते. या निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी ९० टक्क्यांच्या पुढे पोहोचली. हे सुजाण दृष्टीचे, प्रगल्भतेचे प्रतीक होय. या निकालांमध्ये एक समान धागा आहे तो म्हणजे, मतदारांच्या बदलत्या आकांक्षा, त्यांची परिपक्वता आणि विकासाबाबत वाढत असणारी जागरूकता. या तिन्ही गोष्टी भारतीय लोकशाहीला बळकटी देणाऱ्या आहेत. सत्ता ही आपली मक्तेदारी नाही, मनमानी कारभार जनता आता सहन करणार नाही, हा संदेश या निकालांनी राजकीय नेत्यांना पुन्हा एकदा दिला आहे.

**पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांतून भारतीय मतदार अधिक जागरूक, परिपक्व आणि विकासाभिमुख झाल्याचे दिसते.**






### प. बंगालमध्ये भाजपची मुसंडी

सातत्याने तीन वेळा सत्तेवर असलेल्या ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसच्या सत्तेविरोधात अँटी इन्कम्बन्सी भावना निर्माण होणे अपरिहार्य होते. शिवाय त्यांच्या पक्षातील अभिजन वर्गाची मक्तेदारी, उच्च स्तरावरील राजकीय गैरव्यवहार आणि मागील कालखंडात बिघडलेली कायदा-सुव्यवस्था, महिलांवर झालेले अन्याय-अत्याचार यामुळे बंगालमधील मतदार असंतुष्ट होते. भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली जोरदार प्रचार मोहिमांची आखणी करत लोकांपर्यंत सामाजिक कल्याणकारी विकास कार्यक्रम नेले. देशाच्या इतर राज्यात होत असलेल्या सर्वांगीण प्रगतीचे चित्र पाहून बंगाली नागरीकांनाही कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, ऊर्जा, सुरक्षा या सर्व बाबतीत काही रचनात्मक व ठोस घडावे, अशी अपेक्षा होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे बंगालमधील जनतेने डबल इंजिन सरकारच्या दिशेने कौल दिला. भाजपचा गड असलेल्या उत्तर बंगालपेक्षाही दक्षिण बंगालमध्ये अधिक जोरदार मुसंडी मारत भाजपने मतदारांना आपल्याकडे खेचण्यात यश मिळवले. त्यामुळे हे विक्रमी यश प्राप्त होऊ शकले. बंगालमध्ये भारतीय जनसंघाचे संस्थापक पंडित श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारताच्या मंत्रिमंडळात उद्योगमंत्री म्हणून काम पाहिले होते. त्यांनी जम्मू-काश्मीरच्या विलीनीकरणासाठी काश्मीरमध्ये सत्याग्रह केला होता; पण कारावासात त्यांचा मृत्यू झाला होता. ताज्या निकालांनी बंगाली मतदारांनी त्यांना न्याय दिला, असे म्हणावे लागेल. निवडणूक आयोगाच्या सतर्कतेमुळे बंगालमध्ये निवडणूकपूर्व आणि निवडणुकोत्तर काळात हिंसाचाराचा मागमूसही दिसून आला नाही. त्यामुळेच यंदा मतदानाची टक्केवारी वाढलेली दिसून आली. हिंदुत्वाच्या मुद्द्याने बंगालच्या मातीत घेतलेली ही पकड भविष्यातील राजकारणाची दिशा ठरवणारी ठरणार आहे.

### तामिळनाडूचा नवा 'जननायक'

तामिळनाडूच्या राजकीय इतिहासात यंदाच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल सुवर्णअक्षरांनी लिहिले जातील. दशकानुदशके ज्या द्रविड राजकारणाच्या गडाला कोणीही धक्का लावू शकले नाही, तो ७७ वर्षे जुना द्रमुकचा किल्ला अवघ्या दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या 'तमिळगा वेत्री कळघम' या पक्षाने भुईसपाट केला. 'थलपती' म्हणून ओळखला जाणारा अभिनेता सुपरस्टार विजयने रुपेरी पडद्याबरोबरच राजकीय रणांगणातही ताकद सिद्ध करत तामिळनाडूमध्ये एका नव्या युगाचा श्रीगणेशा केला. या विजयाने टीव्हीकेने राजकीय विलेषकांचे सर्व आडाखे मोडीत काढले. तामिळनाडूमध्ये चित्रपट आणि राजकारण हे एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. सी. एन. अण्णादुराई, एम. करुणानिधी, एम. जी. रामचंद्रन आणि जयललिता या सर्वांनी रुपेरी पडद्याच्या माध्यमातून मिळालेल्या 'स्टारडम'चे रूपांतर सत्तेत केले होते. मात्र, गेल्या काही वर्षांत तमिळ जनतेला एका नव्या आणि तरुण नेतृत्वाची प्रतीक्षा होती. विजयने नेमकी हीच पोकळी ओळखून 'तमिळगा वेत्री कळघम'ची स्थापना केली. त्याने केवळ ग्लॅमरवर विसंबून न राहता बूथ स्तरावर कार्यकर्त्यांचे जाळे विणले. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या तरुणांनी 'टीव्हीके'ला बदलाचा पर्याय म्हणून स्वीकारले. माजी मुख्यमंत्री दिवंगत जयललिता यांच्यानंतर अण्णा द्रमुकमध्ये निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढण्यात 'टीव्हीके' यशस्वी ठरला. अण्णाद्रमुकचा पारंपरिक मतदार मोठ्या प्रमाणावर विजयकडे वळल्याचे चित्र दिसत आहे. द्रमुक हा राजकीय शत्रू आहे आणि भाजप हा वैचारिक शत्रू आहे, ही विजयची स्पष्ट भूमिका तमिळ अस्मितेचा अभिमान बाळगणाऱ्या मतदारांना भावली. शिवाजी गणेशन किंवा कमल हासन यांच्याप्रमाणे करिअरच्या उतरत्या काळात नव्हे, तर यशाच्या शिखरावर असताना विजयने राजकारणात उडी घेतली आणि सी. एन. अण्णादुराई आणि एमजीआर यांच्या पावलावर पाऊल ठेवून तामिळनाडूच्या राजकारणात इतिहास घडवला. हा 'नवा सेनापती' आता तामिळनाडूला कोणत्या दिशेने घेऊन जातो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

### आसाममध्ये हॅट्ट्रिक

आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपने मिळवलेला विजय हा विकासकामांवर आणि सांस्कृतिक अस्मितेच्या मुद्द्यावर मतदारांनी दिलेली सकारात्मक पावती म्हणावा लागेल. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने सलग तिसऱ्यांदा सत्ता राखत आपला गड अधिक मजबूत केला. सीमारेषा सुरक्षा, पायाभूत सुविधांचा विकास आणि स्थानिक समुदायांच्या हक्कांचे संरक्षण या मुद्द्यांना आसामच्या जनतेने भरभरून दाद दिली.

### पुद्दुचेरीत एनडीए

पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशातही भाजपने मित्रपक्षांसह मिळवलेला विजय हा दक्षिण भारतात पाय रोवण्याच्या त्यांच्या रणनीतीचा एक भाग ठरला आहे. येथील स्थानिक प्रशासनातील सुधारणा आणि केंद्र सरकारकडून मिळणारा निधी यामुळे मतदारांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते.

### केरळमध्ये भाजप तिसरी शक्ती

केरळमध्ये यंदाच्या निकालांनी मोठी उलथापालथ घडवून आणत डाव्यांची सत्ता उलथवून टाकली आहे. तब्बल १० वर्षांनंतर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीने (यूडीएफ) जोरदार पुनरागमन केले आहे. भ्रष्टाचाराचे आरोप आणि प्रशासकीय त्रुटी यांसारख्या मुद्द्यांवरून मतदारांनी विजयन सरकारला नाकारल्याचे दिसते. काँग्रेसचे व्ही. डी. सतीशन यांच्या नेतृत्वाखालील संघटित प्रचार आणि राहुल गांधी यांनी दिलेल्या बळामुळे यूडीएफला सर्व स्तरांतील मतदारांपर्यंत पोहोचण्यात यश मिळाले आहे. भाजपने यावेळेस केरळमध्ये ऐतिहासिक कामगिरी नोंदवत चतनूर, नेमम आणि कझाकुट्टम यांसारख्या मतदारसंघात विजय मिळवला आहे. या विजयामुळे केरळच्या राजकारणात तिसऱ्या शक्तीचा उदय होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

**प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर**

## बंगालमधील सत्तापालटाचे महत्व

तृणमूल काँग्रेसची सत्ता गेली पंधरा वर्षे बंगालमध्ये होती.राष्ट्रद्रोही आणि हिंदुद्वेषी विचारसरणीमुळे बांगलादेशी घुसखोरांना ते नंदनवनच होते. हिंदुंची स्थिती अत्यंत दयनीय होती.अनाचार ,अत्याचार शिगेला पोहोचला होता. महिलांची अब्रू लुटली जात होती. कारण रक्षकच भक्षक होते.निवडणूक आयोगाने हाती घेतलेल्या मतदाता सूचीचे सखोल निरीक्षण या कार्यक्रमामुळे, नकली कागदपत्रे तयार करून मतदार सूचीत समाविष्ट केलेले ९१ सहस्त्र मतदार वगळले गेले त्यामुळे व्होट बँकेचे राजकारण ध्वस्त झाले.केंद्रीय सुरक्षा बलाच्या उपस्थितीमुळे लोक निर्भयपणे मतदानाला बाहेर पडले. त्यामुळे सत्तांतर होऊ शकले.बंगालमधील लोकांनी निर्भयपणे मतदान करून मतपेटी द्वारे भ्रष्टाचारी सरकारला धडा शिकवला त्यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत.

**संध्या काटदरे**

## पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक विजय

**संवाद**

पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात आजचा दिवस एक महत्त्वाचा टप्पा म्हणून नोंदवला जाईल. दीर्घकाळ प्रादेशिक राजकारणाचा प्रभाव असलेल्या पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेला विजय हा केवळ सत्तांतर नाही, तर मतदारांच्या बदलत्या मानसिकतेचा स्पष्ट संकेत आहे. या विजयामागे सर्वात मोठा घटक म्हणजे विकासाची अपेक्षा. रोजगार निर्मिती,उद्योगांना चालना,पायाभूत सुविधा अनेक तरुण मतदारांनी रोजगाराच्या संधींच्या आधारे मतदानाचा निर्णय घेतला. मतदारांनी स्पष्टपणे दाखवून दिले की, भावनिक मुद्द्यांपेक्षा प्रत्यक्ष विकासाला ते अधिक महत्त्व देतात.ही निवडणूक राष्ट्रीय आणि प्रादेशिक विचारसरणी यांच्यातील संघर्ष म्हणूनही पाहिली जाते.भाजपने राष्ट्रीय स्तरावरील मजबूत नेतृत्व धोरणे आणि यावर भर दिला, तर स्थानिक पक्षांनी प्रादेशिक ओळख जपण्यावर लक्ष केंद्रीत केले. शहरी भागात राष्ट्रीय मुद्द्यांचा प्रभाव दिसून आला, तर ग्रामीण भागातही विकासाच्या आश्वासनांनी मतदारांना आकर्षित केले.राज्यातील सामाजिक समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता नवीन धोरणांमुळे आर्थिक गती वाढण्याची अपेक्षा परंतु, यासोबतच सामाजिक सलोखा टिकवणे ही नवीन सरकारची मोठी जबाबदारी असेल. आव्हाने आणि अपेक्षा विजय मिळवणे जितके महत्त्वाचे, तितकेच तो टिकवणे कठीण असते. नवीन सरकारसमोर काही प्रमुख आव्हाने असतील दिलेली आश्वासने पूर्ण करणे सर्व समाजघटकांचा विश्वास जिंकणे राज्याच्या परंपरा आणि संस्कृतीचा आदर राखणे जर विकास प्रकल्प प्रत्यक्षात उतरले, तर हा विजय दीर्घकालीन ठरू शकतो.

**विरेंद्र सोनवणे**

## पराभवाचे वास्तव

पश्चिम बंगालच्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला सोसाव्या लागलेल्या पराभवानंतर पक्षप्रमुख ममता बॅनर्जी ज्या प्रकारे आकांडतांडव करत आहेत, त्यावरून त्यांना अद्याप जनमानसाचा कौल समजला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होतो. सलग १५ वर्षे सत्तेत राहिल्यानंतर झालेली ही पीछेहाट केवळ राजकीय हार नसून ती त्यांच्या धोरणांविरुद्ध जनतेने दिलेला कौल आहे.ममता बॅनर्जींचा सर्वात मोठा दावा हा राहिला आहे की त्यांनी डाव्यांची ३४ वर्षांची सत्ता उलथवून लावली. परंतु, त्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की डाव्यांच्या विरोधात जनमत तयार होण्यामागे त्यांची भांडवलशाही विरोधी भूमिका आणि प्रगतीला केलेला विरोध हे मुख्य कारण होते. ममतांनी डाव्यांना बाहेर केले खरे, पण स्वतःच्या १५ वर्षांच्या काळात त्याच दडपशाहीचा अवलंब केला. ज्या दडपशाहीच्या जोरावर त्यांनी राज्यकारभार केला, त्याचाच परिणाम आज त्यांच्या पराभवात झाला आहे.

या पराभवामागे महिला सुरक्षेचा मुद्दा अत्यंत कळीचा ठरला आहे. स्वतः एक महिला मुख्यमंत्री असूनही, राज्यातील महिलांवरील अत्याचारांच्या घटनांबाबत त्यांनी घेतलेली गळचेपीची आणि संवेदनाशून्य भूमिका संतापजनक होती. गुन्हेगारांना संरक्षण देण्याच्या वृत्तीमुळे राज्यातील माता-भगिनींमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. त्यासोबतच, भ्रष्टाचाराबाबत त्यांनी घेतलेली मवाळ भूमिका राज्याला घातक ठरली. शिक्षक भरती घोटाळा असो वा रेशन घोटाळा, प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराने कळस गाठला होता. मोठ्या प्रमाणात झालेल्या या 'स्कॅम्स'मुळे सामान्य जनतेचा सरकारी व्यवस्थेवरचा विश्वास उडाला.राज्यामध्ये नवीन उद्योग येत नाहीत आणि जुने बंद पडत आहेत.सुशिक्षित तरुणांना रोजगारासाठी महाराष्ट्र, गुजरात यांसारख्या इतर राज्यांमध्ये स्थलांतर करावे लागत आहे. ज्या राज्याने देशाला वैचारिक नेतृत्व दिले, तिथला तरुण आज पोटासाठी वणवण फिरत आहे, हे ममता बॅनर्जींच्या प्रशासनाचे सर्वात मोठे अपयश आहे.

**अविनाश देशपांडे**

# ममता आणि तृणमूलही हरला !

पश्चिम बंगाल, तामिळनाडू,केरळ, आसाम आणि पुदूचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत.पश्चिम बंगालमध्ये भाजपाच्या लाटेत तृणमूल काँग्रेस वाहून गेले. केरळ मध्ये काॅग्रेसने मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीचे पानिपत घडवून आणले.तामिळनाडूत नवख्या विजय या सुपरस्टारने, द्रमुक आणि अण्णा द्रमुक या तेथील प्रस्थापित पक्षांना अस्मान दाखवले तर आसाममध्ये भाजपाने काॅग्रेसचा सुपडा साफ केला.पुदूचेरीत अपेक्षेनुसार भाजपाच्या नेतृत्वाखालील आघाडी पुन्हा एकदा सत्तेवर आली.तामिळनाडूत मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांचा धक्कादायक पराभव झाला तर पश्चिम बंगालमध्ये भवानीपूर विधानसभा मतदारसंघात सुवेंदू अधिकारी यांच्याकडून ममता बॅनर्जी यांना दारुण पराभव पत्करावा लागला.

२०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत ममतांना याच सुवेंदू अधिकारी यांच्याकडून नंदिग्राम मतदारसंघात पराभव पत्करावा लागला होता. पश्चिम बंगाल मधील भाजपाचा विजय हा सर्वार्थाने ऐतिहासिक मानावा लागेल.१९७७ साली तृणमूल काँग्रेसने मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीचा पराभव करून त्यांची ३४ वर्षांची प्रदीर्घ राजवट संपुष्टात आणली होती.आताच्या निवडणुकीत (२०२६) भाजपाने तृणमूल काँग्रेसचा पराभव करून तृणमूलची १५ वर्षांची राजवट संपुष्टात आणली आहे.२०११ साली पश्चिम बंगालमध्ये नगण्य असलेल्या भाजपाची गेल्या पंधरा वर्षांतील प्रगती चित्तथरारक अशीच आहे.२०१६ साली झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत केवळ तीन जागा जिंकणाऱ्या भाजपाने २०२१च्या विधान सभा निवडणुकीत ७७ जागांवर झेप घेतली आणि या खेपेस दोनशेच्या वर जागा जिंकून भाजपाने पश्चिम बंगालची सत्ता काबीज केली.ममता बॅनर्जी यांच्या साठी हा मोठाच धक्का मानावा लागेल.भाजपाला पश्चिम बंगाल मधून हद्दपार करून नंतर केंद्रातील सत्तेतून पायउतार करु,अशी प्रतिज्ञा ममतांनी केली होती. परंतु झाले भलतेच.पश्चिम बंगालची सत्ता ममतांच्या हातातून निसटल्याने आता आपल्या पक्षाला एकसंध ठेवणे अवघड होऊन बसणार आहे.आपला पुर्वावतार असलेल्या जनसंघाचे संस्थापक डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांच्या जन्मभूमीत आपण इतकी वर्षे सत्ता प्राप्त करू शकलो नाही हे शल्य भाजपाच्या मनात नक्कीच होते.ममतांनी ज्या जनकल्याणकारी योजना सुरू केल्या होत्या त्याही ममतांना पराभवापासून वाचवू शकल्या नाहीत.



बेरोजगारी, भ्रष्टाचार, बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती इत्यादी गोष्टी तृणमूल काँग्रेसच्या दारुण पराभवासाठी कारणीभूत ठरल्या आहेत.ममतांना आपल्या पाठिराख्यांबाबत जो फाजील आत्मविश्वास होता, तोही ममतांच्या पराभवाचे प्रमुख कारण ठरला आहे.अल्पसंख्यांकांचे लांगूल चालन यापुढे पश्चिम बंगाल मधील हिंदू समाज खपवून घेणार नाही, हा संदेश ममतांना या पराभवातून मिळाला आहे.एसआयआर मोहिमेत ९१ लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याने त्याचा मोठा फटका तृणमूल काँग्रेसला निवडणुकीत बसल्याचे दिसून आले आहे.निवडणूक आयोगाने मतदानाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात केंद्रीय सुरक्षा दलाच्या जवानांना तैनात केल्याने तृणमूलच्या कार्यकर्त्यांना नेहमी प्रमाणे दहशत निर्माण करता आली नाही.बऱ्याच वर्षांनी पश्चिम बंगालमधील मतदारांना भयमुक्त वातावरणात मतदान करता आले. त्यामुळे तृणमूलच्या विरोधातील मतदार या खेपेस मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडले.तृणमूलचा पराभव झाल्याने ममतांचे राष्ट्रीय राजकारणातील महत्व कमी झाले आहे.ममतांना आता आपले निवडून आलेले आमदार फुटू नयेत म्हणून तारेवरची कसरत करावी लागणार आहे.बांगलादेशी घुसखोरांसाठी हा निकाल त्यांच्या तोंडचे पाणी पळवणारा आहे. बांगलादेशी घुसखोरांविरोधात कडक कारवाई करण्याचे संकेत, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या प्रचार सभांमधून वारंवार दिले आहेत.भारत-बांगलादेश सीमेवर ज्या ठिकाणी कुंपण घालण्याचे काम बाकी आहे,ते काम आता, पश्चिम बंगालमध्ये भाजपाची सत्ता आल्याने जलदगतीने होऊ शकेल.

पश्चिम बंगालमध्ये गेली काही वर्षे नवीन उद्योग येत नव्हते आणि जुने उद्योग बंद होत असल्याने किंवा राज्याच्या बाहेर जात असल्याने बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते.आता भाजपाला, राज्यात नवीन उद्योग आणण्यासाठी तातडीने प्रयत्न करावे लागतील.पश्चिम बंगालसारखे महत्त्वाचे राज्य भाजपाच्या ताब्यात आल्याने,त्याचा फायदा भाजपाला २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मिळू शकेल. 'मां माती मानूष' ही ममतांची घोषणा या निवडणुकीत, मतदारांनी मोठ्या प्रमाणात नाकारलेली दिसत आहे.बंगाला अस्मितेच्या मुद्यावर ममतांनी विशेष जोर दिला होता.तो मुद्दा राज्यातील मतदारांना फारसा महत्त्वाचा वाटला नसल्याचे निवडणूक निकालावरून दिसून आले आहे.भाजप हा बाहेरचा पक्ष आहे या ममतांच्या आरोपाला पश्चिम बंगाल मधील जनतेने केराची टोपली दाखवली आहे.कोलकाता आणि आसपासच्या परिसरात रहाणाऱ्या भद्रलोक समाजाने (उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित) ममतांना प्रथमच मोठ्या प्रमाणात नाकारले आहे.मुस्लिम समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात असणाऱ्या मतदारसंघांतही तृणमूल काँग्रेसला पुर्वीसारखे यश मिळालेले नाही.राज्यातील मतदारांनी आपल्या मनात नक्की काय चालले आहे याचा थांगपत्ता शेवटपर्यंत कुणाला लागू दिला नाही हे या निवडणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य मानावे लागेल.

**अभय गोखले**

# वेचक



## विश्वकर्मा गवंडी कामगार संघटना तर्फे कामगार दिन साजरा

पाटणबोरी - येथे विश्वकर्मा गवंडी कामगार संघटना र. न.NPG 4553 पाटणबोरी यांच्या वतीने दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी 1 मे कामगार दिन साजरा करण्यात आला. या वेळी माजी संघटना अध्यक्ष यांच्याहस्ते विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन रमेश कोमावार यांच्याहस्ते करण्यात आले. झेंडावंदन बिर्ला ग्रुप सिमेंट चे होलसेल विक्रेते श्री. विजय नालमवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यकामाचे सूत्रसंचालन विश्वकर्मा गवंडी कामगार संघटना अध्यक्ष शेखर सिडाम यांनी केले.या वेळी राष्ट्रगीत, व कामगारदिन, महाराष्ट्र दिन, भारत माता कि जय असे नारे लावीत,कामगार दिन वाजत,गाजत, फाट्याक्याच्या अतिश बाजी ने मोठ्या उत्साहाने कामगार दिन साजरा करण्यात आला. या वेळी कार्यकामाचे आयोजन नरसिंगराव तोटावार यांनी केले. असंख्य कामगार उपस्तित होते. या वेळी अल्पोहार संघटनेच्या वतीने ठेवण्यात आला.

## जिल्हा बाल संरक्षण कक्षाने एकाच दिवशी रोखले दोन बालविवाह

यवतमाळ - ५ मे २०२६ जिल्ह्यात बालविवाहाच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि बाल संरक्षण कक्ष सतर्क असून, एकाच दिवशी दोन बालविवाह रोखण्यात यश आले आहे. यवतमाळ तालुक्यातील भोयर येथे होणारे हे दोन्ही विवाह प्रशासनाच्या सतर्कतेमुळे थांबविण्यात आले. भोयर गावातील दोन १७ वर्षीय अल्पवयीन मुलींचा विवाह होणार असल्याची गोपनीय माहिती 'चाईल्ड हेल्प लाईन १०९८' ला प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे बाल संरक्षण कक्षाने तत्काळ अंगणवाडी सेविकांकडून मुलींच्या वयाची पडताळणी केली. सरकारी नोंदीनुसार दोन्ही मुलींचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्याचे स्पष्ट झाले, ज्यामुळे हा विवाह कायद्याने 'बालविवाह' ठरत होता. दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी प्रशासकीय पथकाने मुलींच्या घरी जाऊन पालकांचे समुपदेशन केले. बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार, मुलीचे वय १८ आणि मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे. प्रशासनाने पालकांना ताकीद दिली की, अल्पवयात लग्न लावल्यास केवळ कुटुंबीयच नव्हे, तर लग्नाशी संबंधित सेवा देणारे (मंडप, डेकोरेशन, फोटोग्राफर, आचारी इ.) व्यावसायिक देखील कारवाईस पात्र ठरतात. अशा गुन्ह्यासाठी १ लाख रुपये दंड आणि २ वर्षांच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते. सदर दोन्ही मुलींना पालकांसह 'बाल कल्याण समिती' समोर हजर करण्यात आले. ही यशस्वी कारवाई जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर आणि चाईल्ड हेल्प लाईन समन्वयक फाल्गुन पालकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात चाईल्ड हेल्प लाईनचे गणेश आत्राम, पूजा शेलारे, भोयरचे पोलीस पाटील मनोज मेश्राम, अंगणवाडी सेविका प्रणाली मेश्राम, आशा वर्कर सुलोचना सापोडे तसेच यवतमाळ ग्रामीण पोलीस स्टेशनचे निरीक्षक जाधव व पोलीस कॉन्स्टेबल कैलास लोथे यांचा समावेश होता.

## 'युडीआयडी'साठी रुग्णालयातच ऑनलाईन अर्जाची सुविधा मिळणार

यवतमाळ - येथील श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (जीएमसी) येथे तपासणीसाठी येणाऱ्या दिव्यांग बांधवांना आता युडीआयडी कार्डसाठी खाजगी केंद्रांवर चकरा मारण्याची गरज उरणार नाही. रुग्णालयातच ही ऑनलाईन सुविधा नि:शुल्क उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी विकास मीना यांना दिले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातून अनेक दिव्यांग बांधव दर सोमवारी आणि मंगळवारी वैद्यकीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात येतात. मात्र, रुग्णालयात तपासणी झाल्यानंतर त्यांना ऑनलाईन अर्जासाठी खाजगी ठिकाणी जावे लागत होते. यात त्यांची केवळ आर्थिक पिळवणूक व गैरसोय होत असल्याची बाब पालकमंत्री संजय राठोड यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तात्काळ दखल घेतली. दिव्यांगांची होणारी गैरसोय थांबवण्यासाठी रुग्णालयात ज्या ठिकाणी दिव्यांगांची तपासणी होते, त्याच ठिकाणी 'ऑनलाईन अर्ज' भरण्याची सोय उपलब्ध करण्यात यावी, असे निर्देश पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा मिळणार असून, युडीआयडी कार्ड मिळवण्याची प्रक्रिया आता अधिक सुलभ होण्यात मदत होणार आहे.

# अंधश्रद्धा, जादूटोणा विरोधी कायद्याच्या जनजागृतीवर भर द्या

## जिल्हाधिकारी विकास मीना यांचे निर्देश

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : राज्यात नरबळी, अमानुष, अनिष्ट आणि अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्यासाठी व त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कायदा लागू आहे. जिल्ह्यात या कायद्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले.

या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक काल पार पडली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, समाज कल्याण सहायक आयुक्त मंगला मुन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी अंधश्रद्धा, नरबळी, अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध कायद्याच्या जनजागृतीसाठी चांगले काम करणाऱ्या सामाजिक संस्थांचे सहकार्य घ्यावे. छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात पथनाट्याद्वारे जनजागृती करावी.

शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धा आयोजित करुन जनजागृती करावी, असे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

# गॅस वितरणावरून वाद, जेष्ठ नागरिकाला मारहाण

## गॅस एजन्सी संचालकाविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार! सीसीटीव्ही तपासाची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - शहरातील तिवारी चौक परिसरात गॅस वितरणावरून वाद निर्माण होऊन एका जेष्ठ नागरिकाला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. मेमन सोसायटी, भोसा रोड येथील रहिवासी जफर खान मीर वली खान यांनी अवधुतवाडी पोलीस ठाण्यात याबाबत लेखी तक्रार दिली आहे.

तक्रारीनुसार, संबंधित गॅस एजन्सीकडे त्यांनी दि. ३ एप्रिल २०२६ रोजी घरगुती गॅससाठी नंबर नोंदवला होता. त्यानंतर ओटीपी प्राप्त होऊनही त्यांना गॅस मिळण्यात विलंब होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दरम्यान, २९ एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास गॅस घेण्यासाठी एजन्सीकडे गेले असता, एजन्सी संचालक विनोद उर्फ अन्ना यांनी त्यांना गॅस देण्यास नकार देत शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यावेळी वाद वाढत जाऊन संबंधित व्यक्तीने जफर खान यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. विशेष म्हणजे, तक्रारदार हे जेष्ठ नागरिक असून ते मधुमेह व रक्तदाबाच्या आजाराने त्रस्त असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या घटनेवेळी ऑटोचालक शेख मोजीम शेख बाबामियाँ हे घटनास्थळी उपस्थित होते व त्यांनी हस्तक्षेप करून तक्रारदाराचा जीव वाचविल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच, संपूर्ण घटना गॅस एजन्सीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. तक्रारदाराने संबंधित गॅस एजन्सीच्या कामकाजाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, तसेच गॅस वितरक पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणाची प्रत जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासह आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन, नवी दिल्ली यांना देखील पाठविण्यात आली असून, संबंधित संस्थेकडेही लेखी तक्रार करून न्याय मिळवून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# युवा संवाद'मध्ये आयएफएस एन. भुवनेश्वर यांनी दिला यशाचा कानमंत्र

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे ४ मे रोजी आयोजित 'युवा संवाद' सत्रात भारतीय वन सेवेतील अधिकारी एन. भुवनेश्वर यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यूपीएससी परीक्षेत देशात ३१ व्या क्रमांकाने यश संपादन करणाऱ्या एन भुवनेश्वर यांनी आपला अनुभव मांडताना अभ्यासाच्या पारंपारिक पद्धतींसोबतच आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यावहारिक अनुभवावर भर देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी विकास मीना यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी स्पर्धा परीक्षेचा प्रवास संयमाचा असल्याचे सांगत सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

एन. भुवनेश्वर यांनी सांगितले की, पूर्व परीक्षेत सातत्याने चांगले गुण मिळत असूनही, दोन प्रयत्नांनंतर त्यांनी स्वतःच्या आवडीचा पुनर्विचार केला. आयएएसऐवजी आयएफएस निवडण्याचा त्यांचा निर्णय हा 'सेल्फ-अवेअरनेस' आणि ध्येयाप्रती असलेल्या स्पष्टतेचा परिणाम होता.

# आरटीओ कॅम्पच्या दिवशी 'सा.बा.'ला सुट्टीच?

## उमरखेडमध्ये शासकीय विश्रामगृहाचा गैरवापर, नागरिक हैराण

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - दर महिन्याला तीन दिवस भरवण्यात येणाऱ्या आरटीओ कॅम्पमुळे उमरखेडमधील शासकीय विश्रामगृह आणि नसार्वजनिक बांधकाम विभाग (सा.बा.) यांच्यावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. कॅम्पच्या दिवशी प्रत्यक्षात 'सार्वजनिक सुट्टी' नसताना, कार्यालयातील कामकाज ठप्प होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

आरटीओ कॅम्पच्या काळात विश्रामगृह परिसरात वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून, संबंधित दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपलब्ध नसतात, असा आरोप होत आहे. प्रभारी उपविभागीय अभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्यासह संपूर्ण टीम 'साइटवर असल्याचे' सांगितले जात असले तरी, प्रत्यक्षात कार्यालय आरटीओ कर्मचाऱ्यांच्या व एजंटांच्या ताब्यात दिले जाते, अशीही चर्चा आहे. 27 एप्रिल रोजी सुद्धा कार्यालयाला अघोषित सुट्टी होती.

### वाहतूक कोंडीमुळे विद्यार्थी त्रस्त

कॅम्पच्या दिवशी महागाव रोडवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने शाळकरी मुले व सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूक व्यवस्थापनाचा अभाव स्पष्टपणे जाणवत आहे. विश्रामगृहातील खोल्या मनमानी पद्धतीने देणे, फर्निचर भाड्याने देणे यामुळे शासनाच्या तिजोरीला आर्थिक फटका बसत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून शासकीय विश्रामगृहातील अनागोंदी कारभार तात्काळ थांबवावा, तसेच संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी उमरखेडमधील नागरिकांकडून होत आहे.

### सा.बां. चे कार्यालय बंदच : अभय पवार

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याला अडथळा निर्माण करणाऱ्या भारतीय पेट्रोल पंप तात्काळ हटवण्याकरिता आम्ही अश्वारूढ पुतळा कृती समितीचे पदाधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग येथे निवेदन देण्याकरिता आलो असता एकही अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपस्थित नव्हते संबंधित अधिकाऱ्याला भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी उत्तरे दिले नाही.

यामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामासाठी कार्यालयात गेल्यावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. आठवड्यातील पाच दिवस कामकाज अपेक्षित असताना, कॅम्पच्या दिवशी कार्यालयीन व्यवस्था कोलमडल्याचे चित्र दिसून येत आहे. येथील काही कर्मचाऱ्यांकडून टेबल, खुर्च्या यांसारखे शासकीय साहित्य एजंटांना भाड्याने दिले जात असल्याचेही बोलले जात आहे. यामुळे शासनाच्या मालमत्तेचा गैरवापर होत असल्याचा गंभीर मुद्दा समोर आला आहे. विश्रामगृहातील दोन व्हीआयपी कक्ष एका खाजगी व्यक्तीच्या ताब्यात असून, तेथे कोणतीही अधिकृत पावती न

# "पमश्री निधीचा गैरवापर की शाळा बंद करण्याचा डाव?

## हरीश चव्हाण यांचा शिक्षण विभागावर थेट आरोप; अधिकाऱ्यांवर निलंबनाची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या काही शाळांमध्ये 'पमश्री' निधीच्या वापराबाबत गंभीर अनियमितता झाल्याचे आरोप पुन्हा एकदा पुढे आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेश उपाध्यक्ष हरीश चव्हाण यांनी संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी तात्काळ करण्याची मागणी करत प्रशासनाला धारेवर धरले आहे.

चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाकडून शाळांसाठी मंजूर झालेला निधी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या सुविधांसाठी वापरला जात नसून, काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तो अपहार करून स्वतःच्या फायद्यासाठी वळविल्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता, भौतिक सुविधांचा अभाव, शैक्षणिक गुणवत्तेतील घसरण आणि विद्यार्थ्यांची वाढती गळती यावरून



निधीच्या वापराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. "शिक्षण हा मुलभूत अधिकार असताना शेतकरी व मजुरांच्या मुलांना दर्जेदार शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रकार सहन केला जाणार नाही," असा इशारा देत चव्हाण यांनी दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. याशिवाय, काही ठिकाणी शिक्षकांवर मानसिक दबाव टाकणे, बदली किंवा समायोजनाच्या नावाखाली त्रास देणे, तसेच रजा व वैद्यकीय बिल मंजुरीसाठी लाच मागितली जात असल्याचेही आरोप त्यांनी केले आहेत. याबाबत गोपनीय चौकशी करून संबंधित शिक्षकांचे जबाब नोंदवावेत, असेही त्यांनी सुचवले आहे. दरम्यान, जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या शाळा पाहणी दौऱ्यानंतरही कोणतीही ठोस सुधारणा झालेली नसल्याचा आरोप करत, "फक्त दौरे करून शासनाचा खर्च वाढवण्यापलीकडे काही साध्य झाले का?" असा सवालही चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. तसेच, शिक्षकांवर लादण्यात आलेल्या काही धोरणात्मक अटींबाबतही त्यांनी आक्षेप घेत, जुन्या शिक्षकांना टीईटी अट लागू करू नये आणि नव्याने नियुक्त शिक्षकांनाच ती लागू करावी, अशी मागणी केली आहे. या सर्व प्रकरणी शिक्षक उपसंचालक, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, तात्काळ चौकशी न झाल्यास तीव्र आंदोलन व उपोषण छेडण्याचा इशारा हरीश चव्हाण यांनी दिला आहे.

# झरीजामणी तालुका काँग्रेस कमिटीचे पंतप्रधानांना निवेदन

## पीकविमा व नरसापूर प्रकरणी कडक कारवाईची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

झरीजामणी - तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुका अध्यक्ष संदीप उर्फ लक्ष्मण भाऊराव बुर्रेवार यांनी पंतप्रधानांना तहसीलदार मार्फत सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनात यवतमाळ जिल्ह्याला पीक विमा योजनेतून वगळण्यात आल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तात्काळ पुनःसमावेश करण्याची मागणी करण्यात आली आहे.

खासदार प्रतिभाताई धानोरकर व माजी आमदार वामनराव कासावार यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, यवतमाळ जिल्हा हा शेतीप्रधान असून बहुतांश शेतकरी पीक विम्यावर अवलंबून आहेत. सध्याच्या परिस्थितीत जिल्ह्याची आणेवारी सुमारे ४८ टक्के असून झरी जामणी



तालुक्यातील चारही मंडळांची आणेवारी ५० टक्क्यांखाली आहे. तरीदेखील शेतकऱ्यांना पीक विम्यापासून वंचित ठेवण्यात येत असल्याने हजारो शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.मागील वर्षी शेतकरीनिहाय नुकसानभरपाई मिळत होती; मात्र यंदा अतिवृष्टीमुळे नुकसान होऊनही विमा मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासनाने स्पष्ट धोरण जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी,अन्यथा आंदोलन किंवा उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, नरसापूर येथील चार वर्षीय बालिकेवरील अत्याचार प्रकरणातील आरोपीस तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये कठोर शिक्षा दिल्यासच समाजात भीती निर्माण होईल व न्यायव्यवस्थेवरील विश्वास टिकून राहील, असे मत व्यक्त करण्यात आले. या निवेदनावेळी राजीव कासावार, प्रकाश कासावार, प्रकाश मैकलवार, भगवान चुक्कलवार, हरिदास गुर्जलवार, गंगाधर आत्राम, राकेश गालेवार, हरी झाडे, वसंत राडेवार आदी पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. शेतकरी व नागरिकांच्या प्रश्नांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

# संजीवनी प्रकल्पाचा शुभारंभ..!

## सिकलसेल-थॅलेसेमिया बालकांना वर्षभर सकस आहार

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : स्थानिक वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे ४ मे रोजी 'संजीवनी' प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. प्लेट्स प्ले ट्रस्ट (पुणे) आणि युवा जागर ट्रस्ट (यवतमाळ) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत ३ ते १० वयोगटातील सिकलसेल व थॅलेसेमियाग्रस्त बालकांना वर्षभर मोफत पोषण आहार दिला जाणार आहे. या प्रकल्पाला सुमितोमो ड्राइव्ह टेक्नॉलॉजीसचे सहकार्य लाभले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधीक्षक डॉ. अमर सुरदुसे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अजय केशवाणी, डॉ. खडसे, डॉ. पंचे, प्रा. घनश्याम दरणे, राजूभाऊ गिरी, गजेंद्र कांबळे व भारत शर्मा उपस्थित होते. यावेळी रुग्णसेवेत उल्लेखनीय कामगिरीबद्दल डॉ. ऐश्वर्या प्रधान, डॉ. दर्शन राज, डॉ. ज्ञानेश्वर गिराम यांचा सत्कार करण्यात आला. तसेच करण गेडाम व ईश्वर येरके यांनाही सन्मानित करण्यात आले. युवा जागर ट्रस्टचे संचालक किशोर बाभुळकर यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाचा उद्देश स्पष्ट करताना, बालकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी हा उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अर्पित शेडमाके यांनी केले.

# पुसद नगरपरिषद मधील अवैध जन्म नोंदणीची चौकशी कधी होणार

## तहसीलदार यांच्या आदेशाविना खाजगी ऑपरेटर करतो अवैध जन्म नोंद!

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - नगरपरिषद अंतर्गत येत असलेल्या जन्म/मृत्यू नोंदणी विभागातील झालेल्या अवैध जन्म नोंदणीची चौकशी करून फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्यासंदर्भात पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे गेल्या महिन्यात तक्रार दाखल करून चौकशीची मागणी केली होती. परंतु अद्याप मुख्याधिकारी नगरपरिषद पुसद यांच्याकडून कोणतेही ठोस पावले उचलण्यात आले नाही त्यामुळे जन्म/मृत्यू नोंदणी विभागातील लिपिक संजय बुलबुले व खाजगी ऑपरेटर आकाश महाजन, हा शासनाच्या नियमानुसार तहसीलदार यांच्या आदेशाविना दररोज अवैध जन्म नोंद करून गेल्या अनेक महिन्यापासून गैरमार्गाने आर्थिक माया जमवीत आहेत.

सविस्तर वृत्त असे की नगरपरिषद अंतर्गत जन्म व मृत्यू नोंदणी विभागात नोंद नसलेले नागरिकांना नोंद करण्यासाठी




शासनाच्या नियमाप्रमाणे तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार त्यांच्याकडे अधिकार देण्यात आले आहे. त्यानुसार नगरपरिषद कडून नोंद नसलेल्या नागरिकांना नोंद नसल्या बाबतचा दाखला घेऊन सर्व कागदपत्राची पूर्तता करून तहसीलदार यांच्याकडे केस दाखल करावी लागते. पुढे तहसीलदार यांच्याकडून नोटीसद्वारे दैनिक वृत्तपत्रात नोटिस प्रसिद्ध केल्यानंतर काही दिवसांनी तहसीलदार त्यांनी केलेल्या आदेशाची प्रत घेऊन नगरपरिषद मध्ये जन्म नोंद करावी लागते. या सर्व गोष्टी करण्यासाठी बराच कालावधी लागतो त्यामुळे काही लोकांना जन्म/मृत्यू नोंदणी विभागातील काही दलाल हे नागरिकांना नोंद करण्याबाबत आर्थिक १० ते १५ हजार रुपये घेऊन अशा अनेक अवैध जन्म नोंदी करण्यात आलेल्या आहे. याबाबत गेल्या महिन्यात सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार तसेच नागरिक यांनी तक्रार केल्या हो याबाबत दैनिक वृत्तपत्रात बातम्या सुद्धा प्रसिद्ध झाल्या आहेत तरीही तक्रारीची अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई मुख्याधिकारी नगरपरिषद पुसद अथवा तहसीलदार पुसद यांच्याकडून झालेली नाही. नगरपरिषद मधील जन्म मृत्यू नोंदणी विभागात गेल्या अनेक महिन्यापासून हा बोगस जन्म नोंदणी करण्याचा प्रकार सुरू झाला असून याबाबतीत चौकशी केली असल्यास यामध्ये मोठे गौड बंगाल समोर येईल आणि या विभागातील संजय बुलबुले लिपिक व खाजगी ऑपरेटर आकाश महाजन यांनी केलेला हा गैरप्रकार समोर येईल आणि एक मोठे रॅकेट समोर येईल कारण हा गोरख धंदा अनेक महिन्यापासून येथे सुरु आहे. शासनाने कळविल्याप्रमाणे तहसीलदार यांच्या आदेशानुसार ज्या लोकांचे जन्म नोंद नगरपरिषदेला नसल्यामुळे यांच्या आदेशाविना नोंदी घेण्यात येऊ नये असा शासनाचा कडक नियम असतांना सुद्धा सदर लिपिक संजय बुलबुले व खाजगी ऑपरेटर आकाश महाजन,सह दुसरा ऑपरेटर शेख सलिम,तसेच खाजगी लिपिक शेख अडसर यांनी गेल्या अनेक महिन्यापासून आजपर्यंत लाखो रुपयाची माया जमवली आहे,व जन्म नोंदणी केलेल्या आहे.तसेच सामान्य नागरिकांना उद्धटपणे बोलून अरेरावीची भाषा करतात त्यामुळे लिपिक संजय बुलबुले यांच्या कार्यकाळात झालेल्या जन्म नोंदीच्या संपूर्ण कागदपत्राची तपासणी करून चौकशी अंति जबाबदार आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्यात यावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे उपोषण आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रारीतून देण्यात आला आहे.

# पितृ छत्र हरवलेल्या "सिद्धांत बेंदले" याने ९२ टक्के गुण घेऊन गाठले यशाचे शिखर

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - यवतमाळ स्थित सिद्धांत नरेंद्र बेंदले यांची आई बालपणीच सोडून गेल्याने तो आई विना पोरका झाला होता. ऐन परीक्षेच्या वेळी त्यांच्या वडिलांचे निधन झाल्याने सिद्धांत व त्याची छोटी बहिण पोरकी झाली. अशातच सामाजिक दायित्वातून व सामाजिक बांधिलकीतून यवतमाळ येथील सुजाता गुजर व राजपाल गुजर यांनी त्यांचे पालकत्व स्वीकारून माणुसकीचे दर्शन घडविले.

बालपणापासून त्यांचे पालन पोषण, शिक्षण आदी जबाबदाऱ्या पार पाडल्या. या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून वेदधारीणी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यवतमाळ येथे बारावी सायन्स शाखेत प्रवेश घेऊन सिद्धांत नरेंद्र बेंदले याने जिद्द व चिकाटीच्या भरोशावर बारावी सायन्स शाखेत त्याने 92 .17 गुण टक्के



गुण मिळवून यशोशिखर गाठले. तासनतास अभ्यास करून ऐन परीक्षेच्या वेळी त्यांचे वडिलांचे निधन झाल्याने अश्रू नयनांनी परीक्षा केंद्र गाठावे लागले होते. या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द व चिकाटी आणि अभ्यासातील सातत्य यामुळे तो यश संपादन करु शकला. त्याने पुन्हा एकदा सिद्धांत ने गुणवत्ता सिद्ध करून नवा सिद्धांत मांडला. त्याची शिक्षण घेण्याची तळमळ व आदर्श इतर ही विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देणारी ठरते. बारावी नंतर पुढे उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्याचे त्याचे वडिल स्मृतीशेष नरेंद्र शंकरराव बेंदले यांचे स्वप्न पूर्ण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या बद्दल सिद्धांत च्या यशाला खऱ्या अर्थाने कलाटणी देणारे या यशाचे शिल्पकार आणि पालकत्व स्वीकारणारे सुजाता गुजर व राजपाल गुजर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सिद्धांत नरेंद्र बेंदले यांनी प्रतिकूल परिस्थितीतून मिळविलेल्या यशाबद्दल सुजाता गुजर, राजपाल गुजर, माजी सभापती प्रज्ञा भूमकाळे, शिक्षणाधिकारी किशोर पागोरे, उपशिक्षणाधिकारी प्रदीप गोडे , प्राचार्य प्रकाश भूमकाळे, आय.ई.एस.अधिकारी निखिल मेंढे ,मुख्याध्यापक राजहंस मेंढे आदींनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. अधिक तपशिल राजहंस मेंढे यांनी कळविला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ‘आपली बस-आपली सेवा’ अभियानाला प्रारंभ



**अमरावती/का.प्र.**

१ मे २०२६ पासून एसटी महामंडळाने ‘आपली बस, आपली सेवा’ अभियान हाती घेतले आहे. प्रवाशांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेसह अनेक उपक्रम राबविले जाणार आहेत. बस सुटण्यापूर्वी चालक स्वतःची ओळख करून देऊन प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती देणार आहेत.

राज्य परिवहन महाराष्ट्र महामंडळाकडून प्रवाशांना सन्मानपूर्वक व अधिक दर्जेदार सेवा सुविधा देण्यासाठी महाराष्ट्र दिनापासून ‘आपली बस, आपली सेवा’ हे अभियान सुरू करणार असून लांब व मध्यम पल्ल्याच्या बसेसमध्ये हे अभियान कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय घेतला आहे. बसमध्ये आता स्वच्छ गणवेशातील प्रवाशांना अभिवादन करत त्यांचे स्वागत करणार आहे. एसटी महामंडळाने प्रवासी संख्या वाढविण्यावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे.

यासाठी हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

चालक-वाहकांना स्वच्छ गणवेशासह बॅज व नेमप्लेटसह वेळेत हजर राहणे बंधनकारक असून, बस सुटण्याच्या अगोदर सर्व प्रवाशांना तिकीट देताना त्यांना अभिवादन करून बसचा मार्ग व बसची वेळापत्रकाची माहिती द्यावी लागेल. बसस्थानकांवर स्वच्छतेसह प्रवाशांना आवश्यक माहिती, मदत आणि सुविधा वेळेत उपलब्ध करून देणे.

‘आपली बस, आपली सेवा’ हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांना अधिक दर्जेदार, सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा देण्यासाठी सुरू केलेले एक महत्त्वाचे अभियान आहे. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे यांनी या अभियानाची घोषणा केली असून, ते १ मे २०२६ पासून राज्यभरात राबवण्यात येत आहे.प्रवाशी सेवेचा दर्जा वाढवण्यासाठी चालक व वाहकांवर जबाबदाऱ्या दिल्या आहेत.बस ताब्यात घेताना बसच्या स्वच्छतेची खात्री करावी व ती सुटण्याच्या अगोदर १५ मिनिटे ती फलाटावर मार्ग फलकासह थांबावे.एसटी बस रद्द झाल्यास तत्काळ तिकिटाचे पैसे परत द्यावे लागतील. बसच्या स्वच्छतेसाठी प्रवाशांचेही यादरम्यान सहकार्य घेण्यात येईल. महामंडळाचे ‘आपली बस, आपली सेवा’ या नव्या उपक्रमाने प्रवासी संख्या वाढून उत्पन्नात भरीव वाढ होणार असल्याचा विश्वास महामंडळाला आहे.

# जिल्ह्यात आरटीईचे १ हजार ९१८ प्रवेश निश्चित

## केवळ ६६८ जागा रिक्त

**अमरावती/का.प्र.**

यंदा प्रथमच आरटीई प्रवेश प्रक्रिया वेळेवर सुरू झाली आहे. जिल्ह्यात २ हजार ५८६ जागेसाठी ही प्रवेश फेरी राबविण्यात येत आहे. आजवर १ हजार ९१८ बालकांचे प्रवेश संबंधित शाळांमध्ये निश्चित झाले आहे. ६६८ जागा अद्यापही रिक्त आहेत. त्यामुळे उर्वरित बालकांनी तत्काळ प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

जिल्ह्यातील आरटीई प्रवेशासाठी तब्बल ७ हजार ९६० बालकांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले. २२७इंग्रजी शाळेमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश स्वीकारले जाणार आहे. याकरिता पुणे येथे ऑनलाईन सोडत काढण्यात आली. यामध्ये २६२६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून तितकेच विद्यार्थी प्रतीक्षा यादीत आहेत. या विद्यार्थ्यांची यादी १० एप्रिल रोजी प्रसिद्ध करून प्रत्यक्ष प्रवेशाला सुरूवात करण्यात आली होती. यापूर्वी कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करण्याची शेवटची तारीख २० एप्रिल होती. मात्र आता ही मुदत वाढवून २१ ते ३० एप्रिल करण्यात आली होती. मात्र, त्याला पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. या निर्णयामुळे ज्यांनी अद्याप कागदपत्रे सादर केलेली नाहीत किंवा प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, अशा पालकांना अतिरिक्त वेळ मिळणार आहे.

यासंदर्भात आरटीई प्रवेश पोर्टलवरही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत १९१८ प्रवेश निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त प्रवेश होण्याच्या उद्देशान शासनाकडून या प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे.

# भाजपचा पश्चिम बंगालसह अन्य राज्यांतील विजयाचा शहरात उत्सव



**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

शहरांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पश्चिम बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरीमधील विजयाच्या पार्श्वभूमीवर जोरदार जल्लोष साजरा केला. येथील बाळासाहेब ठाकरे चौक येथे मोठ्या संख्येने कार्यकर्ते एकत्र येत विजयाचा आनंद व्यक्त करण्यात आला.

यावेळी धामणगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रताप दादा अडसळ तसेंच भाजपाचे नगरसेवक तथा भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवत, फटाके वाजवत आणि जोरदार घोषणाबाजी करत विजयाचा उत्सव साजरा केला.भगवे झेंडे फडकवत आणि पक्षाच्या घोषणा देत कार्यकर्त्यांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. या जल्लोषामुळे काही काळ चांदुर रेल्वे शहरात तसेंच परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

स्थानिक नागरिकांनीही या आनंदोत्सवात सहभाग घेतला.या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह असून आगामी काळात पक्ष आणखी बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# पश्चिम बंगाल व आसाम येथील विजयाचा जल्लोष



**अंजनगाव बारी/वार्ताहर**

पश्चिम बंगाल व आसाम येथे भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या उल्लेखनीय यशाच्या पार्श्वभूमीवर अंजनगाव बारी येथे भारतीय जनता पार्टी तर्फे भव्य विजयी जल्लोष साजरा करण्यात आला. विजयाच्या आनंदात कार्यकर्त्यांनी उत्साहात फटाक्यां ची आतषबाजी करत घोषणाबाजी केली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये रोशन पुनिया, महिला आघाडीच्या अध्यक्षा दीपाली मलवार, गुणवंत शेलोकार, झनकार नवखरे, प्रवीण भुजाडे, जयश ठाकूर, पंकज हटवार, गौरव गुलालकरी, प्रशांत माहेकर, युवराज गभने, सोमेश्वर इंगोले यांचा विशेष सहभाग होता.

# नवीन शैक्षणिक सत्र २६ जूननंतरच सुरू करण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा १५ जूनपासून सुरू करण्याचे निर्देश स्थानिक शिक्षण विभागाला प्राप्त झाले असून, त्यानुसार जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानेही सर्व आस्थापनांच्या जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे पत्र जारी केले आहे. दरम्यान, अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातच सूर्य जणू आग ओकत असल्याने शाळा २६ जूननंतरच सुरू करण्याची मागणी होत असताना, शासनाने १५ जूनचीच तारीख निश्चित केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.विदर्भातील तापमानाचा पारा ४४ ते ४५ अं.से.पर्यंत पोहोचला असल्याने अगदी सकाळच्या वेळीही घराबाहेर पडणे त्रासदायक झाले आहे. साधारणतः संपूर्ण जून महिन्यात तापमानाचा पारा चढताच असतो. त्यामुळे गतवर्षी शाळा २६ जून रोजी सुरू झाल्या होत्या; मात्र यावर्षी संपूर्ण राज्यभरात १५ जून या एकाच दिवशी शाळा सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे विदर्भातील वाढते तापमान लक्षात घेता किमान विदर्भात तरी शाळा २६ जूननंतर सुरू करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, मार्च महिन्यात शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या पत्रानुसार १५ ते २९ जूनपर्यंत सर्व शाळा सकाळच्या सत्रात सुरू करण्याची मूभा देण्यात आली असून, ३० जूनपासून नियमितपणे दोन सत्रात शाळा घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे; परंतु २९ जूनपर्यंत सर्व शाळा एकाच सत्रात सुरू करतानाही गोंधळच होणार असल्याची शक्यता शिक्षकांकडून वर्तविली जात आहे.

# राजर्षी शाहू विज्ञान व अतुल जगताप कला कनिष्ठ महाविद्यालयाची १००टक्के निकालाची परंपरा कायम



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

येथील राजर्षी शाहू विज्ञान व अतुल जगताप कला कनिष्ठ महाविद्यालयाची १००% निकालाची परंपरा कायम राखली असून विज्ञान विभागाचा निकाल १००% लागला असून यामध्ये महाविद्यालयातून तसेच चांदूर रेल्वे तालुक्यातून मृणल श्रीकांत घुगे (८९.५०%) हिने प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच आर्यन सुरेंद्र बकाले (८८.६७%) याने द्वितीय क्रमांक पटकाविला, दीप्ती दिवाकर राउत (८८.००%) गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकाविला तसेच कला शाखेचा निकाल ८०.७६% लागला असून यामध्ये गौरी राजेंद्र काळे (६२.१७%) हिने प्रथम क्रमांक पटकाविला तसेच गणेश नरेंद्र पाटील (६०.००%) याने द्वितीय क्रमांक व शिवम हेमंत दोडके (५६.८३%) याने तृतीय क्रमांक पटकाविला वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अतुल विद्या मंदिर संस्थेचे अध्यक्ष प्रा. उत्तरा जगताप सचिव प्रा. विरेन्द्र जगताप, कोषाध्यक्ष परीक्षित जगताप व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पराग आर. वडनेरकर तसेच प्रा. सोळंके, प्रा. ठाकूर, प्रा.पाटील, प्रा. देशमुख, प्रा.देशमुख, चव्हान. प्रा. हांडे, प्रा. पाटील यांनी अभिनंदन केले.

# चना व तूर खरेदी बंद;शेतक-यांचे नुकसान

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

शासकीय हमीभावाने चना खरेदी उद्दिष्ट पूर्ण झाले असा कांगावा करून ३० एप्रिलला तूर खरीदीची मुदत संपल्याने शासनाने चना व तूर खरेदी बंद केली आहे. तालुक्यात चना विक्रीकरीता ऑनलाईन नोंदणी केलेले ६७८ शेतकरी तर तुरीची नोंदणी केलेले ४१८ शेतकरी दोन्ही मिळून एकूण १०९६ शेतकरी विक्रीच्या प्रतिक्षेत आहे.

या नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना अखेर नाइलाजास्तव माल व्यापाऱ्यांना कमी भावात विकावा लागणार आहे. तालुक्यात खरेदी विक्री संस्थेकडे चना विक्रीकरीता ८०० शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली.मध्यंतरी बारदाना संपला आणि तीन आठवडे खरेदी बंद राहिली. त्यामुळे शेतकऱ्यांचा चना व तुरीची खरेदी होऊ शकली नाही. तीन आठवड्याचे कालावधीनंतर केंद्रावर बारदाना उपलब्ध झाला आणि काही दिवसातच खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाले असल्यामुळे पोर्टल बंद करण्यात आले व चन्याची खरेदी बंद झाला. चन्याचा हमीभाव ५,८७५ रुपये असून खुल्या बाजारात चन्याला प्रतिक्विंटल ५३०० रुपये पर्यंत भाव मिळतो.त्यामुळे शेतकऱ्यांचे सरासरी ५०० रुपये प्रतिक्विंटल आर्थिक नुकसान होते. त्याचप्रमाणे खरेदीची मुदत संपली या कारणामुळे ३० एप्रिल पर्यंतच तुरीची खरेदी करण्यात आली.नोंदणी धारक शेतकऱ्यांचा हजारो क्विंटल चना व तूर घरीच पडून आहे. त्यामुळे हाती येणारा पैसा थांबला असून खरिपाचे तोंडावर शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.चना व तूर खरेदीला मुदतवाढ मिळाली नाहीतर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना अखेर आपला माल व्यापाऱ्याला कमी भावाने विकून आर्थिक नुकसान सहन करावे लागणार असल्याने चना व तूर खरेदीला मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी शेतकरी यांच्याकडून होत आहे.

# आजपासून तापमानात घट होणार

## हलक्या पावसाची चिन्हे



**अमरावती/का.प्र.**

गत महिनाभरापासून सूर्य जणू आग ओकत असल्याचे जाणवत असले, तरी जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भात पुढील काही दिवसांत वातावरणात बदल होण्याची चिन्हे निर्माण झाली आहे. ‘रिजनल मेटॉरॉलॉजिकल सेंटर, नागपूर’ या संस्थेने साधारणः ५ मेपासून हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे नागरिकांना या उकाड्यापासून दिलासा मिळण्याची चिन्हे आहे.

पूर्व मध्य प्रदेश परिसरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. त्याचबरोबर छत्तीसगड ते तामिळनाडूपर्यंत कमी दाबाची द्रोणीय रेषा सक्रिय झाली असून, नैऋत्य राजस्थानवरही चक्राकार वाऱ्यांचा प्रभाव कायम आहे. या सर्व वातावरणीय प्रणालींचा एकत्रित परिणाम विदर्भाच्या हवामानावर होत असून, त्यामुळे वातावरणात अस्थिरता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भातील काही भागांमध्ये पुढील सात दिवसांत तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. विशेषतः दुपारनंतर किंवा संध्याकाळच्या सुमारास ढगाळ वातावरण तयार होऊन काही ठिकाणी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळू शकतात. काही भागांत वावटळीच्या स्वरूपातही पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सध्या विदर्भात उष्णतेची तीव्रता कायम असली तरी पुढील काही दिवसांत त्यात काहीशी घट होण्याची शक्यता आहे. विदर्भात ५ ते ७ मे दरम्यान कमाल तापमानात सुमारे २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याचा अंदाज असल्याची माहिती हवामान तज्ज्ञ प्रा. अनिल बंड यांनी दिली.

# आगीबाबत आ.प्रवीण तायडे यांनी अधिकाऱ्यांना सुनावले खडेबोल



**अचलपूर/वार्ताहर**

परतवाडा शहरातील लक्कड बाजार येथे आदर्श प्लायवूड दुकानासह एकूण ४ दुकानांना भीषण आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली होती. या आगीमुळे नगर परिषदेचे अग्निशमन दलाचे वाहन दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी एकूण ६ तास लागले.आमदार प्रवीण तायडे यांनी त्या दुकानाची पाहणी केली.

यावेळी अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांच्या सह पोलिस विभागाचे अधिकारी उपस्थित होते .

या वेळी दुकानदारांनी अग्निशमन दलाच्या मोजक्याच उशिरा आलेल्या अग्निशमन दलाच्या वाहनसंदर्भात तक्रारी मांडल्या.आणि यावेळी अनेक नागरिकांनी आग लागलेल्या दुकानातील साहित्य बाहेर काढण्यासाठी मोठी भूमिका बजावली.मात्र यावेळी उपस्थितीत नागरिकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा तक्रारी सुद्धा नागरिकांनी मांडल्या.

यामुळे आ.प्रवीण तायडे यांनी अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी यांच्यासह अग्निशमन दलाचे अधिकारी, पोलिस अधिकारी यांना जाब विचारून खडेबोल सुनावले.

# संक्षिप्त

## एन.एम.एम.एस.परीक्षेत नांदगाव हायस्कूलचे यश



**नांदगाव खंडेश्वर**- स्थानिक नांदगाव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी एन.एम.एम.एस परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवत तालुक्यात सर्वात अधिक उत्तीर्ण यादीत नाव उज्वल केले आहे. या यशात शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप रा. ठाकरे व उप-मुख्याध्यापिका भारती वाटाणे तसेच नरेश घरडे, अमोल ठाकरे, अजय बिसेन, जगदीश गोवर्धन तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वीतेकरिता परिश्रम घेतले. एकूण ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून पैकी १५ विद्यार्थी पात्र ठरलेले असून प्रति विद्यार्थी १२००० वार्षिक एकूण रुपये ४८००० स्कॉलरशिप ४ वर्षाकरिता करिता पात्र ठरलेले आहेत. या यशाकरिता सर्वत्र कौतुक होत आहे.

## नांदगाव बाजार समिती सभापतीची निवडणूक ११ मे रोजी

**नांदगाव खंडेश्वर**- स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रभात पाटील ढेपे यांनी १० एप्रिल रोजी सभापती पदाचा राजीनामा दिला होता.त्यामुळे या बाजार समितीचे सभापती पद रिक्त होते. नव्याने सभापतीची निवड करण्यासाठी सभापतीचे निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला. सहाय्यक निबंधक कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार ११ मे रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य हॉलमध्ये निवडणूक कार्यक्रम पार पडणार असून सकाळी १०.१५ ते १०.४५ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकारणे १०.५५ वाजता नामनिर्देशन पत्राची छाननी करून यादी प्रसिद्ध करणे ११ते ११.१५. पर्यंत नामनिर्देशन पत्र मागे घेणे आवश्यक असल्यास ११.३० ते १२ पर्यंत मतदान त्यानंतर मतमोजणी व निकाल जाहीर करण्यात येईल.मतदानाची संपूर्ण प्रक्रिया सचिन पतंगे अध्यासी अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था नांदगाव खंडेश्वर यांचे उपस्थितीत पार पडणार आहे.

## संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्थेद्वारे करियर मार्गदर्शन सत्र



**अमरावती**- स्थानिक महाजनपुरा येथील गजानन महाराज मंदिर परिसरात ‘संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्था’ आयोजित करिअर मार्गदर्शन सत्र २०२६ हा कार्यक्रम पार पडला. १० वी आणि १२ वीची परीक्षा दिल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर भविष्यातील करियर निवडण्याचे मोठे आव्हान असते. याच मूळ प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आणि ग्रामीण तसेच निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवांची ओळख करून देण्यासाठी या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजापेठ पोलीस स्टेशनचे ड्युटी ऑफिसर रोशन चटे ( पोलीस उपनिरीक्षक ) व मुंबई ठाणे जिल्ह्यातील येथे कार्यरत राज्य कर निरीक्षक सौरभ सावरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. या दोन्ही मान्यवरांनी आपल्या शासकीय सेवेतील अनुभवाच्या शिदोरीतून विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी नगरसेवक योगेश विजयकर हे सुद्धा उपस्थित होते.संचालन समितीचे उपाध्यक्ष अतुल बोरकर आणि सदस्य कुणाल नांदुरकर यांनी केले. समितीचे अध्यक्ष शुभम सावरकर यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या ध्येय धोरणावर प्रकाश टाकला. प्रा. रुपेश पद्माकर नांदुरकर यांनी पाहुणांच्या संघर्षांचा प्रेरणादायी प्रवास उपस्थितांसमोर समोर मांडला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नयन विजयकर, मुकेश बोरकर, आयुष सावरकर, अजय रावळे, समीर सावरकर, शेखर गायकवाड, आदित्य सावरकर, आणि सागर बोरकर या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले शेवटी समितीचे सदस्य विक्की गायकवाड यांनी सर्व उपस्थित मान्यवर विद्यार्थी आणि पालकांचे आभार मानले या मार्गदर्शन सत्राचा लाभ परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला.

## रोगनिदान शिबीर उत्साहात



**अमरावती**- प्रत्येक नागरिकांनी निरोगी जीवनासाठी आरोग्य तपासणी करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन क्रांती ज्योती ब्रिगेड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर यांनी उदघाटन केले. ते क्रांती ज्योती ब्रिगेड महिला आघाडी व निमा संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी नगर येथील शंकर मंदिरात मोफत भव्य रोग निदान शिबिर नुकतेच उत्साहात संपन्न झाले.शिबिरात डॉ. प्रवीण औगड, डॉ. राजकुमार लंगडे, डॉ. विनोद मैत्रे, डॉ. विजय कळंबे, डॉ. राजेंद्र भामकर यांनी शेकडो नागरिकांची तपासणी करून त्यांना मोफत सल्ला व औषधी दिली. तज्ञ डॉक्टर यांच्या मार्गदर्शनामुळे नागरिकामध्ये आरोग्या विषयी जागरूकता निर्माण झाली.महिला आघाडीच्या विदर्भ अध्यक्ष किरणताई मेहरे यांनी आरोग्य शिबीरे आयोजित करणे काळाची गरज असून महिलांनी नियमितपणे आरोग्य तपासणी करणे अनिवार्य असल्याचे मत मनोगता मधून व्यक्त केले.शिबीर यशस्वी करण्यासाठी दोन्ही संघटनेचे पदाधिकारी सर्वश्री ओमप्रकाश अंबाडकर, राजाभाऊ खवले, प्रा. सुरेश यावले, जिल्हाध्यक्ष ॲड. प्रभाकर वानखडे, रत्नाकर चरडे, प्रवीण मेहरे, वनिता फरकाडे, निलिमा काळे, उज्वला लंगडे, जया खासबागे, शिल्पा सिनकर, जया खवले, रेखा पेंडाम, सारिका व सरला आत्राम यांनी परिश्रम घेतले. तसेच या ठिकाणी रक्तदान शिबीर आयोजित केले होते.

## दुपट्टा व पादत्रानाचे वाटप

**अमरावती**- शहरात तापमानाने उच्चांक गाठीत देशातील सर्वात उष्ण शहर म्हणून येथील तापमान नोंदविल्या जात आहेत. या भीषण गर्मीच्या लाटेचा तडाखा गोरगरीब, निराधार लोकांना जास्त प्रमाणात पडत आहे व त्यांना ही समस्या भेडसावीत आहेत या समस्ये बाबत सामाजिक जाणीवेची भावना लक्षात घेत माजी चिफ इंजिनियर अनिलजी सुराणा च्यारीटेबल ट्रस्ट व अभिनंदन पेंढारी मित्र मंडळाचे सहकार्याने शहरातील विविध ठिकाणी गरजु व गोरगरीब बंधु भगिनींना चप्पल वाटप तसेच डोके व कान झाकण्यासाठी व उन्हापासून बचाव करण्यासाठी पांढरा सुती दुपट्टा देऊन काही प्रमाणात संरक्षण होण्यास हातभार लावला.

# शेती प्रश्नाचा समग्र विचार करणे आवश्यक

**बदलत्या वातावरणामुळे अनिश्चित झालेले शेती उत्पन्न आणि रोजगाराच्या अपुऱ्या संधी यामुळे ग्रामिण भागातून शहरांकडे स्थलांतर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रापुढील आव्हानांत भर पडत आहे. सरकारची धोरणे या आव्हानांना तोंड देण्यासाठी सर्वांगीण उपाय शोधण्याऐवजी तात्पुरती मलमपट्टी करणारी आहेत. या परिस्थितीत ग्रामीण अर्थकारणातील घडामोडी आणि शेती क्षेत्रापुढील आव्हानांना तोंड देण्यासाठी पुढची दिशा या विषयांवर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. नीरज हातेकर यांच्याशी साधलेला संवाद.**

**सध्या ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्याकडे तुम्ही कसे बघता ?**

सर्वप्रथम हे लक्षात घ्यायला हवे, की आर्थिक उत्पादन भौगोलिक दृष्टीने अत्यंत विषम असते. जगातील ५० टक्क्यांपेक्षाही जास्त आर्थिक उत्पादन जगाच्या दीड टक्के इतक्या मोठ्या भूभागात होते. भारतातसुद्धा हीच परिस्थिती आहे. खाली आकृतीत देशातील प्रत्येक पिनकोडमध्ये दर चौरस किलोमीटरमागे वस्तूनिर्मिती क्षेत्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची घनता दाखविली आहे.



इथे आपल्याला दिसते, की देशाचा उत्तरेचा भाग आणि दक्षिणेचा भाग, मुंबई ते कोल्हापूर हा दक्षिणेकडे जाणारा पट्टा आणि मुंबई ते अहमदाबाद हा उत्तरेकडे जाणारा पट्टा एवढा भाग सोडला तर देशाच्या उर्वरित भागात वस्तू निर्माण क्षेत्राची विशेष वाढ झालेली नाही. सेवा क्षेत्राबाबत सुद्धा हीच परिस्थिती आहे. जेथे उद्योग दाटीवाटीने उभे राहतात तिथे त्यांना अनेक फायदे मिळतात. त्या फायद्यांना agglomeration economies असे नाव आहे. इथल्या उद्योगांची उत्पादकता तुलनेने जास्त असते, तसेच रोजगाराच्या संधी, वेतन वगैरे सुद्धा अधिक असते. त्यामुळे देशाच्या इतर भागातून उद्योग आणि श्रमिकांचे येथे स्थलांतर होते. स्थलांतर ज्या भागात होते. तेथे उद्योगांची घनता तर असतेच, पण लोकसंख्येची घनतासुद्धा प्रचंड असते. या उलट ज्या भागांतून स्थलांतर होते, तिथे दर चौरस किलोमीटरला उद्योग कमी असतात आणि ही संख्या आणखी कमी होण्याची सुद्धा शक्यता असते. या भागांतून लोकसंख्या घटत असते कारण बहुतेक तरुण लोक स्थलांतर करत असतात, त्यामुळे जन्मदर कोसळतो. लोकसंख्या बऱ्यापैकी वृद्ध असते. कारण गावात बहुतेक तरुण लोक राहत नाहीत. त्यामुळे अर्थव्यवस्था वाढीसाठी आवश्यक असणारा एक महत्त्वाचा घटक सक्षम तरुणाई इथे सापडत नाही. इथल्या आर्थिक संधी कमी असल्यामुळे जी तरुण मुले गावात राहतात, त्यांची लग्न होण्यासाठी अनंत अडचणी येतात. त्यामुळेही जन्मदर घटतो. तालुक्याच्या, जिल्ह्यांच्या ठिकाणी आर्थिक वाढ आणि लोकसंख्या वाढ सुद्धा अगदी मर्यादित प्रमाणात होते. मोठ्या शहरांतून गर्दी वाढते. त्यामुळे शहरी व्यवस्थेवर ताण येतो. राहायला घरे सहजी मिळत नाहीत. बहुतेक वेळेस शहरात स्थलांतरित करून आलेले लोक सुरवातीस असंघटित क्षेत्रात किंवा गिग व्यवस्थेत कमी मोबदल्याची आणि खूप श्रमाची कामे करतात. त्यातील काही जण कालांतराने यशस्वी होतात तर बरेच जण अयशस्वी सुद्धा होतात. शहरात राहणाऱ्या लोकांना नागरी सुविधांच्या तुटवड्याचा सामना करावा लागतो.

**विकास करायचा म्हणजे महामार्ग बांधायचे असे सरकारचे धोरण आहे. यातून समृद्धी झाला आणि आता शक्तिपीठ तयार होतो आहे. पण खरेच या महामार्गामुळे त्या त्या भागाचा विकास होतो का?**

विकास होतो म्हणजे काय हे समजून घेऊ या. विकास होतो म्हणजे खालील चार बाबी होतात :

१. अर्थव्यवस्थेतील उत्पादकता सार्वत्रिकपणे वाढते. उत्पादकता म्हणजे काय? तेवढ्याच संसाधनात अधिक उत्पादन काढणे किंवा ठराविक उत्पादन कमी संसाधने वापरून काढणे. उदाहरणार्थ, भात शेतीला दर एकरी लागणारे पाणी कमी झाले तर हेच पाणी दुसरीकडे वापरता येते. खते कमी लागली तर त्यातून वाचलेले पैसे दुसरीकडे वापरता येतात, जेणेकरून दर एकरी उत्पादन वाढते. ही उत्पादकतेची वाढ सार्वत्रिक हवी आणि शाश्वत हवी.

२. प्रशासन अधिक कार्यक्षम होणे. यातून प्रशासनाची उत्पादकता वाढते.

३. राजकीय व्यवस्था समाजातील विविध घटकांच्या गरजांबाबत अधिक संवेदनशील होणे. हे झाले की एखादा समाज घटक कितीही बंचित असता, त्याचा राजकीय आवाज कितीही कमी असता तरीसुद्धा त्याच्या गरजा पूर्ण होऊ शकतात.

४. विकास होण्यासाठी चौथा आणि शेवटचा घटक महागजे समाजव्यवस्थेतील विविध घटकांना समानतेने वागवले जाते.

विकास होणे म्हणजेच या चार बाबींबाबत प्रगती होणे, या चार बाबी पुरेसा प्रमाणात अस्तित्वात आल्या की आर्थिक वाढ अधिक जोमाने आणि समान पद्धतीने होते. आर्थिक वाढ झाली की उद्योग वाढतात कारण मागणी वाढते. स्थानिक पातळीवर मागणी वाढली की उद्योग वाढतात. जेव्हा असे भूभाग अधिक प्रगत भागांशी हमरस्त्याने जोडले जातात तेव्हा इथल्या भागातील उद्योगांचे नुकसान होण्याची शक्यता अधिक असते. प्रगत भागात उद्योगांची घनता अधिक असते आणि त्यामुळे उद्योगांची उत्पादकतासुद्धा जास्त असते, प्रगत भागात माल बनवणे अप्रगत भागपिक्षा स्वस्त पडते. महामार्गाने अप्रगत भाग प्रगत भागांशी जोडले जातात प्रगत भागातील माल अप्रगत भागात तयार होणाऱ्या मालापेक्षा जागेवर स्वस्त पडतो आणि अप्रगत भागातील उद्योगांवर वाईट परिणाम होतो. चीनमधून आलेल्या स्वस्त वस्तूंनी जरी काही वर्षांपूर्वी इतर देशांतील मार्केट मारले तसेच हे आहे. पण महामार्गाशी जोडले जाऊन काही भागांचा फायदा सुद्धा होऊ शकतो, त्या ठिकाणी असलेला शेतीमाल लवकर मार्केटला पोचू शकतो. महामार्ग बांधून काही प्रमाणात कृषी व्यवस्थेला फायदा होऊ शकलातरी अप्रगत भागातील उद्योगांना मात्र फटका बसू शकतो. ग्रामीण भाग अधिकाधिक कृषिप्रधान कमी लोकसंख्येचे तुलनेने वृद्ध लोकसंख्या असलेले राहतात तर शहरी भागत औद्योगीकरण अधिक जोमाने होते. प्रातिक औद्योगिक विषमता वाढते.

**सरकार सध्या विकासावर खर्च करण्याऐवजी लाडकी बहीण योजना, नमो किसान या सारख्या थेट लाभाच्या योजना राबवीत आहे. याचा नेमका कसा परिणाम शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो?**

विकास होण्यासाठी मानवी क्षमता वृद्धीवर काम करावे लागते. शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था हे मानवी क्षमता वृद्धीचे दोन महत्त्वाचे खांब आहेत. गेली काही वर्षे भारत सरकार जनतेचा उपभोग खर्च वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. जीएसटीमधे सुधारणा, आयकरात सूट वगैरे पावले उचलली आहेत. लोकांच्या खिशात जास्त पैसा टाकला तर उपभोग खर्च वाढेल आणि मग मागणी वाढेल आणि त्यातून उद्योगांना, रोजगाराला हातभार लागेल असा त्यांचा होरा आहे. पण यात दोन मोठ्या अडचणी आहेत. लोकांच्या खिशात सरकारने पैसा टाकणे हा कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही. त्यासाठी लोकांची अधिक उत्पन्न मिळविण्याची क्षमता वाढवली पाहिजे. लोक अधिक उत्पादक झाले पाहिजेत. त्यातून उत्पन्न वाढेल, खर्च वाढेल. इथेही दुसरी अडचण आहे. लोकांना अधिक उत्पादक करायचे असेल तर त्यांचे शिक्षण, त्यांचे आरोग्य यात अधिकची गुंतवणूक करावी लागेल, चीन आपल्यापेक्षा अधिक यशस्वी आहे कारण त्यांनी आरोग्य आणि शिक्षणात मोठी गुंतवणूक केली. त्यासाठी सरकारला खर्च करावा लागतो. पण लाडकी बहीण, नमो किसान वगैरे थेट लाभाच्या योजनांवर इतका खर्च होतो, की इतर बाबींवर खर्च करण्यासाठी पैसा शिल्लक राहत नाही. त्यासाठी मग कर्ज काढावे लागते. यातून सध्यापुरते भागत असले तरी भविष्यात व्याज द्यावे लागते. मग पुन्हा ज्यातून लोकांची उत्पादकता वाढते. अशा खर्चांना कात्री लावावी लागते. त्यामुळे लोकांचेच नुकसान होते.

**बदलत्या वातावरणाचा शेतीला मोठा फटका बसत आहे. अशा परिस्थितीत शेतीचे भविष्य काय? शेतीकडे यापुढे कसे पाहावे लागेल?**

वातावरण बदल आणि त्यातून येणारी तापमानाची आणि पावसाची अनिश्चितता हा जगभरातील शेतीला भेडसावणारा विषय आहे. याचा फटका भारतासारख्या देशाला जास्त असतो कारण भारतात अल्पभूधारक, बोरडवाहू शेतकरी खूप आहेत. त्यांच्यासाठी तंत्रज्ञान परवडण्यासारखे नसते वापरून शेती करणे तांत्रिकदृष्टया शक्य असले तरी दीड एकर सोयाबीन लावणाऱ्या शेतकऱ्याला परवडण्यासारखे नसते शिकाय जरी लहान शेतकऱ्यांनी पीक रचनेत बदल करणे आवश्यक तरी उत्पनाची खात्री असल्याशिवाय लहान शेतकरी असे बदल सहस्वीकारणार नाहीत कोणत्याही बलातखाणिजोखीम सहन करण्याची प्रमाणात हे नुकसान सहन करतात महाराष्ट्र खास करुन विदर्भ आणि मराठवाडा, या बाबतीत पिछाडीवर आहे. यावर काम करावे लागेल. तसेच शेती व्यतिरिक कुक्कुटपालन, अंडी उत्पादन, पशुसंवर्धन यावर भर द्यावा लागेल. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शेती व्यतिरिक्त काही तरी रोजगार निर्माण करावा लागेल, जेणेकरुन शेतकरी कुटुंब पिके गेली तरी काही प्रमाणात तरी तग धरुन राहू शकतील. नुकसान भरपाई आणि पीकविम्याची रचना अधिक वेगवान आणि अधिक कार्यक्षम करावी लागेल.(साभार सकाळ ॲग्रोवन)

**अनिल जाधव**

# यज्ञा दुसानेच्या बलात्काऱ्यास फाशी केव्हा ?

**सं**पूर्ण राज्याला हादरवून सोडणाऱ्या बलात्काराच्या घटना लहान लहान निरागस बालिकांसोबत घडत आहेत. नुकतीच भीमराव कांबळे नावाच्या आणखी एका नराधमाने नसरापूर गावातील वेदवती कुलकर्णी नामक एका अवघ्या चार वर्षांच्या अबोध बालिकेवर अमानुष बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केली. पोलिसांनी त्याला तातडीने अटक केली खरी पण, न्यायालयात आता १५-२० वर्षे कायद्याचा कीस पाडला जाईल आणि हा नराधम आपल्या आयुष्याची उरलेली वर्षे जगून घेईल. ह्याला न्याय म्हणायचा ? अत्याचार करणाऱ्याला त्याने केलेल्या अत्याचारापेक्षाही भयंकर शिक्षा होत नाही तोपर्यंत गुन्हेगारी संपुष्टात येऊच शकत नाही.



नागपूरच्या अक्कू यादव प्रकरणाने ते पुष्कळ अंशी सिद्धही केले आहे. भर कोर्टात अक्कू यादवची त्याच्यापासून पीडित जनतेने हत्या केली होती आणि सरकारला तसेच गुन्हेगारांनाही एक संदेश दिला होता की जनतेने मनात आणले तर गुन्हेगारी संपवायला वेळ लागणार नाही. पण कायद्याच्या नावाने गुन्हेगारांना गुन्ह्याच्या आरोपांतून सुटण्यासाठी वेळ दिला जातो. एवढेच नव्हे तर गुन्हा केल्याचे गुन्हेगाराने कबूल केल्यानंतरही त्याला ताबडतोब शिक्षा न होता त्याला पुन्हा वरच्या कोर्टात अपील करण्याची संमती व सुविधा देण्यात येते. फाशीची शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज करण्याची तरतूदही कायद्यात दिली गेली आहे.

न्यायव्यवस्थेच्या ह्या उफराट्या निकालांमुळेच सर्वसामान्य जनता कुणाचीही मदत करण्याच्या फंदात पडत नाही आणि नेमके हीच गोष्ट गुन्हेगारांच्या पथ्यावर पडते. खून, बलात्कार, चोरी, मारहाण, छेडछाड उघड्या डोळ्यांनी बघूनही कुणीही पीडितेच्या मदतीला जात नाही. कारण अशा मदतीसाठी धावून गेल्यावर जर मदत करणाऱ्याच्या हातून यदाकदाचित गुन्हेगाराचीच हत्या घडून आली तर मदत करणाराच आयुष्यातून उठतो. तोच गुन्हेगार ठरतो आणि खरा गुन्हेगार पीडित ठरतो. अशा अनेक घटना घडलेल्या आहेत आणि मदत करणारे आयुष्यातून उठले आहेत. सरकार आणि न्यायव्यवस्थेने अशा प्रकरणांत मदत करणाऱ्यास खरेतर पुरस्कृत करण्याची गरज आहे.

मालेगावातील डोंगराळे गावातील यज्ञा दुसाने नामक अवघ्या चार वर्षांच्या बालिकेवर काही महिन्यांपूर्वी असाच अत्याचार झाला तेव्हा जनतेने महाराष्ट्रातील प्रमुख शहरांत मोठ्या संख्येने मोर्चे काढून गुन्हेगारास लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी म्हणून शासनास निवेदन दिले होते. जनतेचा रोष लक्षात घेऊन शासनाने सदर खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून गुन्हेगारास कठोरात कठोर शिक्षा देऊ असे आश्वासन दिले होते. शासनाने त्यानुसार त्वरीत निर्णय घेऊन फास्ट ट्रॅक कोर्टात सदर खटला चालविण्यास घेतलेही आणि सुप्रसिद्ध वकील उज्ज्वल निकम ह्यांची सरकारी वकील म्हणून नेमणूकही केली. पण आज पाच महिने उलटून गेल्यावरही कुमारी यज्ञाला न्याय मिळालेला नाही. गुन्हेगार अजूनही जिवंत आहे. गुन्हेगार फक्त मृत्यूला घाबरतात. गुन्हा करूनही जगण्याची शाश्वती असेल तर गुन्हेगार गुन्हा करायला कधीच कचरत नाही. त्यामुळेच बलात्कारासारख्या गुन्ह्यात लवकरात लवकर गुन्हा सिद्ध होऊन फाशीची शिक्षा झाली तरच असे गुन्हे करण्यास गुन्हेगार धजावणार नाहीत. फास्ट ट्रॅक कोर्टही गुन्हेगारास शिक्षा देण्यास चार पाच वर्षे लावणार असेल तर त्याला फास्ट ट्रॅक कोर्ट तरी का म्हणायचे ?

महाराष्ट्रातील तमाम जनतेची सरकारला एकमुखी मागणी आहे की, यज्ञा दुसाने हिच्या बलात्कारी आणि खुन्यास लवकरात लवकर फासावर चढवून यज्ञास न्याय मिळवून द्यावा. भीमराव कांबळे ह्याला सुद्धा तातडीने फासावर चढवून वेदवती कुलकर्णीला न्याय मिळवून द्यावा. फास्ट ट्रॅक कोर्टाने तीन महिन्यांच्या आत निकाल देऊन गुन्हेगारास फाशीची शिक्षा दिली पाहिजे. ही फाशी सुद्धा सार्वजनिक चौकात दिली गेली पाहिजे आणि सर्व न्यूज चॅनेलवर त्याचे जिवंत प्रसारण दाखवले गेले पाहिजे जेणेकरून पुन्हा कोणा नराधमाची असले कृत्य करण्याची हिंमत होणार नाही.

**अतुल सोमेश्वर कावळे**
९७३०५३५१९६

# दर ५३ मिनिटाला अत्याचार!

**पु**णे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या ४ वर्षीय एका चिमुकलीवर किळसवाणे क्रौर्य ६५ वर्षांच्या नराधमाने अत्याचार करून दगडाने ठेचून खून केल्याची अत्यंत घृणास्पद घटना नसरापूर येथे उघडकीस आली.ही घटना लपविण्याकरीता नराधमाने चिमुकल्या मुलीचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवला होता.या घटनेनंतर संपूर्ण नसरापूर परिसर स्तब्ध झाला व सर्वत्र संतापाची लाट उसळली आणि याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरात उमटले आहे .राज्यात दिवसेंदिवस मुलीवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.असे सांगितले जाते की राज्यात दररोज २७ मुली वासनेच्या बळी ठरत आहेत.याबद्दल गेल्या १२० दिवसांत ३,२७९ गुन्हे दाखल झाले आहेत.राज्यात दररोज चिमुकल्यांचे बालपण नराधमांकडुन खुडले जात असल्याचे भीषण वास्तव पोलिस दलाच्या आकडेवारीवरून समोर आले आहे.

मागील वर्षांत राज्यात एकूण १० हजार १३१ पोक्सो गुन्हे दाखल झाले होते.चालू वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांतच (एप्रिल अखेर) ३ हजार २७९ गुन्हे नोंदविले गेले आहेत. दर ५३ मिनिटांला एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याचा गुन्हा दाखल होत आहे.१ जानेवारी २०२५ ते २०२६ पर्यंत तब्बल १३ हजार ४१० गुन्हे दाखल झाले आहेत.यात पुणे जिल्ह्याची स्थिती अत्यंत गंभीर आहे.पुण्यात ग्रामीण भागात एप्रिल अखेरपर्यंत १४० गुन्हे तर शहर हद्दीत या चार महिन्यात १८१ गुन्हे नोंदविले गेले.पिंपरी-चिंचवड येथेही ११८ गुन्हे दाखल आहेत.ही आकडेवारी पहाता मुलीवरील अत्याचाराची स्थिती राज्यासाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक असल्याचे लक्षात येते.अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये पोलिस विभाग आपली चोख भुमिका बजावत असतांना त्यांना कायद्याच्या बाजूने मिळणारी मदत ही अत्यंत(कासवाच्या गतीने)हळूवार पणाची असल्याने अत्याचारांच्या गुन्ह्यात वाढ होत असल्याचे दिसून येते. मुलींच्या अत्याचारांच्या बाबतीत सरकारने पोलीस विभागाला खुली सुट द्यायला हवी व मुलींच्या अत्याचाराच्या प्रकरणातील संपूर्ण निकाल फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातूनच चालवायला हवेत,जेणेकरून पिडितेला व त्यांच्या परिवाराला ताबडतोब न्याय मिळू शकेल.



देशात शक्ती कायद्यात गुन्हेगाराला २१ दिवसांत फाशी देण्याची तरतूद आहे.मात्र दुर्दैवाने हा कायदा केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे.आज शक्ती कायदा राज्यात लागू असता तर नसरापूरच्या नराधमाला २१ दिवसांत फाशीची शिक्षा झाली असती आणि अशा गंभीर गुन्हेगारांवर कायद्याचा धाक बसला असता.परंतु राज्याचे दुर्दैव म्हणावे लागेल की अशा गंभीर गुन्ह्यांबद्दल राज्यात जलदगतीने निकाल लागत नाही.चाकणजवळील महाळुंगे येथे तीन वर्षीय मुलांवर(चिमुकल्यावर)अनैतिक अत्याचार करून गळा चिरून केलेल्या हत्येच्या घटनांनी महाराष्ट्रासह संपूर्ण देश हादरला असून या विरोधात प्रचंड जनक्षोभ उसळला असून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी सर्वत्र जोर पकडत आहे.कारण या दोन्ही घटना अंगावर शहारे येणाऱ्या व संपूर्ण महाराष्ट्राला सुन्न करणाऱ्या आहेत.

**रमेश लांजेवार**
मो.नं.९९२१६९०६७९

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज!



**आ**ज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०४ वि पुण्यतिथी. २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतून बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली.

शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचो असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले.

छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मादिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
मो.९९२२५४६२९५

## ...थोडक्यात...

### महापुरुषांचा इतिहास भ्रष्ट करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून देणार - गुलाबराव गावंडे



**अकोला :** गेल्या काही वर्षांपासून पुरोगामी अशी ओळख असणाऱ्या या महाराष्ट्रात वारंवार महापुरुषांचे अपमान होत आहेत. अनेक समाजकंटक छातीठोकपणे खुलेआम महापुरुषांचे अपमान करीत असून पण त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. अशा प्रकरणात दिग्दर्शक हा वेगळाच असतो.ते समाजात दुही निर्माण होईल या कारवायात सतत असतात. अशांना आता अद्दल घडविण्याची वेळ आली असून महापुरुषांचा इतिहास बदलणारांना त्यांची जागा दाखवून देण्यात येणार असल्याचा इशारा माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांनी दिला. बहुजन समाज जागृती महासंघाच्या वतीने बुधवारी पत्रकार परिषद घेण्यात आली.यावेळी माजी मंत्री गुलाबराव गावंडे ,अशोक अमानकर,सुभाष सातव,रमेश तायडे,राम मुळे,डॉ पुरुषोत्तम तायडे,विजयराव कौसल,पंकज साबळे,अनिल शिंदे,केशवराव पातोड,चंद्रकांत झटाले आदी उपस्थित होते. राज्याचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांबाबत अवमानकारक विधान धिरेंद्र गर्ग ने केले. या विधानाला उत्तर प्रदेशातील आनंद पांडे उर्फ आनंद स्वरूप याने समर्थन देत ' शिवाजी महाराज कधी मैदानी लढाई लढलेच नाहीत, लढले पेशवे आणि नाव झालं शिवाजीचं' असं विकृत विधान केलं आहे.

### वसंतराव नाईक विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातुरचा १०० टक्के निकाल

**पातुर :** नुकतेच महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे चा इयत्ता १२ वीचा निकाल ऑनलाईन जाहीर झाला असून यामध्ये वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातुर चा निकाल १०० इलागला असून यावर्षी सुद्धा महाविद्यालयाने आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातुर मधून एकूण ८३ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते,यापैकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालया मधून कु.साक्षी अमर वानखेडे हिने ८५.१७ इगुण प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे तसेच यश विनोद चव्हाण यांनी ७७.८० इ गुण प्राप्त करून महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे व कुमारी आरती सुरेंद्र तायडे हिने ७५.८४इ गुण प्राप्त करून महाविद्यालयातून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. या कनिष्ठ महाविद्यालयातून एकूण ०३ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले असून ५० विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत तसेच २७ विद्यार्थी हे द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट यशाबद्दल संस्थेचे संस्थापक/ सचिव मा.श्री रामसिंगजी जाधव साहेब यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्राचार्या सौ. मीरा ढोकणे मॅडम व सर्व मार्गदर्शक शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अभिनंदन केले.या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे.


## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२०/२०२६ प्रोसेस नं.३५/२०२६
चौ.ता. ०४/०५/२०२६ दिनांक : ०१/०४/२०२६

**अर्जदार :** १. बाजीराव जाकडे गवते -वय ५५ वर्षे, धंदा-शेता २. राजाराम जाकडे गवते -वय ६० वर्षे, धंदा-शेती ३. बाल्या जाकडे गवते -वय ५८ वर्षे, धंदा - शेती ४. बळीराम जाकडे गवते- वय ५७ वर्षे, धंदा-शेती ५. छगन जाकडे गवते (मयत) चे वारस ५अ. शांतीबाई छगन गवते- वय ४५ वर्षे, धंदा-शेती ५ब. मनोज छगन गवते -वय २५ वर्षे, धंदा-शेती ५क. दिनेश छगन गवते - वय २३ वर्षे, धंदा-शेती सर्व अर्जदार रा. भिली, ता. तेल्हारा, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ५क नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार यांचे वडील मयत नामे जाकडे गुगा गवते हे दि. १७/०३/१९९८ रोजी व अर्जदारांची आई मयत नामे सुंदरबाई जाकडे गवते ही दि. ०७/०८/२०१६ रोजी दोन्ही मौजे भिली, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०९/०६/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०१/०४/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा



## अकोला महानगरपालिका, अकोला
## सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोला

### निविदा सुचना क्र. ०४, (२६-२७)

आयुक्त, अकोला महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत ०८ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/९३/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : ०५/०५/२०२६



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com


# वृद्धाच्या बोटातील अंगठी हिसकावली; बारा तासांत आरोपी जेरबंद

## सिटी कोतवाली पोलिसांची अतिजलद कारवाई; १.१० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

शहरातील गणेशनगर परिसरात एका ७२ वर्षीय वृद्धाच्या हातातील सोन्याची अंगठी जबरदस्तीने हिसकावून नेण्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी घडली. मात्र सिटी कोतवाली पोलिसांनी तातडीने हालचाल करत अवघ्या १२ तासांत आरोपीला अटक करून गुन्ह्याचा पर्दाफाश केला.



याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश थोंडुजी केळकर (वय ७२, रा. गणेशनगर, रिंगरोड) हे मंगळवारी दुपारी सुमारे अडीच वाजताच्या सुमारास पोलीस लॉनसमोर थांबले होते. त्यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या एका १८ ते २० वर्षे वयोगटातील युवकाने त्यांच्या जवळ येत हात पकडून मारहाणीची धमकी दिली. त्यानंतर केळकर यांच्या बोटातील सुमारे ४.८० ग्रॅम वजनाची, अंदाजे ६० हजार रुपये किंमतीची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून नेली.

केळकर यांनी आरडाओरड करण्याचा प्रयत्न करताच आरोपीने 'आरडाओरड केल्यास जीव मारून टाकीन' अशी धमकी देत घटनास्थळावरून मोटारसायकलने पलायन केले. या प्रकरणी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याची माहिती मिळताच पोलिसांच्या डी.बी. पथकाने तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपी प्रणव मोहन बिचकुंदे (वय १८, रा. साधना चौक, तेलंगीपुरा, अकोट फाईल, अकोला) याचा माग काढण्यात आला. पोलिसांनी त्याला अटक करून त्याच्याकडून चोरीस गेलेली सोन्याची अंगठी तसेच गुन्ह्यात वापरलेली एमएच-३०-एयू-८१७३ क्रमांकाची सुझुकी ॲक्सेस मोटारसायकल असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच सिटी कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय गवई यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकाचे सहायक पोलीस उपनिरीक्षक महेंद्र बहादुरकर, पोलीस हवालदार अश्वीन सिरसाट, ख्वाजा शेख, किशोर येडल तसेच पोलीस कॉन्स्टेबल शैलेश घुगे व अमोल गायकवाड यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या केली. पुढील तपास पोलीस हवालदार ख्वाजा शेख करीत आहेत.

# भुमि अभिलेख कार्यालयांचा स्वतंत्र आढावा लवकरच

**कर्मचाऱ्यांच्या तक्रारींवर तात्काळ दखल; उपाययोजनांचे आश्वासन**

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

भुमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या व कामकाजातील विसंगतीबाबत मंत्रालय भुमि अभिलेख संघटनेने दिलेल्या निवेदनाची तात्काळ दखल घेत, अमरावती विभागातील सर्व उपअधीक्षक व जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख कार्यालयांचा स्वतंत्रपणे आढावा घेण्यात येणार असल्याची माहिती उपसंचालक सुदाम जाधव यांनी दिली. संबंधित समस्यांवर योग्य त्या उपाययोजना करून कर्मचाऱ्यांना न्याय दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात भुमि अभिलेख विभागात गट 'क' पदसमूह-४ कडील कनिष्ठ दर्जाची जमीन मोजणीची कामे गट 'क' पदसमूह-२ व ३ मधील कर्मचाऱ्यांना देण्यात येत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. कनिष्ठ दर्जाची कामे वरिष्ठ पदांवर सोपविण्यात येत असल्याने ही एकप्रकारे शिक्षा असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. याशिवाय जमीन मोजणी प्रकरणांचे असमान वाटप, कामकाजातील अन्य विसंगती आणि विविध प्रशासकीय अडचणींबाबतही संघटनेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग शासकीय-निमशासकीय अधिकारी कर्मचारी संघटना (मंत्रालय शाखा भुमि अभिलेख) यांच्या वतीने उपसंचालक कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. राज्याध्यक्ष किशोर इंगळे यांच्या नेतृत्वाखाली राज्य महासचिव विशाल चराटे, सरचिटणीस साहेबराव खंडारे, कोषाध्यक्ष रमेश तेलमोरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी हा प्रश्न मांडला. या निवेदनाची दखल घेत उपसंचालक सुदाम जाधव यांनी ४ मे रोजी लेखी आश्वासन देत, अमरावती विभागातील सर्व संबंधित कार्यालयांचा स्वतंत्र आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट केले. या निर्णयामुळे विभागातील कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, लवकरच ठोस निर्णयांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्र व कामगार दिनी विद्युत भवनात लाईनमनच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**परिमंडळातील ४५ तांत्रिक कर्मचाऱ्यांचा 'गुणवंत कामगार' पुरस्काराने सन्मान**



■ **प्रतिनिधी | अकोला** ■

महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाच्या औचित्याने महावितरणच्या अकोला परिमंडळात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्युत भवन, अकोला येथे महावितरणचा कणा मानल्या जाणाऱ्या लाईनमनच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच परिमंडळातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ४५ तांत्रिक कर्मचाऱ्यांना 'गुणवंत कामगार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विद्युत भवन येथे आयोजित कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर लाईनमनच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी अधीक्षक अभियंता दिपक सोनोने, सहाय्यक महाव्यवस्थापक मनिष भोपळे, कार्यकारी अभियंते अजितपालसिंह दिनोरे, धीरज चव्हाण, शशांक पोंक्षे तसेच उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरुण शेलकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्य अभियंता राजेश नाईक म्हणाले, 'लाईनमन हा खऱ्या अर्थाने प्रकाशदूत आहे. रात्रंदिवस, वादळ-वारा, पाऊस अशा कोणत्याही परिस्थितीत न डगमगता तो अत्यंत धोकादायक परिस्थितीत काम करतो. त्यामुळेच ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा देणे शक्य होते. लाईनमन ही महावितरणची केवळ ओळखच नसून तो महावितरणचा कणा आहे. त्यामुळे लाईनमनचा पुतळा उभारण्याचे भाग्य लाभल्याचा मला विशेष आनंद आहे.' ते पुढे म्हणाले, 'वीज ही अत्यावश्यक सेवा आहे. वीज क्षेत्रात केवळ इतिहासावर जगता येत नाही. ग्राहकांचे समाधान हेच आपले ध्येय असले पाहिजे. अडचणी कितीही असल्या तरी त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न झाले पाहिजे. आपल्या कामातून वीज ग्राहकांच्या मनात विश्वास निर्माण करणे हीच खरी सेवा आहे.' 'गुणवंत कामगार' पुरस्कारासाठी निवड झालेल्या ४५ कर्मचाऱ्यांमध्ये अकोला जिल्ह्यातील १४ कर्मचाऱ्यांचा समावेश असून त्यात ३ यंत्रचालक आणि ११ तंत्रज्ञ आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील २३ कर्मचाऱ्यांमध्ये ४ यंत्रचालक आणि १९ तंत्रज्ञांचा समावेश आहे. तर वाशिम जिल्ह्यातील ८ कर्मचाऱ्यांमध्ये १ यंत्रचालक आणि ७ तंत्रज्ञांचा समावेश आहे. आपल्या नैसर्गिक दिव्यांगावर मात करत विजेसारख्या सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या परिमंडळातील २१ दिव्यांग कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे दुचाकी वाहन मंजूर झाले. दुचाकी वाहनामुळे दिव्यांग कर्मचाऱ्यांना कार्यालयात ये - जा करण्यास सोयीचे होणार असून मुख्य अभियंता यांच्या हस्ते आज ६ दुचाकी वाहनाचे वितरण करण्यात आले. यामध्ये अकोला जिल्ह्यातील ६, बुलडाणा जिल्ह्यातील ११ आणि वाशिम जिल्ह्यातील ३ दिव्यांग कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुण शेलकर यांनी केले. सूत्रसंचालन यंत्रचालक संजय पुरकर यांनी केले, तर आभार सुरेंद्र क्षीरसागर यांनी मानले.

## अकोला इंडस्ट्रीज असो.ची विद्युत समस्यांवर चर्चा

**अकोला :** इंडस्ट्रीज असो.च्या वतीने महावितरण अंतर्गत औद्योगिक ग्राहकांसाठी स्वागत सेल बैठक घेण्यात आली. असो.च्या सभागृहात संपन्न या बैठकीत महावितरणचे मुख्य अभियंता नाईक तसेच संबंधित अधिकारी व तांत्रिक पथक उपस्थित होते.

# धनादेश अनादर प्रकरणी एक महिन्याच्या कारावासासह दंडाची शिक्षा

**ॲड. वेद प्रशांत पिदडी यांचा यशस्वी युक्तिवाद**

■ **प्रतिनिधी | अकोला** ■



व्यवहारातील थकबाकी रकमेपोटी दिलेला धनादेश अनादर झाल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत एक महिन्याच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच मुळ रक्कम व नुकसानभरपाई मिळून एकूण ६५ हजार रुपये आदेशाच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत अदा करण्याचे निर्देश दिले आहेत. अन्यथा सात दिवसांचा अतिरिक्त सक्त कारावास भोगावा लागेल, असा आदेश अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी व्ही. पी. धुर्वे यांनी दिला.

प्राप्त माहितीनुसार, अकोला येथील जगदीश आहुजा यांचा अलंकार मार्केटमध्ये 'कन्हैया सेल्स' या नावाने व्यवसाय असून ते अगरबत्ती व इतर वस्तूंची विक्री करतात. दर्यापूर येथील 'आयुष एजन्सी अँड बुक डेपो'चे संचालक भानुदास बी. मावळे हे आहुजा यांच्याकडून नियमितपणे माल खरेदी करत होते. सप्टेंबर २०२३ मध्ये मावळे यांनी ३२ हजार ५०८ रुपयांचा माल उधारीवर घेतला होता. ही रक्कम परतफेडीसाठी वारंवार मागणी करूनही दिली गेली नाही.

यानंतर मावळे यांनी ११ डिसेंबर २०२४ रोजी कॅनरा बँक, दर्यापूर शाखेचा ३२ हजार ५०८ रुपयांचा धनादेश दिला. हा धनादेश आहुजा यांनी त्यांच्या आयसीआयसीआय बँकेच्या टिळक रोड शाखेतील खात्यात वटवण्यासाठी सादर केला असता 'रक्कम अपुरी' या कारणावरून १५ जानेवारी २०२५ रोजी परत आला. त्यानंतर १० फेब्रुवारी २०२५ रोजी आरपीएडीद्वारे नोटीस बजावूनही रक्कम अदा करण्यात आली नाही. परिणामी, प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणात तक्रारदाराच्या वतीने ॲड. वेद प्रशांत पिदडी यांनी प्रभावी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचे पुरावे व कागदपत्रे तपासून न्यायालयाने भानुदास बी. मावळे यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७८(२) तसेच परक्राम्य दस्तऐवज कायदा, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत दोषी ठरवत एक महिना कारावास आणि ६५ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याची शिक्षा सुनावली.


**Change In Name**
Old Name
**HUMERA MAHEK MOHAMMD NASIR**
New Name
**HUMERA MAHEK MOHAMMAD NASIR**
Address. HAFIZ PURA MANGRULPIR TQ MANGRULPIR DIST WASHIM


# दुकाने - आस्थापनांनी व्यावसायिक परवाना काढणे सक्तीचे

## मनपाचे आवाहन; अन्यथा दंडात्मक कारवाई

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

अकोला महानगरपालिका हद्दीतील सर्व दुकान व आस्थापनांनी मनपाकडून आवश्यक व्यावसायिक परवाना घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करत मनपा प्रशासनाने संबंधितांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

परवाना न घेता व्यवसाय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ३७२ ते ३८६ (प्रकरण १८, भाग १ ते ४) तसेच महाराष्ट्र शासनाच्या १० ऑक्टोबर २००६ च्या निर्णयानुसार लहान व मोठ्या सर्व व्यावसायिकांनी महानगरपालिकेचा परवाना घेऊनच व्यवसाय करणे अनिवार्य आहे. मात्र काही आस्थापनांकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर मनपा उपायुक्त विजय पारतवार यांनी सर्व प्रतिष्ठानधारकांना तातडीने परवाना काढण्याचे आवाहन केले आहे. नियमांचे पालन करून महानगरपालिकेला सहकार्य करावे, अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# विद्यार्थ्यांची भर उन्हात पाण्यासाठी भटकंती

## खेट्रीत मूलभूत सुविधांचा अभाव; ग्रामस्थ वैतागले



■ **प्रतिनिधी | खेट्री** ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत खेट्री गावात गेल्या १५ ते २० वर्षांपासून पाणीटंचाईचा प्रश्न कायम असून, यंदाही परिस्थिती गंभीर झाली आहे. दरवर्षीप्रमाणे उन्हाळा सुरू होताच गावातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.

विशेष म्हणजे शाळांना सुट्टी लागल्यानंतर विद्यार्थ्यांना विश्रांतीऐवजी भर उन्हात पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

गावात नळयोजनेसाठी सुमारे पंधरा वर्षांपूर्वी पाण्याची टाकी व विहीर उभारण्यात आली होती. मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ही योजना निष्प्रभ ठरली असून, संबंधित प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत ग्रामपंचायतीवर पर्यायी पाणीपुरवठ्याची जबाबदारी असताना गेल्या काही महिन्यांपासून बेताल कारभार सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

खेट्री गाव जिल्ह्याच्या टोकावर असल्याने संबंधित अधिकारीही येथे फिरकत नसल्याची तक्रार असून, प्रशासनाकडून पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. परिणामी महिला, वृद्ध आणि विद्यार्थ्यांना डोक्यावर हंडे घेऊन दूरवरून पाणी आणावे लागत आहे.

दरम्यान, शाळांच्या सुट्ट्या लागल्यानंतर विद्यार्थ्यांना सुट्टीचा आनंद घेण्याऐवजी घरची जबाबदारी पार पाडावी लागत आहे. आई-वडील मजुरीसाठी शेतात गेल्यानंतर लहान मुलांनाच पाण्याची व्यवस्था करावी लागत असल्याने त्यांचे बालपणच या समस्येत अडकले आहे. गावातील नागरिकांनी प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन पाण्याची पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

**प्रशासनाचा निष्क्रिय कारभार चव्हाट्यावर**

ग्रामपंचायतीला शासनाकडून लाखो रुपयांचा निधी मिळूनही गावात मूलभूत सुविधांचा अभाव कायम आहे. पाणीपुरवठ्यासारख्या अत्यावश्यक सेवेकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

....................

'शाळेला सुट्टी लागली तेव्हा आम्हाला खूप आनंद झाला होता. पण आई-वडील मजुरीला गेल्यानंतर आम्हालाच भर उन्हात पाणी आणावे लागते. प्रशासनाने लवकरात लवकर पाण्याची व्यवस्था करावी.'

**विद्यार्थिनी, खेट्री**

# रेल्वेचा निर्लज्ज कारभार!
# ‘रेल नीर’च्या नावाखाली प्रवाशांची सरळ लूट : प्रशासन झोपेत
## १४ रुपयांच्या बाटलीसाठी २० रुपये उकळले; निकृष्ट पाण्याने प्रवाशांच्या आरोग्याशी खेळ

**वर्धा/जनमाध्यम**

देशभरातील रेल्वे प्रवाशांना स्वस्त व सुरक्षित पिण्याचे पाणी देण्याच्या गप्पा मारणाऱ्या प्रशासनाचा खरा चेहरा वर्धा रेल्वे स्थानकावर उघड झाला आहे. ‘रेल नीर’च्या नावाखाली प्रवाशांची अक्षरशः लूट सुरू असून, १४ रुपये एमआरपी असलेल्या बाटलीसाठी थेट २० रुपये उकळले जात असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

तहानलेल्या प्रवाशांच्या अडचणीचा गैरफायदा घेत ही उघड लूट दिवसाढवळ्या सुरू आहे. विक्रेत्यांकडून सर्रास जादा दर आकारले जात असून, यावर नियंत्रण ठेवण्यास रेल्वे प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. बाटलीवर छापलेल्या किमतीकडे दुर्लक्ष करून इतकेच द्यावे लागतील असा जाब देत प्रवाशांना अक्षरशः लुबाडले जात आहे.याहून धक्कादायक म्हणजे या पाण्याच्या गुणवत्तेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही प्रवाशांनी पाण्याची चव व दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याची तक्रार केली आहे. उन्हाळ्याच्या तडाख्यात पिण्याच्या पाण्याची गरज असताना, जादा पैसे मोजूनही निकृष्ट पाणी मिळणे म्हणजे प्रवाशांच्या आरोग्याशी थेट खेळच असल्याची तीव्र भावना व्यक्त होत आहे.रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी अशी जाहिरात करणारे प्रशासन प्रत्यक्षात प्रवाशांना वेठीस धरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अधिकृत विक्रेत्यांकडूनच जर नियमांचा खुलेआम भंग होत असेल, तर सर्वसामान्य प्रवाशांनी न्याय कुणाकडे मागायचा, असा प्रश्न उपस्थित होत आहे.या प्रकाराने रेल्वे प्रशासनाची बेफिकिरी आणि ढिसाळ कारभार पुन्हा एकदा उघड झाला आहे. प्रवाशांनी तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच एमआरपीपेक्षा अधिक दर आकारणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, प्रत्येक स्टॉलवर स्पष्ट दरपत्रक आणि पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.प्रवाशांच्या घशातच हात घालणारी ही लूट थांबणार का? की रेल्वे प्रशासन अजूनही ‘डोळेझाक’ करत बसणार असा प्रश्न आता सर्वत्र विचारला जात आहे.

### हप्त्यासाठी विकले जातात वीस रूपये बॉटल?


१४ रुपयाची बॉटल वीस रुपयाला का विकतात असा प्रश्न एका विक्रेत्याला विचारला असता त्यांनी सरळ नाव न सांगण्याच्या अटीवर काय करता भाऊ आम्हाला कर्मचाऱ्यांना हप्ता द्यावा लागतो त्यामुळे आम्हाला जास्त दराने माल विकावा लागतो असा घनाघात उत्तर एका विक्रेत्याने दिले.




# खड्ड्यांत गाडला गौळचा रस्ता; आमदारांचे ‘विकास’ कुठे हरवले?

**देवळी/जनमाध्यम**

कोळोणा (चोरे) चौरस्त्यापासून गौळ गावाकडे जाणारा मुख्य रस्ता अक्षरशः खड्ड्यांच्या तावडीत सापडला असून ‘विकासाच्या गप्पा’ करणाऱ्या लोकप्रतिनिधींना गावकऱ्यांनी थेट सवाल केला आहे. रस्त्यावरून डांबर आणि खडीच गायब झाल्याने हा मार्ग आता मृत्यूचा सापळा ठरला आहे. रस्त्यावरील खोल खड्डे, उघडी खडी आणि उखडलेले डांबर यामुळे वाहनचालकांचा जीव टांगणीला लागला आहे. दिवसाढवळ्या अपघाताची भीती आणि रात्री तर अक्षरशः काळोखात जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. तरीही प्रशासनाचे डोळेझाक धोरण कायम असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.गौळ हे गाव पोस्ट कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, सेतू कार्यालय तसेच संत लोटांगण महाराज व संत बाबाराव महाराज खराबे संस्थान यामुळे ओळखले जाते. दररोज कर्मचारी, विद्यार्थी, कामगार आणि भाविकांची मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे सर्वसामान्यांचे हाल अक्षरशः वाढले आहेत.विशेष म्हणजे, या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आमदार, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि तहसील प्रशासनाला वारंवार निवेदने देण्यात आली. पण एकाही अधिकाऱ्याने पाहणीसाठी पाय ठेवला नाही. त्यामुळे गावावर बहिष्कार टाकला आहे का असा प्रश्न गावकरी करत आहेत.आंजी, दापोरी, अडेगाव आणि कोळोणा या सर्व दिशांमधून येणारे रस्तेही खराब असल्याने गौळकडे जाणे म्हणजे अडचणींची यात्रा बनली आहे. विकासाच्या घोषणा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांची हीच का कामगिरी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.दरम्यान, आमदार राजेश बकाणे यांनी तात्काळ या रस्त्याची दुरुस्ती करून जनतेला दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलन उभारण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. फक्त आश्वासने नकोत, काम दाखवा असा इशाराही गावकऱ्यांनी दिला आहे.


डांबर-खडी गायब, जनतेचा संताप उसळला; आमदार साहेब, डोळे उघडा

## संक्षिप्त

### कुलूपबंद घर फोडून ६५ हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा -** सावंगी (मेघे) येथील नंदनवन नगर परिसरात कुलूपबंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी ६५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली. शुभम जुगलकिशोर शुक्ला (वय २९) हे घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. परत आल्यानंतर घराचे कुलूप तुटलेले दिसून आले. आत प्रवेश केल्यावर आलमारीतील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले आढळले. तपासणी केली असता सोन्याची अंगठी, कानातील दागिने तसेच रोख २५ हजार रुपये असा एकूण ६५ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### ४० हजार रुपये हिसकावले


**हिंगणघाट-**तालुक्यातील डोरला फाट्याजवळ अज्ञातांनी मोटारसायकलस्वाराला अडवून मारहाण करत ४० हजार रुपये जबरीने हिसकावल्याची घटना समोर आली आहे. भारत भास्करराव मानकर (वय ३८) हे मोटारसायकलने गावी जात असताना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या व्यक्तीने त्यांना थांबविले. ते थांबताच आरोपींनी त्यांच्यावर हल्ला चढवून मारहाण केली. यात ते खाली पडले. त्यानंतर आरोपींनी त्यांच्या खिशातील ४० हजार रुपये काढून घेतले व घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी वडनेर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू; निष्काळजीपणाचा ठपका

**वर्धा-**अमरावती-नागपूर महामार्गावर बोरी फाट्याजवळ झालेल्या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. धनराज बाबाराव कांबळे (वय ३४) हे कारने प्रवास करत असताना अपघात झाला. चालकाने वाहन निष्काळजीपणे चालविल्याने हा अपघात घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. अपघातात गंभीर जखमी झालेल्या कांबळे यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी कारंजा (घाडगे) पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### सिंचनाच्या पाण्यावरून वाद; मारहाणीत व्यक्ती जखमी

**वर्धा-**तळेगाव (टा.) येथे सिंचनाच्या पाण्याच्या कारणावरून




वाद होऊन मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. शंकर तपासे यांना शेतात पाणी दिल्याच्या कारणावरून विकास तपासे याने वाद घालत मारहाण केली. या मारहाणीत शंकर तपासे जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेमुळे गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी अल्लीपूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्याचे आवाहन करण्यात आले.

# करुणेचा महासागर उसळला; समता, शांती आणि प्रबुद्धतेचा संदेश घरोघरी

**वर्धा/जनमाध्यम**



तुम्ही जन्मलात अन् आम्ही माणूस झालो या भावपूर्ण शब्दांनी भारावलेल्या वातावरणात वर्ध्यात बुद्धपहाट या कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या उत्साहात पार पडले. तथागत गौतम बुद्धांच्या २५०० व्या जयंतीनिमित्त आयोजित या सोहळ्याने संपूर्ण परिसर करुणा, समता आणि शांततेच्या प्रकाशाने उजळून निघाला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व पंचशील ध्वज फडकावून करण्यात आली. त्यानंतर तथागत गौतम बुद्ध, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि कांशीराम यांच्या प्रतिमांना दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. या क्षणी उपस्थितांमध्ये एक वेगळाच भावनिक आणि प्रेरणादायी माहोल निर्माण झाला.या वर्षीही सुमारे २५ हजार नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून ‘बुद्धपहाट’ला ऐतिहासिक स्वरूप दिले. सकाळच्या शांत वातावरणात बुद्धविचारांचा निनाद आणि करुणामय संदेश यामुळे संपूर्ण परिसर आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला.कार्यक्रमात सादर झालेल्या बुद्धवाणीने उपस्थितांच्या अंतर्मनाला स्पर्श केला. अनेकांनी शांततेचा, आत्मचिंतनाचा आणि नवचैतन्याचा अनुभव व्यक्त केला. बुद्धाच्या शिकवणीतील करुणा, अहिंसा आणि समता या मूल्यांनी उपस्थितांच्या मनात खोलवर ठसा उमटवला.संपूर्ण कार्यक्रम नीरज गुजर यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत शिस्तबद्ध व सुयोग्य पद्धतीने पार पडला.

त्यांच्या नियोजन कौशल्याचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.‘बुद्धपहाट’ हा केवळ एक कार्यक्रम न राहता, सामाजिक एकात्मता, मानवी मूल्ये आणि प्रबुद्धतेचा जिवंत अनुभव ठरला. आयोजक व सहकाऱ्यांनी केलेल्या परिश्रमांमुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

# तीन दशकांनंतरही ‘लक्ष्मी मुक्ती’चा गाडा रुळावर नाही
## महसूल विभागाचे आदेश कागदावरच; महिलांच्या हक्कांवर अजूनही पडदा

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

ग्रामीण महिलांना शेतीत कायदेशीर हक्क देण्यासाठी राज्य शासनाने १९९२-९३ मध्ये सुरू केलेली ‘लक्ष्मी मुक्ती योजना’ तीन दशकांनंतरही प्रभावीपणे राबवली गेली नाही, ही वस्तुस्थिती आजही डोळ्यात अंजन घालणारी ठरत आहे. २००३ व २००४ मध्ये सुधारित आदेश काढूनही योजना कागदोपत्रीच राहिल्याचे चित्र आहे.

या योजनेअंतर्गत पतीच्या नावावरील शेतीच्या सातबारा उताऱ्यावर पत्नीचे नाव सहहिस्सेदार म्हणून नोंदविले जाते. विशेष म्हणजे ही प्रक्रिया पूर्णतः विनामूल्य आहे. तरीही ग्रामीण भागात जनजागृतीचा अभाव, प्रशासनाची उदासीनता आणि मोहिमांची कमतरता यामुळे महिलांना या योजनेचा लाभ मिळत नाही.तलाठ्याकडे अर्ज, पतीची संमती, आधार व सातबारा उतारा अशी सोपी प्रक्रिया असूनही अनेक ठिकाणी अंमलबजावणीचा वेग अत्यंत मंद आहे. सातबारावर नाव आल्यास महिलांना बँक कर्ज, शासकीय योजना व आर्थिक स्वावलंबनाची दारे उघडतात.प्रश्न मात्र कायम महिलांच्या सक्षमीकरणाची घोषणा करणाऱ्या योजनेचे अपयश नेमके प्रशासनाचे की जनजागृतीच्या अभावाचे.

# केस गळतीवर आधुनिक उपायांसाठी ७ ते ९ मे या तीन दिवसांचे जनजागृती व मार्गदर्शन शिबीर

**वर्धा/जनमाध्यम**

बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांपासून ते मध्यमवयीन नागरिकांपर्यंत केस गळणे, केस पातळ होणे आणि टक्कल पडणे या समस्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीएमआयएचईआर) अंतर्गत कार्यरत आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय (एव्हीबीआरएच), सावंगी (मेघे) यांच्या वतीने दिनांक ७ ते ९ मे दरम्यान हेअर ट्रान्सप्लांट जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर दररोज सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत एव्हीबीआरएच येथील त्वचारोग विभागात (ब्लड बँकेच्या वर) आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश केसांच्या समस्यांबाबत जनजागृती करणे तसेच आधुनिक वैद्यकीय उपचार पद्धतींची सविस्तर माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. शिबिरात तज्ज्ञ त्वचारोगतज्ज्ञांकडून उपस्थितांना सखोल मार्गदर्शन दिले जाणार असून, सहभागींच्या केस व टाळूची तपासणी करण्यात येईल. प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार वैयक्तिक उपचार योजना निश्चित करून योग्य वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे. तसेच आधुनिक हेअर ट्रान्सप्लांट तंत्रज्ञान, त्याची प्रक्रिया, फायदे आणि दीर्घकालीन परिणाम याबाबतही माहिती देण्यात येणार आहे.या शिबिरामुळे केस गळतीच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या नागरिकांना तज्ज्ञांचे थेट मार्गदर्शन मिळण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. विशेष सवलतींचाही लाभ सहभागी रुग्णांना देण्यात येणार असल्याचे रुग्णालय प्रशासनाने स्पष्ट केले आहे.नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा आणि वेळेत सल्ला घेऊन योग्य उपचार सुरू करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९२०९०५४७७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# समुद्रपूर बसस्थानकावर ‘शीतल जल’ उपक्रम
## सामाजिक कार्यकर्तांचा पुढाकार; प्रवासी, विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

**समुद्रपूर/जनमाध्यम**



कडक उन्हाळ्यात ४४ अंश तापमानाच्या झळा सहन करणाऱ्या प्रवासी, विद्यार्थी व नागरिकांसाठी समुद्रपूर बसस्थानकावर शीतल पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उभारण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ता मनीष गांधी यांच्या पुढाकारातून साकारलेल्या या उपक्रमामुळे बसस्थानक परिसरातील दीर्घकाळ भेडसावत असलेली पाण्याची समस्या दूर झाली आहे.तहसील मुख्यालय असलेल्या समुद्रपूर येथे दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. मात्र स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची ठोस सुविधा नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन मनीष गांधी यांनी स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांशी चर्चा करून उपाययोजना हाती घेतली. या उपक्रमासाठी आ. समीर कुणावार तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी यांनी सहकार्याचे आश्वासन दिले. तहसीलदार कपिल हाटकर यांनीही प्रशासनाच्या स्तरावर मार्गदर्शन केले.

# ३८ वर्षांच्या सेवेला सलामः देवळीत जवानाचे जल्लोषात स्वागत

**देवळी/जनमाध्यम**

देशासाठी ३८ वर्षे सेवा बजावून सेवा निवृत्त झालेले अशोक शंकर झिलपे यांचे देवळी येथे स्वागत करण्यात आले. मित्रपरिवार व झिलपे कुटुंबियांच्या पुढाकारातून गावातून मिरवणूक काढण्यात आली.मिरवणुकीची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच शहीद अशोक गेडाम स्मारकाला अभिवादन करून झाली. डीजेच्या तालावर, ढोल-ताशांच्या गजरात आणि फुलांच्या वर्षावात जवानाचे जोरदार स्वागत करण्यात आले.गावातील मुख्य मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली. प्रत्येक चौकात झिलपे यांचा सत्कार करण्यात आला. युवकांनी देशभक्तीपर घोषणांनी वातावरण दणाणून सोडले.या वेळी माजी खा.रामदास तडस, नगर परिषद अध्यक्ष किरण ठाकरे, माजी नगराध्यक्ष शोभा तडस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विविध सामाजिक संस्थांनीही सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.देशसेवा हीच सर्वोच्च सेवा, असे सांगत झिलपे यांनी तरुणांना सैन्यात भरती होण्याचे आवाहन केले.



# माती तपासल्याशिवाय भरघोस पीक नाही; अंधाधुंद खत वापर थांबवा
## तालुका कृषी अधिकारी प्रतिक्षा मेंढे यांचे शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन

**देवळी/जनमाध्यम**



माती तपासल्याशिवाय उत्पादनवाढीची स्वप्ने पाहू नका, असा इशारा देत तालुका कृषी अधिकारी प्रतिक्षा मेंढे यांनी शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. देवळी तालुक्यातील गौळ परिसरात आयोजित माती नमुना प्रात्यक्षिकात त्यांनी माती परीक्षणाचे महत्त्व ठसवले.

शेतीत वाढत्या खर्चामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी माती परीक्षण हा ‘रामबाण उपाय’ असल्याचे सांगत मेंढे यांनी नमूद केले की, अचूक नमुना घेतल्यास जमिनीतील अन्नद्रव्यांची स्थिती स्पष्ट होते आणि त्यानुसार खतांचा योग्य वापर करता येतो. अंधाधुंद खत टाकून जमीनही निकृष्ट होते आणि शेतकऱ्यांचा खर्चही वाढतो, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. प्रात्यक्षिकादरम्यान त्यांनी नमुना घेण्याची शास्त्रशुद्ध पद्धत उलगडली. शेताची पाहणी करून जमिनीचा प्रकार, रंग, उतार आणि खोलीनुसार विभागणी करावी. त्यानंतर नागमोडी पद्धतीने फिरत १० ते १२ ठिकाणांहून मातीचे नमुने घ्यावेत. खड्डा करून वरपासून खालपर्यंतची माती घेऊन सर्व नमुने एकत्र करून त्यातून सुमारे एक किलो प्रतिनिधिक नमुना तयार करावा, अशी माहिती त्यांनी दिली.पिकांनुसार नमुना घेण्याची खोलीही बदलते, याकडे लक्ष वेधत त्यांनी सांगितले की, तृणधान्ये व कडधान्यांसाठी १५ ते २० सेंटीमीटर, तर ऊस व कापूस यांसारख्या पिकांसाठी सुमारे ३० सेंटीमीटर खोलीतून नमुना घ्यावा. फळझाडांसाठी बुंध्यापासून थोड्या अंतरावरून माती घेणे आवश्यक आहे.नमुना घेताना जनावरांची वस्ती, खत टाकलेली जागा, झाडाखालील भाग किंवा पाणथळ क्षेत्र टाळावे. नमुना सावलीत वाळवून स्वच्छ पिशवीत भरून प्रयोगशाळेत पाठवावा, असेही त्यांनी आवाहन केले.योग्य माती परीक्षणामुळे उत्पादनवाढ तर होतेच, पण खर्चातही बचत होते, असे सांगत मेंढे यांनी शेतकऱ्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतींचा अवलंब करून शेती अधिक सक्षम करावी, असे आवाहन केले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक १५८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# जिल्हा परिषद शाळा ओस, विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांची भटकंती

## -खाजगी इंग्रजी शाळांचे वाढते वर्चस्व, जबाबदार कोण?

**खल्लार/प्रतिनिधीः-** ग्रामिण भागातील शिक्षण व्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शाळांची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक बनत चालली आहे. एकेकाळी गावागावात ज्ञानदीप प्रज्वलित करणाऱ्या या शाळा आज ओस पडू लागल्या असून विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठी घट होत आहे. यामागिल प्रमुख कारणांमध्ये शिक्षकांची कमतरता, दर्जेदार शिक्षण, वारंवार शैक्षणिक धोरणांतील अस्थिरता ठळकपणे समोर येत आहेत.

आज अनेक ग्रामिण भागातील गावांमध्ये शाळा असूनही शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. काही ठिकाणी एकाच शिक्षकावर अनेक वर्गांची जबाबदारी आहे, तर काही ठिकाणी शिक्षकांना प्रशासकीय कामांमध्ये गुंतवून ठेवले जाते. परिणामी, विद्यार्थ्यांना अपेक्षित दर्जाचे शिक्षण मिळत नाही.

याच पार्श्वभूमीवर शिक्षकांची सततची भटकंती ही आणखी एक गंभीर समस्या बनली आहे. बदली प्रक्रियेमुळे शिक्षक एका ठिकाणी स्थिर राहत नसल्याने विद्यार्थ्यांशी सुसंवाद तुटतो आणि शिक्षणात सातत्य राहत नाही. प्रत्येक नविन शिक्षकासोबत विद्यार्थ्यांना पुन्हा जुळवून घ्यावे लागते, ज्याचा परिणाम त्यांच्या गुणवत्तेवर होतो.

ग्रामिण भागात खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वर्चस्व दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. पालक आपल्या मुलांना 'इंग्रजी शिक्षण' मिळावे या अपेक्षेने खासगी शाळांकडे वळत आहेत. चांगल्या सुविधा, इंग्रजी माध्यम आणि शिस्तबद्ध शिक्षणाचा आभास यामुळे या शाळांकडे पालकांचा ओढा वाढला आहे. परिणामी, जिल्हा परिषद शाळा दिवसेंदिवस अधिकच ओस पडत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

पालकांवर दोष टाकणे सोपे असले तरी ते आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीच निर्णय घेत आहेत.हे वास्तव नाकारता येत नाही. दुसरीकडे, शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी, अपुऱ्या सुविधा, शिक्षकांची कमतरता आणि धोरणातील विसंगती यामुळे पालकांचा सरकारी शाळांवरील विश्वास डळमळीत झाला आहे. त्यामुळे या परिस्थितीची सर्वाधिक जबाबदारी शिक्षण व्यवस्थेवरच येते, असे स्पष्ट दिसून येते.

शासनाने केवळ योजना जाहीर करून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. शिक्षक भरती वेगाने पूर्ण करणे, शाळांमध्ये आधुनिक सुविधा डिजिटल शाळा करणे अत्यंत गरजेचे आहे.ही काळाची गरज आहे. तसेच, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना वेळोवेळी माहिती व तंत्रज्ञानाचे धडे ही प्रशासनाने दिले पाहिजे म्हणजेच ग्रामीण भागातील विद्यार्थी यांना योग्य पद्धतीने शिक्षणाचे धडे दिले जाईल. यावर अधिकाधिक भर द्यावा. जिल्हा परिषद शाळांमध्ये इंग्रजीसह दर्जेदार शिक्षण देण्यावर भर देणे, डिजिटल साधनांचा वापर वाढविणे आणि पालकांचा विश्वास पुन्हा मिळविणे आवश्यक आहे. अन्यथा, ग्रामीण शिक्षण व्यवस्था खासगीकरणाच्या विळख्यात अडकून सरकारी शाळांचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

ग्रामिण भागातील ओस पडणाऱ्या जिल्हा परिषद शाळा ही केवळ एक शैक्षणिक समस्या नसून सामाजिक असमतोलाचे लक्षण आहे. याकडे शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे गांभीर्याने पाहण्याची वेळ आता आली आहे.

> 'गावात शाळा असूनही ती ओस पडत आहे, हे दुर्दैवी आहे. शासनाने वेळेत लक्ष न दिल्यास ग्रामिण भागातील शिक्षण पूर्णपणे खासगीकरणाच्या विळख्यात जाईल. जिल्हा परिषद शाळा वाचवायच्या असतील, तर केवळ शिक्षकांची भटकंती पुरेशी नाही. शासन, प्रशासन, शिक्षक आणि पालक या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्यथा ग्रामिण भागातील शिक्षण व्यवस्थेचा पाया ढासळण्याची भीती नाकारता येणार नाही.
>
> **-अंकुश पाटील कावडकर (युवा सेना जिल्हाप्रमुख, उबाठा अमरावती)**

# सूर्यकांत जोग दीपशिखा गुरुकुल सैनिकशाळेचा निकाल १०० टक्के

**अमरावती/प्रतिनिधीः-** नुकताच -१२वी चा शैक्षणिक निकाल जाहीर करण्यात आला असून सूर्यकांत जोग दीपशिखेच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत उज्ज्वल यश संपादन केले आहे. यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी अनुक्रमे अव्वल स्थान मिळवले आहे. प्रथम क्रमांक: पियूष वाकोडे - ८४.५०टक्के , द्वितीय क्रमांक: प्राज्वल राठोड - ८२.१७टक्के , तृतीय क्रमांक: ओम पानसे - ८१.६७टक्के , चतुर्थ क्रमांक: रौनक राऊत - ८१.३३टक्के. याशिवाय गणित विषयात रौनक राऊत यांनी १०० पैकी ९८ गुण मिळवून विशेष प्रावीण्य मिळवले आहे.





सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. तसेच या यशामागे प्राचार्य राजेंद्र चर्जन,व समस्त शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य मोलाचे ठरले आहे.सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे नवजीवन संस्थेचे संचालक डॉ.के.एम कुलकर्णी आणि सदस्यगण यांनी अभिनंदन केले आहे.

# जीवन प्राधिकरणाचा हॉलमध्ये लिकेज !

## -हजारो लिटर पाणी वाया, प्राधिकरणाचा निष्काळजीपणा

**खल्लार/प्रतिनिधीः-** एकीकडे पिण्याच्या पाण्याचा तुटवडा, तर दुसरीकडे रस्त्यावर पाण्याचे लोट वाहत असून

दर्यापूर शहरात महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा योजनेतील निष्काळजीपणाचा प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे.

दर्यापूर शहरातील एअर हॉल (एअर हॉल कॉक) मधून मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत असून दररोज हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सदर गळतीमुळे परिसरातील रस्त्यावर पाण्याचे लोट वाहताना दिसत आहेत. त्या सासलेल्या पाण्यामध्ये वराह व इतर प्राणी बसत असून सर्वत्र रहदारीच्या ठिकाणी दुर्गंधी पसरली आहे. विशेष म्हणजे, एकीकडे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असताना दुसरीकडे अशी मोठ्या प्रमाणात होणारी पाण्याची नासाडीमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

नागरिकांनी याबाबत अनेकदा तक्रारी केल्या. पण अद्यापही ठोस उपाययोजना करण्यात आली नाही. गळतीमुळे रस्त्यावर मोकाट जनावरे पाणी पिण्यासाठी येत असून



अपघाताची शक्यता नाकारत येत नाही.

संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन गळती थांबवावी व पाणी वाचवण्यासाठी योग्य ती उपाययोजना करने गरजेचे आहे.

# अमरावतीच्या कुस्तीपटूंची राज्य-विदर्भ पातळीवर दमदार कामगिरी

## महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते विजेत्यांचा सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोलापूर येथे पार पडलेल्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत अमरावतीच्या गौरी धोटे हिने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक पटकावले. तिच्या या यशामुळे जिल्ह्याचे नाव उज्ज्वल झाले आहे.

तसेच अचलपूर येथे झालेल्या विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेत अर्जुन यादव, अंकित यादव, अनुज सारवान, ईशान्य गौर, मंगेश खोकले, रोहन बोंबले, शेख सोहेल, खुशाली हनवते आणि प्रिया पिसरवार यांनी आपल्या गटात उत्कृष्ट प्रदर्शन करत विविध पदके जिंकली.



या यशस्वी कुस्तीपटूंचा गौरव करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या वतीने सत्कार समारंभ स्व.सुदामकाका देशमुख सभागृह येथे आयोजित करण्यात आला. यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, गटनेता नाना आमले, गटनेता डॉ.राजेंद्र तायडे, नगरसेवक रतन डेंडुले, नगरसेवक डॉ.संजय तिरथकर, शहर अभियंता रविंद्र पवार, खेलो इंडिया कुस्ती प्रशिक्षक जितेंद्र भुयार यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच भविष्यात आणखी मोठ्या स्पर्धांमध्ये यश संपादन करण्याचे आवाहन केले.

# बुद्ध जयंती महोत्सव विश्वशांती रॅलीने शहर दुमदुमले

## आ.सुलभाताई खोडके व आ.संजय खोडके यांचा सहभाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** संपूर्ण विश्वाला शांती मैत्री करुणेचा संदेश देणारे महाकारुणिक भगवान गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या जयंती निमित्य शहरातील इर्विन चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळापासून ते भीम टेकडी पर्यंत विश्व शांती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये बहुसंख्य अनुयायायी सहभागी होऊन विश्वशांतीचा संदेश दिला. यावेळी सर्वत्र बुद्ध सरणं. गच्छामि.. धम्म सरणं. गच्छामि..संघ सरणं.गच्छामिचा स्वर निनादला होता. दरवर्षी बुद्ध जयंती उत्सव समितीच्या वतीने बौद्ध पौर्णिमेला शहरातून भव्य विश्व शांती रॅलीचे आयोजन करण्यात येते. यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध यांची प्रतिमा एका विशाल रथामध्ये स्थापित करण्यात आली. अमरावतीच्या आ. सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांनी विश्व शांती रॅलीमध्ये सहभागी होऊन समस्त अनुयायांना बौद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. वैशाख पौर्णिमेला सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला, याच दिवशी गौतमाला ज्ञानप्राप्ती झाली व ते सम्यक संबुद्ध बनले, ज्यांनी आपल्या ज्ञानाने मानवतेचा व शांतीचा संदेश देऊन सुखी समृद्ध जीवनाचे तत्वज्ञान मांडले. आणि वैशाख पौर्णिमेलाच गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले. म्हणून वैशाख पौर्णिमेला अनन्य साधारण महत्व असून हा दिवस मानवजातीला अंधाराकडून प्रकाशाकडे, शांतीकडे, ज्ञानाकडे व विकासाकडे नेणारा उत्सव असल्याचे सांगून आमदार महोदयांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पिरॅमिड ग्रुपचे संचालक गुणवंत देवपारे , रॅलीचे संयोजक सुनील रामटेके , मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, नगरसेवक मंगेश मनोहर यांचे सह भीम -बुद्ध अनुयायी - उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुद्ध जयंती रॅली ने विश्वशांतीचा संदेश देऊन बौद्ध सभ्यता व संस्कृतीचा परिचय दिला.



## जाहीर सुचना

आम जनतेस सुचित करण्यात येत आहे की, आमचे पक्षकार हे मौजे - पेठ अमरावती, प्रगणे - बडनेरा, ता.जि.अमरावती येथील नझूल शिट क्र.सी, प्लॉट क्र.१/३९ याचे एकुण क्षेत्रफळ ४८०० चौ.फुट (४४५.९३ चौ.मी.) हा प्लॉट दिनांक १७.१२.२०२० रोजीच्या पंजीबध्द बक्षीसपत्रानुसार आमच्या पक्षकाराच्या नावाने हस्तांतरित झाला असून आमचे पक्षकार या प्लॉटचे मालक आहेत. त्याचप्रमाणे हा प्लॉट आमच्या पक्षकाराच्या मालकी हक्काने ताब्यात आहे. या प्लॉटवर कोणाचे गहाण, हक्क अथवा हितसंबंध असल्यास ही जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासून ५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. या कालावधीमध्ये कोणत्याही व्यक्तिकडून हरकत प्राप्त न झाल्यास सदर प्लॉटवर कोणाचाही हक्क, बोजा, अथवा हितसंबंध नाही असे गृहित धरुन आमचे पक्षकार या प्लॉटचे हस्तांतरण करण्यासाठी मोकळे असतील. त्यानंतर या प्लॉटवर कोणालाही हक्क सांगण्याचा अधिकार राहणार नाही. करीता सदरची जाहीरसूचना आम जनतेच्या माहितीस्तव प्रकाशित केली आहे.

(ॲड.पी.यू.देशमुख)
खापर्डे बगीचा, डॉ.बेलसरे यांच्या दवाखान्याजवळ, इर्विन चौक, अमरावती
मो.९९७५६०९७१७

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २३७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३४०/२०२६ ने.ता.२३.०६.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती शकुंतलाबाई सहदेवराव राऊत, वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.श्रीकृष्ण सहदेवराव राऊत, वय ५० वर्षे, धंदा - शेती
३. श्री.गजानन सहदेवराव राऊत, वय ४४ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. बेबी अशोकराव वाकोडे, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वडुरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. वंदना गोवर्धन वानखडे, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा.सालोरा खुर्द, ता.जि.अमरावती
६. साधना गणेशराव पांडे, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.गोराळा, ता.मोर्शी जि.अमरावती
७. ललिता सुरेश इंगळे, वय ४० वर्षे, धंदा - घरकाम
रा.अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ७ चे वडील **नामे सहदेवराव पांडुजी राऊत** हे दि.**१२.०४.२०२२** रोजी **नेरपिंगळाई**, ता.मोर्शी जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०४.०५.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार अभिजीत रुपराव उमक, रा.देशपांडे प्लॉट, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी सर्वत्र आम जनतेस जाहीर नोटीस देतो की, माझे पक्षकार यांनी खालील न मुद शेत मालकासोबत त्यांचे ताब्यातील शेतजमीन झाडाझुडपासह, अंगभूत वस्तुसह व प ोटखराबसह खरेदी करण्याचा सौदा केला आहे. सौद्यातील शेतीचे वर्णन खालीलप्रमाणे--

**१)** होमदेव उत्तम पाखरे, रा.जयसिंगा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती यांचे मालकीची व ताब्यातील मौजा जयसिंगा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे भो.१, शेत भूमापन क्र.१३९, क्षेत्रफळ ०.४१ हे.आर, आकारणी २.०५ रु.पै. ज्याच्या दिशा पुर्वेस - पांदन रस्ता याला लागून लक्ष्मण पाखरे यांची शेती, पश्चिमेस - रस्ता बंदी सरकारी जमीन, उत्तरेस - प्रभुदास पाखरे यांचे शेत भू.क्र.१४२, दक्षिणेस - अमोल वाघमारे यांचे शेत

**२)** अमोल प्रकाशराव वाघमारे रा.सोमठाणा, अकोला, ता.जि.अकोला यांचे मालकीची व ताब्यातील मौजा जयसिंगा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे भो.१, भूमापन क्र.१३९, क्षेत्रफळ ०.४० हे.आर. आकारणी २.०० रु.पै. ज्याच्या दिशा पुर्वेस - पांदन रस्ता त्याला लागून लक्ष्मण पाखरे यांची शेती, पश्चिमेस - रस्ता बंदी सरकारी जमीन, उत्तरेस - याच भू.क्र.मधील होमदास पाखरे यांचे शेत, दक्षिणेस - अमोल काशिनाथ हनवते यांचे शेत.

या वरील नमुद शेती विषयी कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क, ताबा, कर्ज, गहाण, दान, बोजा, बक्षी, खरेदी, जीज, हिस्सा, करार, जप्ती, जामीन, अन्न-वस्त्र करार, नोटरी केलेला करार, खरेदी करारनामा, इतर वारस, मृत्यूपत्र न्यायालयातील व न्यायालयाबाहेरील वाद, चतुःसिमाबद्दल वाद वगैरे, ताब्यावरुन वाद, कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार, संबंध, इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापाासून ८ दिवसांच्या आत आम्हाला लेखी कागदपत्रासह कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. वरील मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची लेखी तक्रार, हरकत न आल्यास वरील नमुद शेती या खरेदी व्यवहार करण्यास योग्य व निर्जोखमी आहे असे समजून माझे पक्षकार वरील नमुद शेतीविषयी खरेदीचा व्यवहार वरील नमुद व्यक्तीसोबत पूर्ण करुन घेतील. मग त्यानंतर वरील नमुद शेतीसंबंधी कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही. विहित कालावधीनंतर केलेल्या तक्रारीच्यापरिणामास व खर्चास ती तक्रार करणारी व्यक्ती सर्वस्वी जबाबदार राही व माझे पक्षकार यांची कोणतीही जबाबदारी राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

खरेदी घेणार तर्फे अधिवक्ता
ॲड.निखील पुरुषोत्तमराव देशमुख
शिवप्रस्थ, १२ ब वृंदावन कॉलनी स्कूल ऑफ स्कॉलर शाळेमागे, निंभोरा, अमरावती
९०९६०२८७२०

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३४४/२०२६ ने.ता.२५.०६.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती वैशाली किशोर भेले, वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
२. यश किशोर भेले, वय २५ वर्षे, धंदा - शिक्षण
३. दिप किशोर भेले, वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण
सर्व रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे सासरे तर अर्जदार नं.२ व ३ चे आजोबा **नामे शेषराव पुंजाजी भेले** हे दि.**२६.१२.२०१०** रोजी अंबाडा, ता.मोर्शी जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. अर्जदार नं.१ ची सासू तर अर्जदार नं.२ व ३ ची आजी नामे **नामे चंद्रकला शेषरावजी भेले** हे दि. **०५.०८.२०१९** रोजी अंबाडा, ता.मोर्शी जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०४.०५.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

प्रो.नं.११९८/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०४.०५.२०२६

वि.सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./२१८/२०२६ दिनांक १२.०६.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -** १. धर्मेद्र कांतीलाल दोषी, वय ५७ वर्षे, धंदा - नोकरी
रा.प्रथमेश लेआऊट बोरगांव काटोल रोड, नागपूर, ता.जि.नागपूर
२. मुकेश कांतीलाल दोषी, वय ४९ वर्षे, धंदा - मजुरी
रा.राठीपुरा, बनोसा, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **कांतीलाल मोहनलाल दोषी** हे दिनांक **२९.०१.२०२२** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३१४/२०२६ ने.ता.१८.०६.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती पुष्पा प्रभाकर वानखडे, वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम
२. गौरव प्रभाकर वानखडे, वय २३ वर्षे, धंदा - शिक्षण
३. वैभव प्रभाकर वानखडे, वय १९ वर्षे, धंदा - शिक्षण
सर्व रा.ज्ञानदीप कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील **नामे प्रभाकर वामनराव वानखडे** हे दि.**०२.०१.२०२६** रोजी पी.डी.एम.सी.हॉस्पीटल,अमरावती, ता. जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २०.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## तहसिलदार तिवसा यांचे कार्यालय

**क्र. रामाक्र/एमआरसी-८१/ /तिवसा/२०२५-२०२६**

## जाहीरनामा

याद्वारे सर्वत्र नागरिकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार **श्रीमती रोशनी बिपीन कुमार,** रा.निस्वापूर, ता.कालपी, जि.जालौन (राज्य उ.प्र.) यांनी महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) व जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा, २०२३ भारत राजपत्र दिनांक ११.०८.२०२३ व मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क.अका/एमएजी/डे-२७/जन्म व मृत्यू नोंदणी (सुधा) अधि/आदेश/कावि-८१९/२०२३, दिनांक २३.१०.२०२३ व सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क. जमृनों २५२५/(ई.ऑ.९९११८१)/प्र.क.२२/कु.क., दिनांक १२ मार्च २०२५ नुसार अर्जदार श्रीमती रोशनी बिपीन कुमार रा.निस्वापूर, ता.कालपी, जि.जालौन (राज्य उ.प्र.) यांनी त्यांचे पती नामे **बिपीन संतोष कुमार** यांचा दिनांक ०४.०१.२०२५ रोजी तिवसा येथे अपघात झाल्याने मृत्यू झाला असल्यामुळे त्यांच्या मृत्यूची नोंद नगर पंचायत कार्यालय, तिवसा येथे होण्याकरीता आदेश मिळावा म्हणून अर्ज दाखल केला आहे.

तेव्हा ज्या कोणाला सदर प्रकरणी आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी सदरहू जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपला आक्षेप अर्ज लेखी आवश्यक पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा/-**
**(मयूर कळसे)**
**तहसीलदार, तिवसा**

## जाहीरनामा

मी किसनराव मारोतराव गुडधे, वय ७७ वर्षे, जाहीरनामा प्रसिध्द करतो की, माझी बायको (लग्नाची नाही) हिने माझ्या मालकीची अर्जित केलेली मौजे-बेनोडा, ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.२३ मधील ३१५० चौ.फुट जागा व मौजे-वडाळी, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.४८/१/ब मधील १७.५० आर जमीन एका टोळीचे मार्फत विकण्याचा घाट घातला आहे. वरील मालमत्ता माझे स्वतःचे कमाईची आहे. ही जागा माझे पत्नीचे नांवे केली होती. त्या दोन्ही जागेच्या खरेदीखतावर तिच्या नमुन्या सह्या व अंगठ्याचा ठसा नाही. याचा फायदा घेऊन सध्याच्या बायकोने माझे नावाचे कागदपत्राच्या पुराव्यावरुन आधारकार्ड, पॅनकार्ड व बॅंक पासबुक बनवले आहे. या आधारे वरील मालमत्ता विकून व पैसे गोळा करुन माझे वयाचा व बिमारीचा फायदा घेत माझे घर सोडून व मला सोडून कुठे तरी निघून जाण्याचा बेत मला समजला आहे. माझे वृध्दापकाळात कोणतेही कमाईचे साधन ाही. उपजीविकेचे साधन नाही. उदरभरणाचा कोणताही धंदा नाही. करीता वरील मालमत्ता माझे परवानगीशिवाय व माझे संमतीशिवाय कोणीही कोणतेही आर्थिक व्यवहार करु नये. जसे- खरेदी-विक्री, गहाण, कर्ज वगैरे. जर माझे परवानगी व संमतीशिवाय व्यवहार झाला तर तो कायदेशीर ठरणार नाही व त्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल,

करीता जाहीरनामा प्रसिध्दीस देत आहे.

दिनांक ०५.०५.२०२६

सही,
(किसनराव मारोतराव गुडधे)
मो.९३७३०९०२०३

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 57/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्ट, अमरावती, ता.जि.अमरावती**

बाबत अर्जदार - **जनक भाऊराव कडू**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - २१,०००/-**

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०५.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 09/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **पुर्णा संस्थान रामतिर्थ, ता.दर्यापूर, जि.अमरावती**

बाबत अर्जदार - **उमाकांत प्रविण शेळके**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - काही नाही**

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - ग्रामपंचायत रामतिर्थ, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील मालमत्ता क.८१४ मधील बांधकाम साईज ५६ X २० फुट क्षेत्रफळ ११२० चौ.फुट व स्लॅब साईज २५ X २० फुट क्षेत्रफळ ५०० चौ.फुट एकुण बाधंकाम १६२० चौ.फुट खुली जागा साईज ३१ X २० फुट क्षेत्रफळ ६२० चौ.फुट याची चतुःसिमा- पुर्वेस - पुर्णा नदी, पश्चिमेस - खुली जागा, उत्तरेस - श्रावणेश्वर मंदिर, दक्षिणेस - खुली जागा.

**स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत रु.१,००,०००/- एक लाख रुपये.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०५.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### राष्ट्रसंतांचा ग्रामजयंती महोत्सव साजरा

**तिवसा-** येथील त्रिमूर्ती नगर स्थित प्रार्थना मंदिर येथे माणिक बाबा गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा ११७ वा जन्मोत्सव अर्थात ग्रामजयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये जीवन प्रचारक दिलीपराव मोहेकर,निंभोरा यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर पांडुरंगबाबा भजन मंडळ तिवसा यांचा खंजिरी भजन याचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अजय कानबाले,देवा अळणे, सोहम अळणे, सोहम गावखरे,श्लोक अष्टुनकर, सोहम खेरडे, प्रणव मानमोडे, ओम दीक्षित, रियांश मानमोडे, श्रीमय केने, अंशु मकेश्वर,रूपम भुतडा,कार्तिक ठाकरे,स्वराज डहाके,लावण्या डहाके, ईश्वरी अष्टुनकर, अक्षरा डहाके अनुष्का भुतडा, वैष्णवी मानमोडे, रोशनी सहारे,युगाश्री टोंगे, रूण्मयी देशमुख, सुहानी गावखरे, आराध्या धानोरकर, छकुली अळने, आराध्या काळे, खुशी चौधरी, प्रियंका वानखडे,राधा वाट,अनन्या जस्वानी,राखी वाट आदींनी परिश्रम घेतले.

### पोटे पाटील आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये अस्थिरोग निदान शिबीर

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद यांच्या विद्यमाने पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद हॉस्पिटल येथे भव्य वातव्याधी व अस्थिरोग निदान व उपचार शिबीर पार पडले. या शिबिराला सर्वसाधारण रोगनिदान तपासणी औषधोउपचार शिबिरात ६० रुग्णांनी लाभ घेतला. या शिबिराचे उद्घाटन म्हणून, प्राचार्य डॉ. रणजित देशमुख डॉ. हेमलता माहोरे यांची उपस्थिती होती. रुग्णांची तपासणी व उपचार करण्यासाठी शिबिरातील तज्ञ डॉ. हर्षवर्धन नवल, डॉ. चैतन्य कावलकर, डॉ. अनिकेत राऊत हे तज्ज्ञ चिकित्सक उपस्थित होते. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी हॉस्पिटल मधील सर्वांनी परिश्रम घेतले.



### टाकरखेडा संभू येथे युवकाची आत्महत्या

**टाकरखेडा संभू-** येथे सोमवारला सकाळी ९ ते ९.३० वाजताच्या दरम्यान एका ३६ वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. रुपेश सुरेश पोटफोडे असे मृत युवकाचे नाव असून त्यांनी स्वतःच्या राहत्या घरी अँगलला दुपट्ट्याच्या सहाय्याने गळफास घेतला.घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. कुटुंबीयांनी तात्काळ धाव घेतली मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. मृताच्या पश्चात आई व विवाहित बहीण असा परिवार आहे.या प्रकरणी वलगाव पोलीस स्टेशन यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.





### अहिल्यादेवी होळकर कनिष्ठ महाविद्यालयाचा ८६.६६% निकाल

**आसेगाव पूर्णा-** आसेगाव पूर्णा परिसरातील अहिल्यादेवी होळकर कनिष्ठ महाविद्यालयाने यंदाच्या बारावीच्या निकालात ८६.६६ टक्के इतका उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ तर्फे नुकताच जाहीर झालेल्या ऑनलाइन निकालात महाविद्यालयातील एकूण ४५ विद्यार्थ्यांपैकी ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये राधा काळे हिने ८० टक्के गुणांसह प्रावीण्य श्रेणी प्राप्त केली. पूर्वादा हिने ६९ टक्के, तर शिवम शिवमळा याने ६७ टक्के गुण मिळवले. प्रथम श्रेणीत ६ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत २१ विद्यार्थी, तर उत्तीर्ण श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच माहोरे, धवणे, प्रा. अजय गार्ड बैल, प्रा. चौधरा व प्रा. तायडे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सराव परीक्षा आणि शिस्तबद्ध अभ्यासाला दिले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून आसेगाव परिसरातील ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सावधान!बनावट जनगणना अर्ज भरू नका

## सोशल मीडियावर फिरणाऱ्या लिकपासून दूर राहण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय नियोजन, विकास आणि कल्याणकारी उपक्रमांसाठी महत्त्वपूर्ण असलेली जनगणना प्रक्रिया सुरू झाली आहे. तथापि, जनगणनेच्या नावाखाली सोशल मीडियावर काही बनावट ऑनलाइन अर्ज आणि लिंक फिरत असल्याचे समोर आले आहे. नागरिकांच्या वैयक्तिक माहितीच्या संभाव्य गैरवापरामुळे, सरकारने नागरिकांना अशा लिंकपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. सरकारने नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी सरकारी वेबसाइट व्यतिरिक्त इतर कोणत्याही लिंकवर आपली माहिती भरू नये. देशाचा विकास निश्चित करणारा जनगणना उपक्रम प्रत्यक्ष सुरू झाला आहे. प्रथमच, नागरिकांना स्वयं-गणना नोंदणीसाठी आपली माहिती डिजिटल पद्धतीने भरण्याची




संधी देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे जनगणना प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक आणि तंत्रज्ञान-आधारित होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. तथापि, हा अर्ज सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सरकारी प्रक्रियेच्या नावाखाली एका बनावट अर्जाने नागरिकांना या अर्जापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

शासनाने १ ते १५ मे असा स्वयं-गणना कालावधी निश्चित केला आहे. या कालावधीत, नागरिक स्वतःची आणि त्यांच्या कुटुंबाची माहिती ऑनलाइन भरू शकतात. या कालावधीनंतर, घरांची यादी आणि घरगणना हा टप्पा १६ मे ते १४ जून या कालावधीत पूर्ण केला जाईल. जर नागरिकांनी या कालावधीत प्रत्यक्ष हजर राहून आपली माहिती भरली, तर गणकांद्वारे थेट घरभेटी देऊन पुढील प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होईल. या पार्श्वभूमीवर, शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने नागरिकांना सोशल मीडियावर फिरणाऱ्या बनावट ॲप्लिकेशन्सपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

> माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाने (डीजीआयआर) नागरिकांना जनगणना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी https://se.census.gov.in या अधिकृत वेबसाइटचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.



# शादलबाबा मंदिराचे अस्तित्व धोक्यात

## शासनाने मंदिर ताब्यात घ्यावे, मोठा अनर्थ घडण्याची शक्यता

**खल्लार-** येथून जवळच असलेल्या उपराई येथिल शादलबाबा मंदिर हे प्रसिद्ध व ऐतिहासिक देवस्थान म्हणून ओळखले जाते.मात्र आज परिस्थितीला या मंदिराचे अस्तित्व काही वेगळेच झाल्यामुळे शासनाने याकडे लक्ष देऊन मंदिर ताब्यात घ्यावे अशी मागणी आता युवासेना, भाविक व नागरिकांनी केली आहे. चैत्र महीन्यात येथे दरवर्षी यात्रा भरते यात लाखो भाविक शादल बाबा देवस्थान येथे दर्शनासाठी येतात .त्यात काही महिला, वृद्ध, असे भाविक येत असतात परंतु तेथे त्यांना पाणी संडास बाथरूम व राहण्याची कोणतीच व्यवस्था नसल्यामुळे त्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होते.भाविक आपली लहान मुले घेऊन पायदळी भटकतात, ९०% हिंदू लोकांचे शादल बाबा देवस्थान हे कुलदैवत आहे. या ठिकाणी पुरातन मंदिर असून सोई सुविधांपासून दूर आहे. या मंदिराला दरवर्षी लाखो रुपयांची वर्गणी जमा होते पण ही वर्गणी जाते तरी कुठे?असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने त्वरित शादल बाबा देवस्थान येथे लक्ष देऊन ते देवस्थान शासनाच्या ताब्यात घ्यावे, अन्यथा भविष्यात तिथे मोठा अनर्थ घडू शकतो अशी मागणी युवासेना व भाविकांनी केलेली आहे.

> काही लोकांनी कुणालाही विश्वासात न घेता बनावट दस्ताऐवज सादर करुन खोटी समिती स्थापन केली आहे. या समितीद्वारा भाविकांकडून जमा झालेली वर्गणी हडपण्याचा प्रकार सुरु आहे.
>
> **प्रतिक राऊत,** युवासेना जिल्हा सरचिटणीस

# अमरावती-परतवाडा महामार्गावर कडूनिंबांची जाळपोळ

## जुनी झाडे धोक्यात, मार्की फाट्यावर धुरामुळे वाहनचालक त्रस्त

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

अमरावती-परतवाडा महामार्गावरील कडूनिंबाच्या झाडांना आग लावण्याचे प्रकार गेल्या पंधरवड्यापासून सुरूच असून, या जाळपोळीमुळे शेकडो वर्षे जुनी झाडे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. संबंधित विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक व वृक्षप्रेमींकडून केला जात आहे.

सोमवारी (दि. ४) दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास मार्की फाटा परिसरात, पेट्रोल पंपाजवळील तीन ते चार कडूनिंबाच्या झाडांना आग लागली. आगीमुळे मोठ्या प्रमाणात धुराचे लोट निर्माण झाले. याचा परिणाम वाहनचालकांवर झाला असून, धूरामुळे त्यांना त्रास सहन करावा लागला. या सातत्याने घडणाऱ्या घटनांमुळे अमरावती परतवाडा महामार्गावरील दुतर्फी जुनी कडूनिंबाची झाडे धोक्यात आली असून, जाणीवपूर्वक जाळपोळ केली जात असल्याची शंका व्यक्त होत आहे. या प्रकरणात संबंधित विभागाची भूमिका संशयास्पद असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.सदर प्रकरणाबाबत तुषार काळे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.



> ‘महामार्गावरील कडूनिंबाची झाडे ही पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. सतत होणारी जाळपोळ थांबवण्यासाठी तातडीने कारवाई करून दोषींवर कठोर शिक्षा झाली पाहिजे. अन्यथा हा हिरवागार वारसा नष्ट होईल,’
>
> **आशिष वाटाणे,** वृक्षप्रेमी

# भगवंतराव शिवाजी पाटील महा.व बाबासाहेब सोमवंशी कनिष्ठ महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम

**परतवाडा-** भारतीय विद्या मंदिर, अमरावती व्दारा संचालित जिल्हातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या प्रतिष्ठीत भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयातील स्व. बाबासाहेब सोमवंशी कनिष्ठ महाविद्यालयाने एचएसएससी बोर्ड परिक्षा मार्च २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन केले असून या वर्षी सुध्दा आपल्या यशाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे.महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून आठ विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले आहे त्यातील नेहा अंजुम इझहर सयेद (८९.१७%), नकुल मनोज मिश्रा (८४.८३%), प्राची राजेश चावरे (८४.३३%), आस्था अनुप चौरसिया (८४.००%), साक्षी गजानन पिंगे (८२.८३%), विधी हरिओम सरोया (८०.६७%), अंजली सुनील जडीये (७९.३३%) व रिया गजानन पांडे (७९.००%) या प्रमाणे गुण प्राप्त झाले आहे. तसेच कला शाखे चा निकाल ५५ टक्के लागला असून तुनिषा लक्ष्मिचन्द टहलवानी हिने यावर्षी महाविद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशा करीता भारतीय विद्या मंदिर संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आराधना वैद्य, उपाध्यक्ष बिजवे, सचिव प्रशांतजी भागवतकर, कोषाध्यक्ष अनंत सोमवंशी यासह सर्व संस्थेच्या पदाधिकारी यांनी अभिनंदन केले.तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर, सर्व सन्मानीय वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक राजेश,कोरडे, कुळकर्णी, महाजन, डोईफोडे,मेंडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्याकरीता शुभेच्छा दिल्या आहेत.



# जनता विद्यालयाचा बारावीचा ७५.४३ टक्के निकाल

**अंजनगाव बारी-** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी–मार्चमध्ये झालेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. अंजनगाव बारी केंद्राचा एकूण निकाल ७५.४३% लागला असून ग्रामीण भागातील मर्यादित सोयी–सुविधा आणि शासनाच्या ’कॉपीमुक्त अभियान’ अंतर्गत कडक शिस्तीत परीक्षा देऊनही विद्यार्थ्यांनी प्रामाणिक प्रयत्नांनी मिळवलेले हे यश सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे. विद्यालयातील गुणवत्ता यादीत अमृता श्रीकृष्ण गवई हिने ७६% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. सातत्याने आणि प्रामाणिकपणे अभ्यास करून तिने हे यश मिळवले.द्वितीय क्रमांक- अंजली भीमराव चुटे (६८.१६%) तृतीय क्रमांक- श्वेता विजयराव तलवारे (६३.१६%)या वर्षी एकूण ५७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.



त्यातील निकाल पुढीलप्रमाणे : विशेष प्राविण्य–१, प्रथम श्रेणी –५,द्वितीय श्रेणी–२५, उत्तीर्ण श्रेणी–१२,विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्ष राजूभाऊ टारपे, आनंदरावजी इंगोले, शाळा समिती सभापती महादेवरावजी चकुले, सदस्य सोमेश्वरराव इंगोले सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच प्राचार्य विनोद मुगल व पर्यवेक्षक गजेंद्र अवघड यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थिनींनी आपल्या यशाचे श्रेय शिक्षक व पालकांच्या मार्गदर्शनाला दिले.

# महापौर यांच्या हस्ते कॉंक्रीट रस्ता व अंडरग्राउंड नाली कामांचे भूमिपूजन

**अमरावती-** महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या शुभहस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन पप्पू लेखवानी यांच्या घराजवळ उत्साहात झाले.या कार्यक्रमात कॉंक्रीट रस्ता व अंडरग्राउंड नाली अशा महत्त्वपूर्ण नागरी सुविधांच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. कॉंक्रीट रस्ताः सुरेश गाडीचा ते पप्पू लेखवानी,हरेश पंजाबी ते शिव मंदिर ग्राउंड कॉर्नर, अंडरग्राउंड नाला-सुरेश गाडीचा ते एवन ज्वेलर्स,मनोहरलाल सोनी ते पप्पू लेखवानी, रवि मुंडवाणी ते ताराचंद दलवानी या विकासकामांमुळे परिसरातील रस्ते व पाणी निचरा व्यवस्थेत मोठी सुधारणा होणार असल्याचे यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी यांनी सांगीतले. या भूमिपूजन कार्यक्रमास पूज्य पंचायत रामपुरी कॅम्पचे अध्यक्ष डॉ. इंद्रलाल गेमनानी, सचिव मोहनलाल आहुजा, हरीश सुंदरानी, भगवानदास रूपेजा, बक्शाराम गाडीचा, सच्चानंद चंदवानी, रामचंद डोडानी, अंकित गाडीचा, राजेशकुमार तारवानी, सुंदर तारवानी, किशोर पिंजानी, प्रेम माखीजा, भावेश सचदेव, रमेशलाल पिंजानी, विजय थदानी, जीतू थदानी, आशीष बजाज, विक्की खत्री, अजय पोपटानी, विशाल पिंजानी, अनिल जीवतानी, आनंद मंगलानी, अशोक कुकरेजा, गोविंद खत्री, हरीश काछेलानी, महेश खट्टर, मनोहरलाल तख्तानी, पपन मेघानी, प्रकाश उदासी, राजा त्रिकोटी, विजय पुरसानी तसेच परिसरातील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजन यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून लवकरच कामे पूर्ण होऊन परिसराचा विकास वेगाने होईल, असा विश्वास यावेळी महापौरांनी व्यक्त केले.



# पीडीएमसी ‘महाराष्ट्र दिन’ साजरा

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालीत डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरातील प्रांगणामध्ये महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिनाचा कार्यक्रम अधिष्ठाता यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी ध्वजवंदन करून मानवंदना दिली. त्यानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीत तसेच महाराष्ट्र गीत सादर केले. उपस्थितांकडून भारत माता की जय, महाराष्ट्र दिन चिरायू होवो अशा घोषणा देण्यात आल्या. महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, सुरक्षा रक्षक इत्यादी मोठया संख्येने उपस्थित होते. संचालन क्रीडा संचालक संजय वाटाणे यांनी केले.







# मतदारयादी मॅपिंगचे कार्य तातडीने पूर्ण करावेत

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**अमरावती/का.प्र.**

निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनरावलोकन जाहिर केला आहे. त्यानुसार याआधी मतदारांची मॅपिंग करण्यात येत आहे. यात मतदारांची मॅपिंग झाली नसल्यास त्यांना नोटीस देऊन सुनावणी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे मॅपिंगचे कार्य तातडीने पूर्ण करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवनात मतदारांच्या मॅपिंगबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, महापालिकेचे उपायुक्त महेश देशमुख, योगेश पिटे, तहसिलदार विजय लोखंडे आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी येरेकर यांनी निवडणूक आयोगाने नेमून दिलेले कार्य वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. विशेष संक्षिप्त पुनरावलोकन कार्यक्रमाची जबाबदारी बीएलओवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे सध्याच्या मतदारयादीतील मतदारांचा २००२च्या मतदारयादीत शोधावे लागणार आहे. यासाठी ॲप विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे बीएलओंनी प्रत्येक मतदारांचा शोध घेऊन मॅपिंग करणे आवश्यक आहे. मॅपिंगची टक्केवारी कमी झाल्यास उर्वरीत मतदारांना नोटीस देऊन सुनावणी घ्यावी लागणार आहे. हे काम अत्यंत जिकरीचे होणार असल्याने बीएलओंनी मॅपिंगची टक्केवारी वाढविणे आवश्यक आहे.

जिल्ह्यात प्रामुख्याने बडनेरा आणि अमरावती या शहरी भागात मॅपिंगची गती वाढविणे आवश्यक आहे. मतदारांची मॅपिंग झालेली नसल्यास मतदारयादीतील नाव वगळण्याआधी मतदारांकडून फॉर्म नं. सात भरून घेण्याची कारवाई करावी. कमी मॅपिंग झालेल्या क्षेत्रातील मॅपिंगची टक्केवारी वाढविण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ पुरविले जाणार आहे. त्यामुळे येत्या १५ मेपर्यंत ९५ टक्के मॅपिंग होण्यासाठी बीएलओंनी प्रयत्न करावेत. मॅपिंगच्या कामी खासगी संस्थांमधील कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित संस्थांनाही पत्र देऊन बीएलओंना शाळेतील कामामधून सूट देण्याची सूचना करण्यात येणार आहे. मॅपिंगच्या कामात अडथळा आणल्यास संबंधित बीएलओंवर फौजदारी कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे बीएलओंनी मॅपिंगचे काम काटेकोरपणे पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले. सुरवातीला उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी मतदारांच्या मॅपिंगबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी मॅपिंगचे कार्य उत्कृष्टरित्या केलेल्या बीएलओंनी मनोगत व्यक्त केले.

# अकोटातील 'बेनामी' खाणसाम्राज्यावर कारवाईचा घणाघात कधी ?

## महसूल ते प्रदूषण मंडळापर्यंत सर्व यंत्रणा प्रश्नांच्या भोवऱ्यात

### आदिवासींच्या नावावर व्यवहार, नियंत्रण मात्र बाहेरच्यांचेच

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर-रुदाळी परिसरातील कथित 'बेनामी' खाणप्रकरण आता केवळ स्थानिक वादापुरते मर्यादित न राहता प्रशासकीय जबाबदाऱ्यांचा कस पाहणारे प्रकरण ठरत आहे. जमिनी आदिवासींच्या नावावर, परवाने त्यांच्या नावे; मात्र खनिज उत्खनन, आर्थिक गुंतवणूक आणि नफ्याचे नियंत्रण बाह्य घटकांकडे असल्याचा आरोप अधिक तीव्र होत आहे. या संपूर्ण साखळीत कोणकोणते विभाग येतात आणि कोणत्या स्तरावर कारवाई अपेक्षित आहे, याचे चित्र अधिक स्पष्ट होऊ लागले आहे.

या प्रकारात सर्वप्रथम जबाबदारी येते ती महसूल यंत्रणेची. आदिवासी जमिनींचे संरक्षण, व्यवहारांची वैधता आणि परवानग्यांची तपासणी हे काम तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारित येते. नियमबाह्य व्यवहार आढळल्यास जमीन जप्त करणे, व्यवहार रद्द करणे आणि संबंधितांना दंड ठोठावणे हे अधिकार या यंत्रणेकडे आहेत. प्रत्यक्षात मात्र अनेक प्रकरणांत प्राथमिक तपासही वेळेवर होत नसल्याची तक्रार आहे.

खनिज उत्खननाच्या बाबतीत जिल्हाधिकारी आणि खनिज विभागाला व्यापक अधिकार दिले आहेत. परवानगीशिवाय उत्खनन, परवानगीपेक्षा अधिक उत्खनन किंवा नियमांचे उल्लंघन झाल्यास तात्काळ काम बंद करण्याचे आदेश देणे, यंत्रसामग्री जप्त करणे आणि बाजारमूल्याच्या अनेकपट दंड आकारणे शक्य आहे. तरीही अनेक ठिकाणी उत्खनन सुरूच राहिल्याचे दिसून येते.

औद्योगिक स्वरूपाच्या प्रकल्पांसाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी अत्यावश्यक असते. स्टोन क्रशर, डांबर प्लांट यांसारख्या युनिट्सकडून धूळ, धूर आणि आवाज प्रदूषण होत असल्यास मंडळाला थेट कारवाई करून उद्योग बंद करण्याचे अधिकार आहेत. पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत दोषींना कारावासाची तरतूदही आहे. तरीही अनेक प्रकल्प विनाअट सुरू असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून मिळणाऱ्या अनुदानाचाही या प्रकरणाशी संबंध जोडला जात आहे. जर उद्योग उभारणीसाठी चुकीची माहिती देऊन अनुदान घेतले असेल, तर ते परत वसूल करण्यासोबतच फसवणुकीचे गुन्हे दाखल होऊ शकतात. या अनुदान प्रक्रियेची चौकशी झाल्यास मोठे आर्थिक गैरव्यवहार उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बेनामी व्यवहारांचा संशय अधिक गंभीर मानला जातो. बेनामी व्यवहार प्रतिबंध कायद्यानुसार अशा मालमत्ता जप्त करून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाऊ शकते. दोषी सिद्ध झाल्यास कारावासासह मोठा आर्थिक दंड होऊ शकतो. या कायद्यांतर्गत चौकशीसाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती होते, ज्यामुळे प्रकरणाचा व्याप वाढू शकतो.

याशिवाय भारतीय दंड संहितेअंतर्गत फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे, संगनमत अशा गुन्ह्यांची नोंद होऊ शकते. पोलीस यंत्रणेला यामध्ये गुन्हा दाखल करून सखोल तपास करण्याचा अधिकार आहे. आर्थिक गुन्हे शाखा आणि कर विभागही मोठ्या व्यवहारांच्या चौकशीत सहभागी होऊ शकतात.

इतक्या विविध स्तरांवर कारवाईची तरतूद असतानाही प्रत्यक्षात ठोस पावले उचलली जात नसल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक पातळीवर सर्व व्यवहार उघडपणे सुरू असताना संबंधित विभाग अनभिज्ञ असल्याचा दावा केला जात असल्याने 'कारवाईत ढिलाई की संगनमत?' असा सवाल उपस्थित होत आहे.

#### कायद्यांनुसार कठोर शिक्षा शक्य

बेनामी व्यवहार : ७ वर्षांपर्यंत कारावास आणि दंड
फसवणूक : ७ वर्षांपर्यंत शिक्षा
बनावट कागदपत्रे : १० वर्षांपर्यंत कारावास
पर्यावरण नियमभंग : दंड आणि कारावास
अवैध उत्खनन : अनेकपट दंड आणि जप्ती

#### कोणत्या अधिकाऱ्यांकडे कोणते अधिकार?

जिल्हाधिकारी : जमीन जप्ती, परवानगी रद्द, खनिज कारवाई
उपविभागीय अधिकारी : उत्खनन थांबवणे, दंडात्मक कारवाई
तहसीलदार : जमीन नोंदी, व्यवहार पडताळणी
प्रदूषण मंडळ अधिकारी : उद्योग बंद करण्याचे अधिकार
पोलीस अधिकारी : गुन्हे नोंद व तपास

#### कारवाई टाळल्यास अधिकाऱ्यांवरही कारवाई शक्य

जर संबंधित अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून दुर्लक्ष केले असल्याचे सिद्ध झाले, तर त्यांच्यावरही शिस्तभंग कारवाई, निलंबन तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल होऊ शकतात. परिणामी याप्रकरणी कागदी पत्र चालवित होत असलेली दिरंगाई यामुळे अधिकारी वर्ग सुद्धा अडचणीत येण्याची शक्यता वर्तविली आहे.

# ६० वर्षीय नराधमाचा १० वर्षीय मुलीवर अत्याचार

## -चान्नी ठाणे हद्दीतील एका गावातील घटना

**अकोला/प्रतिनिधीः-** पातुर तालुक्यातील चान्नी ठाणे हद्दीतील एका गावातील



दहा वर्षीय मुलीवर ६० वर्षीय नराधमानी अत्याचार केल्याची घटना सोमवार ५ मे रोजीच्या दुपारी उघडकीस आल्याने गावासह परिसरात एकच खडबड उडाली आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी पीडित मुलीचे आई-वडील दररोज शेतात मजुरी करण्यासाठी निघून जातात, शाळेला सुट्टी असल्याने मुलगी घरात एकटी असते, याची संधी साधत नराधम मुलीला पैसे देऊन आठवडा ☞(पान २ वर)

#### मुलगी गंभीर : नराधम फरार !

दहा वर्षीय मुलीवर अत्याचार झाल्याची घटना सोमवारी दुपारी उघडकीस आल्याने नराधाम घटनास्थळावरून पसार झाला, अत्याचारामुळे मुलगी गंभीर असून, पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार चान्नी पोलिसांचे पथक नरधामाला पकडण्यासाठी रवाना झाले आहे.


#### गावात पसरले दहशतीचे वातावरण !

चान्नी ठाणे हद्दीतील एका गावात दहा वर्षीय मुलीवर ६० वर्षीय नराधामाने अत्याचार केल्याची घटना सोमवार ५ मे रोजी उघडकीस आल्यानंतर सदर माहिती गावात वाऱ्यासारखी पसरलीं. गावात अल्पवयीन मुली व त्यांच्या आई-वडिलांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. अशा नराधमावर कठोर कारवाई करण्याची मागणी गावकऱ्याकडून केली जात आहे.

# रतन इंडीया पॉवर प्लांट परिसरातील बिबट जेरबंद

## वन विभागाच्या तत्पर कारवाईने संकट टळले

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरालगतच्या माहुली जहागीर परिसरातील रतन इंडीया पावर प्लॉंट परिसरात मुक्तसंचार करणाऱ्या बिबटला अखेर पिंजरात जेरबंद करण्यात वनविभागाला मंगळवारी यश मिळाले.



रतन इंडिया पॉवर प्लांट परिसरात बिबट्या दिसून आल्याने कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची एकच धावपळ उडाली. अचानक बिबट्याचे दर्शन झाल्याने सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्यात आल्या. प्लांट परिसरात हालचालींवर मर्यादा घालण्यात आल्या आणि सुरक्षारक्षकांना सतर्क करण्यात आले. संभाव्य धोका लक्षात घेता वन विभागाला तत्काळ कळविण्यात आले. माहिती मिळताच वन विभागाचे पथक घटनास्थळी ☞(पान २ वर)

# बनावट डिटर्जंट कारखान्याचा भंडाफोड

## ७१ लाखांचा साठा जप्त; नामांकित ब्रँडच्या नावाने ग्राहकांची फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात नकली डिटर्जंट आणि साबण तयार करून बाजारात विक्री करणाऱ्या रॅकेटवर अखेर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गुन्हे शाखेने वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत छापा टाकत तब्बल ७१ लाख २० हजार २५० रुपयांचा बनावट माल व मशिनरी जप्त केली. या कारवाईमुळे शहरात सुरू असलेल्या बनावट उत्पादनांच्या साखळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.






गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मंगळवारी चांदुरबाजार रोडवरील नया अकोला परिसरात ही धाड टाकण्यात आली. तपासादरम्यान, नामांकित कंपन्यांच्या नावाने सर्फ एक्सेल, व्हील आणि निरमा यांसारखी डिटर्जंट उत्पादने बनावट पद्धतीने तयार करून त्यांची पॅकिंग केली जात असल्याचे उघड झाले. या कारखान्यात ☞(पान २ वर)

#### हा मुद्देमाल जप्त -

| | |
|---|---|
| सर्फ एक्सेल पावडर | : २४४ पोते |
| -व्हील पावडर | : ३३८ पोते |
| -व्हील साबण | : ४०० बॉक्स |
| **-विविध कच्चा माल व रसायने** | |
| -पॅकिंग मशिनरी | (५ निरमा, १ साबण) |
| -लेबल्स, पॅकिंग साहित्य व वजन काटे | |
| **-एकूण मुद्देमाल :** | **७१,२०,२५० रुपये** |

# पत्नीची हत्या, पती गजाआड

## -चरित्रावरील संशयातून कृत्य

### जवळा शहापूर येथील धक्कादायक प्रकार

**अमरावती/प्रतिनिधीः-** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत एका २६ वर्षीय पतीने आपल्या २४ वर्षीय पत्नीची अमानुष मारहाण करून हत्या केल्याची संतापजनक घटना अमरावती जिल्ह्यात उघडकीस आली आहे.




चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जवळा शहापूर येथे सोमवारी (दि. ४) दुपारच्या सुमारास हा प्रकार घडला. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी पतीला अटक केली असून न्यायालयाने त्याला ९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रियांशी ऋषिकेश आठवले (वय २४) असे मृत विवाहितेचे नाव असून, ऋषिकेश उर्फ सनी श्रीकृष्ण आठवले (वय २६) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ऋषिकेश हा गवंडी कामानिमित्त चंद्रपूर येथे गेला असताना त्याची प्रियांशीसोबत ओळख झाली होती. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि दोघांनी विवाह केला. त्यानंतर ते जवळा शहापूर येथे एकत्र राहत होते. मात्र, लग्नानंतर काही काळातच ऋषिकेशने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेण्यास सुरुवात केली. संशयी वृत्तीमुळे ☞(पान २ वर)

#### खुनाचा गुन्हा दाखल; पुढील तपास सुरू

या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीला ९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक सागर भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या घटनेमुळे जवळा शहापूर परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांत संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे.

# धन्वंतरी सहकारी संस्थेची निवडणूक १७ रोजी



## ६ संचालक बिनविरोध

**अमरावती/प्रतिनिधीः-** धन्वंतरी सहकारी संस्था संचालक मंडळाची निवडणूक येत्या रविवार १७ मे रोजी घेण्यात येणार आहे. निवडणुकी पूर्वीच वैद्यकीय क्षेत्रातील ६ उमेदवारांची बिनविरोध एकमताने निवड झाली आहे. १२ उमेदवारांसाठी निवडणूक होणार असल्याची माहिती आज मंगळवार ५ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे. समाजातील सामान्य नागरिकांपर्यंत माफक दरात आधुनिक वैद्यकीय सेवा देण्यासाठी संस्था कार्य करत आहे. रुग्णसेवाचा दर्जा उंचावणे, अत्याधुनिक साहित्य, डॉक्टरांची सेवा, वैद्यकीय शिबिराद्वारा समाजात जनजागृती करणे यासाठी संस्था कार्य करत आहे. संस्थेत कार्य करण्याचा ☞(पान २ वर)

# सोलर शॉपमधील लाखोंच्या चोरीचा उलगडा

### मुख्य आरोपीसह अल्पवयीन ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर परिसरातील सोलर सिस्टमच्या दुकानात झालेल्या लाखोंच्या चोरीचा पोलिसांनी यशस्वी उलगडा केला आहे. या कारवाईत मुख्य आरोपीसह एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले असून, चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील करेसिया सोलर सिस्टम या दुकानातून २ मे रोजी अज्ञात चोरट्यांनी सुमारे २ लाख ९० हजार रुपयांचा माल लंपास केला होता. याप्रकरणी विलासनगर येथील फिर्यादी सतीश रामेश्वर करेसिया यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी ☞(पान २ वर)

# फ्रेजरपुरा हद्दीत हातभट्टीवर धाड

## ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अवैध दारू निर्मितीवर गुन्हे शाखेने पुन्हा एकदा धडक कारवाई करत मोठा साठा जप्त केला. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या छाप्यात एका महिलेला हातभट्टी दारू तयार करताना पकडण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंगवर असताना वडाळी परिसरातील परिहारपुरा भागात अवैध दारू तयार केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ संबंधित ठिकाणी धाड टाकली असता, नंदा देविदास भरद्वाज (वय ५०) या आपल्या घरासमोरील आवारात हातभट्टी दारू तयार करताना आढळून आल्या. या कारवाईत पोलिसांनी १०० लिटर तयार हातभट्टी दारू तसेच सुमारे २०० लिटर☞(पान २ वर)

# अपार्टमेंटमध्ये मानवी सांगाडा आढळल्याने खळबळ

## तपासात निघाला अभ्यासासाठी वापरला जाणारा नमुना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राधानगर परिसरात असलेल्या गजानन अपार्टमेंटमधील एका फ्लॅटमध्ये हाडांचा सांगाडा आढळल्याने काही काळ भीती आणि खळबळ निर्माण झाली. नवीन राहायला आलेल्या विद्यार्थ्यांना हा मानवी सांगाडा दिसताच त्यांनी तो खरा असल्याचा समज करून घेत घाबरून



गेले. घटनेची माहिती मिळताच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित फ्लॅटमध्ये यापूर्वी वैद्यकीय ☞(पान २ वर)

# जमील कॉलनी येथील स्वच्छतेच्या प्रश्नावर नगरसेवक आक्रमक

## आरोग्य अधिकारी जाधव,राठोड यांच्या गळयात घातला हार





### -चार दिवसाचा प्रशासनाला अल्टिमेटम

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक प्रभाग क्रमांक चार जमील कॉलनी येथील स्वच्छतेच्या प्रश्नावरून नगरसेवक आक्रमक झाल्याची घटना आज मंगळवार ५ मेच्या सकाळी समोर आली आहे. या भागात ☞(पान २ वर)

# 'ते पन्नास दिवस' कादंबरी अभ्यासक्रमातच राहणार

## ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशनच्या न्यायालयीन संघर्षाला यश



**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये बीए भाग दोन च्या चौथ्या सत्रात 'ते ५० दिवस 'ही कादंबरी अभ्यासक्रमात होती. कोविड काळात कष्टकरी वर्गांची झालेली ससेहोलपट ,हजारो किलोमीटर ☞(पान २ वर)